
संबळाची रचना वैशिष्ट्यपूर्ण आहे. संबळ हे दोन लाकडी वाद्याची एक जोडी आहे. हे वाद्य डाव्या आणि उजव्या हातांनी वाजवायचे जोडीचे तालवाद्य आहे. त्याचा आकार पेल्याप्रमाणे रुंद व खाली निमुळता असतो. या वाद्याचे दोन भाग वेगवेगळे असले तरी ते एकत्रीत असतात. संबळाचे अंग झाडाच्या खोडापासून तयार केलेले असते. सर्वसाधारणत: साग, बाभळ, शिसम वगैरे वृक्षांचे खोड संबळासाठी वापरले जाते. पोखरून व कोरून तयार केलेल्या खोडावरती बकऱ्याचे व बोकडाचे चामडे दोरीच्या सहाय्याने नऊ भोकातून आतून तळाशी असलेल्या एका कड्याला अडकवलेले असते. संबळाच्या खोडावर जे चामडे ताणून बसवलेले असते त्यास पूडी असे म्हणतात. हे चामडे बसविण्यासाठी नाडापूडी व सुती ही दोरी वापरली जाते. संबळावरील पूडीला जी नऊ भोके पाडलेली आहेत ती नऊ भोके नऊ ग्रहावरून घेतलेली आहेत. पहिले ग्रह हे गणेशाचे असे मानले जाते. गोंधळी लोक व भक्त लोक त्या ग्रहांचे पूजन करतात. संबळामध्ये नर आणि मादी असे दोन प्रकार आहेत. त्यापैकी नर संबळावर शाईचा लेप दिला जातो. त्याला 'मेनी' असेही म्हणतात. ही मेनी मंदिरामध्ये (मारुतीच्या) गोठलेले तेल,



Scanned by CamScanner

एरंडाच्या बिया व त्याचे तेल आणि सुताची राख या तिन्हींच्या मिश्रणातून तयार केली जाते. या तिन्हींचे मिश्रण करून ते एका पाटावरती अथवा दगडावरती सतत गोठवतात. व बराच वेळ गोठून त्यास चिकटपणा येतो. अशा प्रकारे मेनी तयार करून नर संबळाच्या पूडीला आतून मधोमध लावतात.

नर संबळ हे डग्याचे बोल पुरवते तर मादी संबळ हे तबल्याचे बोल पुरवते. नर संबळाच्या मुखाचा व्यास हा मादी संबळाच्या मुखाच्या व्यासापेक्षा जास्त असतो. यामध्ये लहान मोठे असे खोड वापरले जाते. नर संबळाचा व्यास नऊ ते दहा इंच असतो. तर मादी संबळाचा व्यास सहा ते आठ इंच असतो. नर संबळाला 'धूम' व मादी संबळाला 'चाप' असे म्हणतात. ज्याप्रमाणे तबल्याच्या पुडीचा ताण कमी जास्त होण्यासाठी लाकडी गठ्ठे वापरले जातात त्याप्रमाणे संबळाचा ताण कमी जास्त होण्यासाठी अथवा आपल्याला हव्या असलेल्या स्वरात संबळ लावण्यासाठी कुणीचा वापर केला जातो. संबळाचे वादन हे काठ्याच्या (स्टीक) सहाय्याने केले जाते. त्या काठ्या वेताच्या किंवा बाभळीच्या जाड मुळीच्या असतात. या काठ्या ज्या बाजूने वाजवतात तेथे त्या बाजूस गोलाकार वळविलेल्या असतात. त्या काठीच्या दुसऱ्या बाजूस कापडी पट्टी अथवा चिंधी बाधलेली असते. त्याचे कारण म्हणजे संबळाचे वादन करताना त्या काठ्या हातातून निसटू नये हे होय. या काठीची लांबी एक ते दीड वित असते. संबळाच्या पुढील बाजूस भगवे व गुलाबी कापड बांधलेले असते. त्यास 'गल्पी' असे म्हणतात. हे वाद्य कापडी पट्टयाने गळ्यात अडकवून वाजवले जाते.

संगीतातील वाद्याचे निर्मिती ही बऱ्याचदा त्यावेळेला समाजात असलेल्या तांत्रिक प्रगतीवर अवलंबून झालेली असते. तंत्र आणि संस्कृती यांचा उत्तम संगम बघायचा असेल तर वाद्याची जडण–घडण बघावी. शास्त्रीय संगीतातील तबला व पखवाज ही तालवाद्ये सोडल्यास बरीच तालवाद्ये आपल्याला आढळतात. ती भक्ती परंपरेमध्ये अशीच भक्ती परंपरा म्हणजे देशावरचा गोंधळ होय. महाराष्ट्राच्या लोकसंगीतामध्ये गोंधळ या कलाप्रकारास विशेष महत्त्व आहे. गोंधळामध्ये प्रामुख्याने तुणतुणे, टाळ आणि संबळ ही वाद्ये वापरली जातात. ही वाद्ये ईश्वराच्या त्रिगुणात्मक स्वरूपाची प्रतिके मांडली जातात. तुणतुणे हे ब्रम्हाचे म्हणजे उत्पत्तीचे, टाळ हे विष्णूचे म्हणजे स्थितीचे व संबळ हे शंकराचे म्हणजे लय तत्त्वाचे प्रतिक मानले जाते. संबळ या वाद्यातून ताल सदृश्य बोल निर्माण होतात. विशेषतः गोंधळ व देवी पुजेसाठी याचा उपयोग केला जातो. संबळाच्या सकाळी व संध्याकाळी वादनाने कल्याण गुण वाढतो. हे वाद्य शांत उग्र असूनसुध्दा कोमल व तीव्रही आहे. भारताच्या विविध प्रांतात असलेले दुक्कड हे वाद्य संबळ सदृश्य दिसते. शास्त्रीय संगीतातील तबला या वाद्यांच्या उगमाकडे अधिक दृष्टीक्षेप टाकला. असता संबळ या वाद्यावरुन तबला हे वाद्य निर्माण झाले असावे. असे तज्ञांचे मत आढळून येते.

संबळाचे वादन कडक व ताल पुरवणारे असते. या वाद्याची मिंड दोन्ही पायांनी दाबून निर्माण केली जाते. संबळ या वाद्याचे स्वतंत्र वादन केले जाते. त्यास 'झिल' असे म्हणतात. संबळाचे जे मुळचे ठेके आहेत त्याला 'वट' असे म्हणतात. उतरणी किंवा तिहाई असते. त्यास 'ठेपा' असे म्हणतात. जसे शास्त्रीय तालवाद्यांमध्ये परण असते तसेच संबळामध्ये फडकणी नावाचा प्रकार आहे. ढोलकीचे जे जुने ठेके आहेत ते बरेच ठेके संबळामध्ये आलेले दिसून येतात. या वाद्याचा उपयोग सनई वाजवताना लय ताल साधण्याकरता साथीसाठी करतात. अलगुजाची साथ करताना मात्र हे वाद्य हाताने वाजवले जाते. गोंधळी लोक गोंधळ घालण्यासाठी या वाद्याचा उपयोग करतात. महाराष्ट्राच्या लोकवाद्यवृंदामध्येसुध्दा या वाद्यांचा उपयोग केला जातो.

संबळ हे तालवाद्य जेव्हा वाजायला लागते किंवा सुरुवात होते तेव्हा आपल्या मनामध्ये एक आगळी वेगळी उभारी येते. या तालवाद्याचा नाद कानात घुमू लागला की पाय आपोआप हलू लागतात. अंगामध्ये संचार निर्माण होतो. म्हणून या लोकवाद्याचे महत्त्व लोकसंगीतामध्ये अनन्यसाधारण असलेले दिसून येते. लोकांच्या संस्कृतीला, चालीरीतींना, सण–समारंभाला या गीतात बांधल्यावर त्याला साथ देणारे, ठेका देणारे, ताल देणारे हे तालवाद्य आहे. म्हणून संबळ या लोकवाद्याच महत्त्व आता जाणले पाहिजे या वाद्यांचा वापर पिढी–दरपिढी वाढला पाहिजे या वाद्यांचा प्रचार व प्रसार झाला पाहिजे असे अभ्यासकास वाटते.

**निष्कर्ष:–**

वाद्य हे संगीतातील महत्त्वाचे अंग आहे. वाद्य म्हणजे जे वाजवण्यास योग्य आहे. ते 'वद' या संस्कृत धातूपासून 'वाद्य' या शब्दाची उत्पत्ती झालेली आहे. महाराष्ट्रामध्ये बरीचशी तालवाद्ये आहेत. चामड्याने मडवलेल्या तालवाद्यांना अवनध्द असे म्हणतात.



Scanned by CamScanner

संबळ हे एक तालवाद्य आहे या वाद्याला महाराष्ट्राच्या लोकसंगीतामध्ये अनन्यसाधारण महत्त्व प्राप्त झाले आहे.

वेदकालीन वाद्यात 'स्तंबर' किंवा 'स्तंबळ' या नावाच्या वाद्याचा उल्लेख आढळतो. ते हेच संबळ असावे, असे अनुमान काढता येईल.

संगीतातील वाद्यांची निर्मिती ही बऱ्याचदा त्यावेळी त्या समाजात असलेल्या तांत्रिक प्रगतीवर अवलंबून असते. तंत्र आणि संस्कृती याच उनम, संगम बघायचा असेल तर वाद्याची जडण–घडण बघावी. संबळाचीही रचना वैशिष्ट्यपूर्ण असलेली दिसून येते.

संबळ हे शंकराचे म्हणजे लयतत्वाचे प्रतिक मानले जाते. संबळ या वाद्यातून तालसदृश्य बोल निर्माण होतात. संबळामध्ये नर आणि मादी असे दोन प्रकार आहेत. नर संबळ हे डग्ग्याचे बोल पुरवते तर मादी संबळ तबल्याचे बोल पुरविते.

शास्त्रीय संगीतातील तबला या वाद्याच्या उगमाकडे दृष्टीक्षेप टाकला असता संबळ या वाद्यावरूनच तबला हे वाद्य निर्माण झाले असावे, असे तज्ञांचे मत आहे. भारताच्या विविध प्रांतात असलेले दुक्कड हे वाद्य संबळ सदृश्य असलेले दिसते.

या वाद्याचा उपयोग सनई वाजवताना लय ताल साधण्याकरिता साथीला असतात. अलगुजाची साथ करताना मात्र हे वाद्य हाताने वाजवले जाते. गोंधळ घालताना गोंधळी लोक या वाद्याचा उपयोग करतात. महाराष्ट्राच्या लोकवाद्यवृंदामध्येसुध्दा या वाद्याचा उपयोग केला जातो.

संबळ या तालवाद्याकडे अधिक दृष्टीक्षेप टाकला असता महाराष्ट्राच्या लोकसंगीतामध्ये या वाद्याला किती महत्त्व आहे ते दिसून येते. म्हणूनच या तालवाद्याला महत्त्व आले आहे. या वाद्याचा प्रचार व प्रसार झाला पाहिजे असे वाटते.

**संदर्भ सूचि**

१) गजेंद्रगडकर अरविंद पं:— वाद्यवादनाचे संपूर्ण गाईड, उन्मेष प्रकाशन, पूणे, सप्टेंबर २००५, प्रथमावृत्ती पृष्ठ क्रं. १०.

२) बिडकर सुचेता:— संगीतशास्त्र विज्ञान, संस्कार प्रकाशन, २०१३ भाग २ पृष्ठ क्रं. १०३, १०४.

३) रानडे अशोक:— लोक संगीत शास्त्र :— भारत मुद्रक आणि प्रकाशक लि. औरंगाबाद, फेब्रुवारी १९७५, पृष्ठ क्रं. ८३, ८४.

४) मांडे प्रभाकर:— लोकरंगभूमी (परंपरा, स्वरुप आणि भवितव्य), मधुराज पब्लीकेशन्स, पुणे, नविन आवृत्ती १५ जुलै २००७, २०३, २०४.

५) बी चैतन्य देव:— अनुवादक मा कृ पारधी, भारतीय वाद्ये महाराष्ट्र राज्य साहित्य संस्कृती मंडळ मुंबई, फेब्रुवारी १९७६, पृष्ठ क्रं. ४१ ते ४५.

६) मुळगांवकर अरविंद:— तबला पॉप्युलर प्रकाशन, पहिली आवृत्ती १९७५ पृष्ठ क्रं. ३३ ते ३६.

७) पूणे इतिहास दर्शन पूणे महानगर, खंड दुसरा कला भारतीय इतिहास संकलन समिती पूणे, १० मे २००० पृष्ठ क्रं. १२५.

८) चक्रवर्ती कविता:— राजस्थानी लोकनृत्ये आणि वाद्ये अखिल भारतीय गांधर्व महाविद्यालय मंडळ प्रकाशन, एप्रिल १९९५, पृष्ठ क्रं. १३, १४.

९) शालीग्राम प्रदिपकुमार:— महाराष्ट्रातील प्राचीन लेण्यामधील वाद्यांच्या आकृती, अखिल भारतीय गंधर्व महाविद्यालय मंडळ, प्रकाशन मे १९८१ पृष्ठ क्रं. २४१, २४२.



Scanned by CamScanner

# ठुमरी आणि बनारस शैली — काही टिपणे

डॉ. विनोद ठाकूरदेसाई संगीत व नाट्यशास्त्र विभाग, शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर.

**प्रास्ताविक :**

कोणत्याही गानप्रकारात त्या गानप्रकाराशी संबंधित प्रतिभासंपन्न कलावंतांचा त्या कलाव्यवहारात मोलाचा सहभाग असतो. ठुमरी किंवा उपशास्त्रीय संगीताच्या विकासात, प्रचारात, प्रसारात आणि तिला मोठ्या प्रमाणात रसमधूर श्रवणीय, सुंदर करण्यामध्ये ज्या ज्या कलावंतांनी मोलाची भर टाकली त्यामध्ये पुरूष कलाकारांचा आणि स्त्री कलाकारांचा मोठा सहभाग आहे. ठुमरी हा उपशास्त्रीय संगीतातील मुख्य प्रकार. पूर्वी उस्ताद लोक किंवा पुरूष कलाकार ही ठुमरी गाणे काही प्रमाणात निषिध्द मानत असत. मात्र या उस्तादांनी अनेक स्त्रीयांना ठुमरी, दादऱ्याची तालीम दिल्याचे दिसून येते. मुळात उपशास्त्रीय संगीत हे मानवी भावभावनांच्या अगदी जवळ जाणारे भावनिक संगीत आहे. त्यामुळे स्त्रीयांकडे असलेली नैसर्गिक कोमलता, भावूकता, आवाजातील मृदुता, नाजुकता ही या प्रकाराला अधिक न्याय देऊ शकते. ठुमरीचे कथ्थक नृत्याशीही जवळचे नाते आहे. नृत्याबरोबर गायल्या जाणाऱ्या गीतांच्या परंपरेमध्ये ठुमरीचे एक विशिष्ट स्थान आहे. त्यामुळे बैठकीच्या गाण्यामध्ये ठुमरी गायनातून ;क्वचित अदा करूनद्ध जशी भावना व्यक्त होते तशीच भावना गतभावाच्या आधारे कथ्थक नृत्यामध्ये गायल्या जाणाऱ्या ठुमरीद्वारे व्यक्त होते. सुप्रसिध्द ठुमरी गायिका सविता देवी यांचे म्हणणे असे आहे की,‘ठुमरीमधील भाव एक नर्तिका ज्या प्रकारे हावभाव व आंगिक अभिनयाद्वारे व्यक्त करते तशाच प्रकारे आम्ही गळ्यमधून त्या भावना अभिव्यक्त करत असतो, अगदी मनामध्ये नृत्यभाव असतो, मनाने नृत्य करत असतो.’ वरील सर्व पार्श्वभूमीवरून आपल्या असे लक्षात येते की, मानवी भावभावनांच्या अभिव्यक्तीमध्ये उपशास्त्रीय संगीताचा मोलाचा वाटा आहे. बनारसी ठुमरीच्या ऐतिहासिक पार्श्वभूमीचा विचार करून या शैलीबद्दल विविध कलाकार व मान्यवरांचे विचार यांची अभ्यासपूर्वक मांडणी या शोधनिबंधात केली आहे.

ठुमरी ही एक बोलप्रधान गायकी मानली जाते. प्रचलित ठुमरी गानशैलीच्या विकासामध्ये बोल किंवा स्वरांबरोबर बोलविस्ताराची भूमिका महत्त्वाची ठरली आहे. या सर्व गोष्टींचा विचार करता ठुमरीचे मुख्यत: दोन प्रकार पडतात.

१) बोलबॉट की ठुमरी अर्थात गतिप्रधान ठुमरी. २द्ध बोलबनाव की ठुमरी — अर्थात भावप्रधान ठुमरी.

‘बोलबॉट की ठुमरी’ ही शास्त्रीय संगीतातील छोट्य ख्यालाशी मिळतीजुळती आहे. तर ‘बोलबनाव की ठुमरी’ ही शैली अवधचे नवाब उस्ताद वाजिदअली शाह यांच्या कालावधीत विकसित झाली. लखनौच्या पूर्वेकडील प्रचलित ठुमरीचा ‘बोलबनाव की ठुमरी’ म्हणून उल्लेख आढळतो. प्रादेशिक संलग्नतेमुळे ‘बोलबनाव की ठुमरी’ चे दोन प्रकार पडतात.

१ पूरब अंगाची ठुमरी २ पंजाब अंगाची ठुमरी

**पूरब अंगाची ठुमरी :**

बोलबनाव ठुमरीचा प्रकार व प्रचार उत्तर भारताच्या पूर्वी भागात अर्थात पूर्वी उत्तर प्रदेश व बिहारकडे अधिक झाल्याने तिला प्रामुख्याने ‘पूरब अंगाची ठुमरी’ किंवा ‘पूरब ठुमरी’ असे म्हणतात. या ठुमरीशी उत्तर भारतातील पूरब प्रदेशाचा संबंध असल्याने पूर्व प्रदेशात गायल्या जाणाऱ्या चैती, कजरी, पूरबी घाटो इत्यादी लोकगीतांच्या धुनांचा प्रभाव तिच्यावर अधिक जाणवतो. पूरब अंगाची ठुमरी गाण्याचा एक विशिष्ट ढंग आहे. एक विशिष्ट क्रम आहे, एक शिस्त आहे. बंदिशीच्या प्रकृतीनुसार बोलबनाव करून ठुमरी ज्या रागात आहे त्या मुख्य रागाची बढत करून नंतर इतर समप्राकृतिक रागांची छाया दाखविली जाते. त्याचबरोबर मुख्य रागाचा आविर्भाव, तिरोभाव केला जातो. मूळ धुनेमध्ये किंवा रागामध्ये अन्य रागांची छाया दाखविण्यासाठी अन्य रागांचे मिश्रण साधारणत: षड्ज संक्रमण, स्वरसन्निवेश परिवर्तन अथवा स्वरपरिवर्तन याद्वारे केले जाते. ठुमरी गायनात रागांच्या छायाभास व मिश्रण कौशल्यास साधारणत: ‘मॉझ’ किंवा ‘जिला’ देखील म्हणतात. रागाचा आविर्भाव, तिरोभाव कौशल्यासोबत कण, मुर्की, खटका, मींड, जमजमा इत्यादी स्वरालंकार घेतले जातात. तसेच ‘ रे, हारे, हां, हाय’ इत्यादी संबोधक उद्‌गारांद्वारे भावाभिव्यक्ती होते.

पूरब अंगाच्या ठुमरीचे दोन प्रकार होतात.



Scanned by CamScanner

१द्ध लखनवी शैली २) बनारसी शैली. पूरब अंगाच्या ठुमरीचा प्रसार प्रथम लखनौ किंवा वाराणसी क्षेत्रात झाला. त्यानंतर ही शैली बनारसमध्ये प्रचलित झाली. रचना व प्रकृतीच्या आधारे दोन्ही शैलींमध्ये फरक करणे कठीण आहे. प्रस्तुत मांडणीमध्ये बनारसी शैलीचा विकास, जडणघडण, प्रचार व प्रसार याबद्दल विचार मांडला आहे.

**बनारस शैली :**

ही शैली पूर्वी उत्तरप्रदेशातील बनारस, गया व इतर जवळच्या भागात प्रचलित झालेली होती. म्हणून तिला 'बनारसी ठुमरी' असे म्हणतात. काही विद्वानांच्या मते लखनऊचे बिन्दादीन महाराज यांचे भाऊ कालकाप्रसाद ठुमरी शैलीला लखनऊमधून बनारसमध्ये घेऊन आले आणि त्यांच्याद्वारे बनारसमधील गायिकांमध्ये या शैलीचा प्रसार झाला.

या ठुमरीवर उत्तरप्रदेशात गायल्या जाणाऱ्या झूमर, पूरबी, कजरी, चैती, होरी, सावनी इत्यादी लोकगीतांचा प्रभाव आहे. सुप्रसिध्द ठुमरी गायिका गिरीजादेवी म्हणतात की, 'काशीच्या ठुमरीमध्ये ग्रामीण सौंदर्य आहे की जे वास्तवातील सौंदर्य आहे.' त्याचबरोबर त्या आणखी एके ठिकाणी म्हणतात की, 'बनारसी ठुमरीमध्ये बोलबनावाच्या भावपद्यावर अधिक ध्यान दिले जाते. येथील ;बनारसचीद्ध ठुमरी शांत आणि सरळ भाव असणारी आहे.'

ही ठुमरी चैनदार आहे. या शैलीमध्ये बोलांची भावमधुरता आहे. त्यामुळे 'कहन' वेगळेपणा दर्शविते की ज्यात 'हूक, दर्द, पुकार' इत्यादींचा काकु प्रयोग होताना दिसतो. या ठुमरीवर ब्रज, मगधी, भोजपुरी इत्यादी बोलींचा प्रभाव असल्याचे दिसून येते.

सुप्रसिध्द ठुमरी गायिका डॉ. अनिता सेन म्हणतात, 'बनारस शैलीत बोलबनाव करतेवेळी बोल 'कहन' आणि 'पुकार' ढंगाने व्यक्त होतो.' उदा. भैरवीतील 'शाम न अब तक आये, आशा डुबी जाये' या बंदिशीत काहीतरी आशय सांगून ती वेगळ्य ढंगाने व्यक्त करणाऱ्या शैलीला 'कहन शैली' म्हणतात.

बनारसी शैलीमध्ये ठुमरी गायन ख्याल अंगाने केले जाते. ही अतिशय शांत, धीम्या गतीने जाणारी, भारदस्त, एखाद्या ऐटीत चालणाऱ्या खानदानी स्त्रीसारखी आहे. लखनवी शैलीच्या तुलनेत संथ, गंभीर प्रकृती, प्रत्येक स्वरात भाव व रस अभिव्यक्त करणारी अशी बनारसी शैली आहे. खटका, मुरकी, मींडयुक्त बोलबनाव, लहान लहान ताना या शैलीच्या गायकीमध्ये दिसून येतात. स्वरांची क्रमानुसार बढत, बंदिशीच्या विषयानुकूल रितिकालीन हिंदी, ब्रज, अवधी इ. भाषेत रचित दोहे, सोरठा, सवैय्या, कवित्त आदी रचना ठुमरीच्या मधे मधे म्हटल्या जातात.

डॉ. शुभदा कुलकर्णी 'गायिका अन् गायकी — ठुमरी व ख्याल' या ग्रंथात म्हणतात, 'ठुमरीतील जलद लय, हलकेपणा काढून त्यात भारदस्तपणा ठेवणे आणि त्याच वेळेस भावनाप्रधानता न घालवणे असा सुंदर समतोल बनारस बाजातून ठुमरी गायकीचा विकास करणाऱ्यांनी साधला'.

या ठुमरीमध्ये भक्तिरसप्रधानता, राधाकृष्णाच्या रासलीला, शृंगार यांचा आविष्कार दिसून येतो. उदा.

**स्थायी — भोर भयो कुछ देर भई प्रभु निरखो हमरी ओर ।**
**अंतरा — न जाने किस पाप की गठरी, दुख से भरी चहु ओर कहत तुम्हीं से**
**देख दुखी सब, काटो अब यहीं भोर ।।** किंवा
**स्थायी — फुल गेंदवा न मारो लगत करेजवा में चोट**
**अंतरा — सैंया निरमोहिया दरदिया**
**रखत पलकिया की ओट ।।**

बनारसी बाजाच्या ठुमरी गायकीचे अध्वर्यू म्हणून ज्यांचे नाव घेतले जाते असे भैय्या गणपतराव उर्फ सुधरपिया हे इ.स. १८८० नंतरच्या काळातील हार्मोनिअमवादनातील उल्लेखनीय कलावंत. त्यांनी उस्ताद सादिक अली खॉं यांच्याकडून ठुमरीची तालीम घेतली. परंतु आवाज खराब झाल्यामुळे त्यांनी हार्मोनिअम हे वाद्य स्वीकारले आणि त्यात प्राविण्य मिळवून बनारसी शैली हार्मोनिअमच्या माध्यमातून लोकप्रिय केली. त्यांच्या शिष्यांमार्फत म्हणजेच मियॉं मौजुद्दीन खॉं व गोहरजान यांच्याद्वारे या गायकीला प्रतिष्ठा मिळवून दिली.

पं. जगदीप मिश्र यांचे बनारस शैलीच्या प्रसारात खूप मोठे योगदान आहे. जगदीप मिश्र हे भैय्या गणपतरावांचे समकालीन होते. असे म्हणतात की त्यांनी बनारस ठुमरीची लय थोडी विलंबित केली.



Scanned by CamScanner

मियाँ मौजुद्दीन खॉ हे भैय्या गणपतरावांचे शिष्य. ते मूळचे बनारसचे होते. प्राथमिक ठुमरीची तालीम त्यांनी बनारसच्या जगदीप मिश्र यांच्याकडून घेतली. त्याचबरोबर उस्ताद सादिक अली खॉ यांच्याकडूनही त्यांना ठुमरी गायनाचे शिक्षण मिळाले होते. त्यांना 'ठुमरीचा बादशहा' म्हणून ओळखले जाते. ज्येष्ठ समीक्षक स्व. गोविंदराव टेंबे लिहितात, 'मुंबईला बापूतारा या गायिकेकडे मैफील होती. उस्ताद अल्लादिया खॉसारखी उस्ताद मंडळी हजर होती. या सर्वांची गाणी झाल्यावर कॉफीपान पहाटे चार–साडेचारच्या सुमारास झाले. मैफील संपली होती आणि कलावंत मंडळी घरी जायच्या तयारीत होती. एवढ्यात एका व्यक्तीचा पाय चुकून कपाला लागला आणि त्यातून नाद निघाला. उस्ताद मौजुद्दीन खॉ यांनी हा नाद पकडला आणि भैरवीच्या ठुमरीची एक सुरावट छेडली. जमलेल्या मंडळींनी, "वा! मियॉ पुढे चालू ठेवा" अशी विनंती केली आणि मैफील पुन्हा ताजी टवटवीत झाली. मियॉ मौजुद्दीन खॉ यांनी भैरवीच्या आर्त स्वरांनी ठुमरी अशी काही आळवली की, जमलेल्या श्रोत्यांच्या डोळ्यांत अश्रू तरारले. खुद्द उस्ताद अल्लादियां खॉ गहिवरून मौजुद्दीन खॉ यांना म्हणाले, "हे खरे गाणे! ही गायकी तुझ्यासाठीच आहे. तू या गाण्याचा बादशहा आहेस." हा प्रसंग मौजुद्दीन खॉ यांच्या प्रभावी ठुमरी गायकीची कल्पना देऊ शकतो. इ.स. १८८० ते १९२० च्या कालखंडात बनारसी ठुमरीच्या प्रसारात त्यांचा मोलाचा वाटा आहे. याशिवाय कलकत्त्याच्या गोहरजान, आग्ऱ्याच्या मलकाजान, पाटण्याच्या जोहराबाई, श्रीमती बडी मोतीबाई, रसूलनबाई, सिध्देश्वरी देवी, गिरिजादेवी, हिरादेवी मिश्र, शोभा गुर्टू या सर्व ठुमरी गायिकांनी बनारसी शैलीचा प्रवाह पुढे चालू ठेवला.

ठुमरीच्या विकासामध्ये ज्या थोर गायक–गायिकांचे योगदान राहिले अशा गायिकांमध्ये गोहरजान यांच्या नावाचा उल्लेख अग्रस्थानी करावा लागेल. गोहरजान यांचा जन्म सन १८७० मध्ये झाला. त्यांचे संगीत शिक्षण वजीर खॉसाहेब यांच्याकडे झाले. मोहक, भरदार, गोड आवाज, गळ्यचा निर्मळपणा, गाण्यातील सहजता, बोलांचा लडीवाळपणा, स्पष्ट दाणेदार तान इत्यादी अनेक वैशिष्ट्यंनी परिपूर्ण अशी त्यांची गायकी होती. 'आनबान जिया में लागी, पीकी बोली ना बोल, हमसे ना बोलो राजा, नाहक काहे गवनुवा, हारे सैय्या परूं मै तोरे पैय्या' या त्यांच्या अनेक गाजलेल्या अशा ठुमऱ्या व दादरे आहेत. गोहरजान यांना उस्ताद मौजुद्दीन खॉ यांचीही तालीम लाभली. बनारसी ठुमरी प्रचलित करण्यात त्यांचे मोलाचे योगदान आहे.

ज्येष्ठ ठुमरी अभ्यासक व गायक डॉ. संजीव शेंडे म्हणतात की, बनारस बाज शिकण्यासाठी थोडा भारदस्त आवाज असेल तर चांगले. ठुमरीमध्ये दीपचंदी हा भारदस्त आणि मुख्य ताल आहे. शोभा गुर्टू त्याला 'ठुमरीचा प्राण ताल' असे म्हणत. बनारस ठुमरी ही बनारसचे जीवन जसे आहे तशी आहे. ही ठुमरी नृत्याशी निगडीत आहे. 'मै तो खेलुंगी होरी उन्हीसे' याला 'धागेना धागेतीन्, नागेना नागेतीन्' असा चाचर ताल लावला आहे. शोभा गुर्टू, रसूलनबाई, सिध्देश्वरी देवी यांची शैली संथगती ख्यालाशी निगडीत आहे.

श्रीम. सुहासिनी कोरटकर म्हणतात की, 'बनारस ठुमरी म्हणजे भारदस्त म्हणजे तो ख्यालच. एक भावपूर्ण ख्याल असे आपण म्हणू शकतो. ही एक मॅच्युअर ठुमरी आहे. ती ऐकायला श्रोत्यांमध्येही मॅच्युरिटी असावी लागते. तिचा जो विस्तार असतो तो विलंबित याने चयन से होता है। तिथे घाई नसते, की मुर्क्या नसतात. तिथे एक विस्तार असतो आणि तो चयनदार विस्तार असतो. त्याच्यात बोल से बात पैदा करना, बात से बात पैदा करना हे जे काही आहे ते सगळे विस्ताराने होत असते.'

ठुमरीप्रमाणे बनारसी अंगाचा दादरा हा प्रकारही प्रसिध्द आहे. बनारस ढंगाच्या दादऱ्यामध्ये ठुमरीच्याच गायकीचा विस्तार असल्यामुळे त्यांचे दादरे उत्तान शृंगार, रसपूर्ण काव्य, जलद खटके, मुर्क्यांनी युक्त स्वराकृती व शब्दांचे अनावश्यक आघात या कलात्मक सौंदर्याला मारक ठरणाऱ्या गोष्टींपासून दूर आहेत. सुप्रसिध्द ठुमरी गायिका स्व. रसूलनबाई यांचा स्वरशब्दलयाकृती यांनी युक्त असा एक दादरा आहे.

कंकर मोहे लग जइये ना रे
कंकर लगने की कछ डर नाही
गगर मोरी फूट जइये ना रे ।। १।।
गगर फुटने की कछ डर नाही
चुनर मोरी भीग जइये ना रे ।। २।।
चुनर भिगने की कछ डर नाही
बलम मोरा रूढ जइये ना रे ।। ३।।



Scanned by CamScanner

यानंतर पुन्हा ध्रुवपदाकडे उलट प्रवास सुरू होऊन ध्रुवपदावर हा दादरा संपतो.

अशाप्रकारे ठुमरी व दादरा यांच्या प्रसार व प्रचारामध्ये बनारस शैलीचे मोठे योगदान आहे.

निष्कर्ष :

१) बनारस शैली गाण्याकरिता स्वरांमध्ये व आवाजामध्ये भारदस्तपणा आवश्यक आहे.

२) शास्त्रीय संगीताची तालीम ही शैली गाण्याकरिता आवश्यक आहे असे वाटते. शास्त्रीय संगीत गायनाने आवाजात व मांडणीमध्ये भारदस्तपणा येतो. विचारांची एक बैठक मिळते.अनेक बनारस शैली गाणाऱ्या गायक–गायिका उत्तम ख्याल गाणाऱ्या आहेत असे दिसून येते. असे असले तरी शास्त्रीय गायनाच्या तालमीबरोबरच या शैलीचा स्वतंत्र अभ्यास करणे आवश्यक वाटते. केवळ उत्तम शास्त्रीय संगीत गाणारा कलाकार उत्तम बनारसी शैली गाईल असे सांगता येत नाही.

१) आजकाल मैफिलीमध्ये जी ठुमरी ऐकायला मिळते ती बहुतांशी प्रचलित सर्व शैलींचे मिश्रण असलेली ठुमरी ऐकायला मिळते. हाताच्या बोटावर मोजण्याएवढ्या कलाकारांनी विशिष्ट शैलीचा सखोल अभ्यास केल्याचे निदर्शनास येते. परंतु बनारस शैली गाणारे उत्तमोत्तम कलाकार आजही ही शैली प्रचलित करण्याचे कार्य करत आहेत.

२) शास्त्रीय संगीताप्रमाणे किंबहुना शास्त्रीय संगीताएवढीच उपशास्त्रीय संगीतामधील बनारस शैली महत्त्वाची शैली आहे. एकूण 'पूरब बाज' हा ठुमरी गायनातील महत्त्वाचा बाज आहे. या बाजाचा इतर सर्व ठुमरी शैलींवर प्रभाव पडला आहे.

संदर्भ ग्रंथ :

१) **ठुमरी विशेषांक** – अखिल भारतीय गांधर्व महाविद्यालय मंडळ, १९९१.

२) **गायिका अन् गायकी** – डॉ. शुभदा कुलकर्णी – अमलताश प्रकाशन, २०११.

३) **ठुमरी** – चित्रा मोडक – विजय प्रकाशन, २००९

४) **ठुमरी एवं महिला कलाकार** – पूर्णिमा द्विवेदी – अनुभव पब्लिशिंग हाऊस, इलाहाबाद, २००९.



Scanned by CamScanner

# नवाबकालीन वऱ्हाडची कृषी व्यवस्था

**हर्षवर्धन सु. भुसारी ,** इतिहास विभाग,अतुल जगताप कला कनिष्ठ महाविद्यालय, चांदूर रेल्वे, जि.अमरावती. मोबा. ७७०९११७६०२

**प्रस्तावना:** नवाबाने इग्रजांची मदत घेऊन १८०३ मध्ये नागपूरकर भोसल्यांचा पराभव केला आणि नागपूरकर भोसल्याकडून १८०४ मध्ये वऱ्हाड हैद्राबादच्या तहानुसार नवाबाकडे गेला. सधारणतः वऱ्हाड अमरावती, अकोला, यवतमाळ व बुलढाणा या चार जिल्ह्याचा समावेश होतो. वऱ्हाड हा पूर्वीपासूनच कृषी प्रधान प्रदेश आहे. येथील ७२ टक्के लोक शेतीवर अवलंबून आहेत. विदर्भातील शेतकरी ज्वारी, गहू, कापूस, कडधान्य ही पीके घेतात, वऱ्हाडची कृषी ही बऱ्याच अंशी पावसाच्या पाण्यावर अवलंबून होती. वऱ्हाडात असलेल्या नद्या पूर्णा, वर्धा या नद्या उन्हाळ्यात कोरड्या पडतात. कालव्याची व्यवस्था नाही. परंतू काही ठिकाणी विहीरीना पाणी असल्यामुळे विहीरीच्या पाण्यावर शेतकरी पीके घेत असत. वऱ्हाडात अनेक पिके होत असली तरी त्यात सर्वात महत्वाचे कापसाचे पीक मोठ्या प्रमाणात होते. कारण वऱ्हाडची जमीन कापसासाठी उपयुक्त असून ती काळी व कसदार आहे. देशातील सर्व जमीनीपैकी वऱ्हाडची जमीन कापसाच्या पिकासाठी उत्तम समजली जाते. त्यात अमरावती, अकोला, यवतमाळ, व बुलढाणा या जिल्ह्याचा समावेश होतो.

**अ) कापूस व्यवसाय -**

वऱ्हाडात कापूस व्यवसाय हा जूना आहे. या व्यवसायाची प्रगती झाली ती इ.स. १८२५ नंतर शेतकरी लोकांना आगाऊ पैसे देऊन कापूस पिकाविण्याचा प्रघात प्रथमतः पेस्तनजीया सावकाराने पाडला पेस्तनजीच्या प्रोत्साहनानेच वऱ्हाडात सर्वप्रथम कापसाची पेरणी झाली. शेतकरी कापसाचे पीक घेवून लागला व अन्य पिकाविना त्याला चार पैसे जास्त मिळू लागले. अशाप्रकारे कापसाची पांढरी शेते, पांढरे सेने पिकवू लागले. पेस्तनर्जीनी वऱ्हाडातून सर्वप्रथम इ.स. १९२५-२६ मध्ये मुंबई येथे कापूस पाठविला. त्यावेळी रेल्वे व ट्रक्स या दळणवळणाच्या साधनांची व्यवस्था नसल्यामुळे वऱ्हाडातील कापूस हा बैलगाडीने मुंबई येथे नेण्यात येत होता. चार पैसे हातात आल्याने वऱ्हाडात कापूस उत्पादनात सतत वाढ झाली.

ती खालील आकड्यांवरून स्पष्ट होते.

| अ.क्र. | इ.स. | कापसाचे उत्पन्न / शेकडा |
|---|---|---|
| १. | १८७२ | २२ |
| २. | १८८९ | २८ |
| ३. | १९०२ | ३२ |
| ४. | १९०७-०८ | ४३ |

आज सर्व भारतात वऱ्हाड हा कापसाचा मुख्य प्रांत होऊन बसला आहे व वऱ्हाडची सर्व संपत्ती कापसावर अवलंबून आहे. अमरावती हे कापूस व्यापाराचे सर्वात मोठे केंद्र असल्याने अमरावतीचे नाव संपूर्ण कापूस भागासाठी वापरले जाते.

अमरावतीचे सावकार शेठ धनराज पोखरमल यांनी या धंद्यात विशेष लक्ष पुरविले होते. हैद्राबादचा इंग्रज रेसिडेन्ट कॅप्टन रेनॉल्डने १९४५ साली ब्रिटीश सरकारला एक अहवाल पाठविला. त्यात तो लिहितो अमरावती शहर हे एक व्यापारी भरभराटीचे शहर असून या ठिकाणी मारवाडी व काही उत्तर भारताचे सावकार आहेत. अमरावती ही कापसाची फार मोठी बाजारपेठ होती. येथून मिर्झापूर मार्गे कलकत्ता येथे पाठविल्या जाणाऱ्या कापसाची किंमत ७५० पौंडाला ५४ रूपये होती. एका बंजाऱ्याला एका बैलगाडीचे (२४० पौंड) ७ रूपये अमरावती ते मिर्झापूर पर्यंत गाडी भाडे मिळत. अमरावती ते इंग्लंडला कापूस पाठविला जाई. त्याची सरासरी किंमत पुढीलप्रमाणे-

एक पौंड कापसाची किंमत

| | |
|---|---|
| कापसाचे मूल्य | १.५ |
| कर | ०.१(०) |
| दर मैलाचा प्रवास खर्च | ०.३७ |
| जहाजात माल चढविण्याचा खर्च | ०.२ (०) |
| इंग्लंडपर्यंत जहाज भाडे | ०.५२ |
| एक पौंड कापसाची एकूण किंमत | २.६९ |

अशाप्रकारे अमरावतीवरून कापूस खरेदी करून प्रथम खुश्कीच्या मार्गाने व नंतर जलमार्गाने इंग्लंडपर्यंत पोहोचविणे इत्यादी खर्चासह एक पौंड कापसाला २.६९ इतकी किंमत त्यावेळी पडत असे. यासाठी ब्रिटीशांनी आपल्या काळात वऱ्हाडातून कापूस वाहून नेण्यासाठी रेल्वे वऱ्हाडात आणली व त्याची मुहूर्तपेढी १८५९-६० मध्ये रोवल्या गेली व वऱ्हाड कापसाची हुकूमी बाजारपेठ ठरली. कारण त्याकाळी वऱ्हाडात कापसाला स्वतंत्र अशी बाजारपेठ नव्हती व शेतकऱ्याची सावकार वर्ग मोठ्या प्रमाणात लूट करत असे.

वऱ्हाडचा कापूस हा अतिशय उच्च दर्जाचा असा होता. मि. मेसर यांनी १९४३ मध्ये अमरावतीचा कापूस मिर्झापूर येथे तपासला असता त्यात कोणत्याही प्रकारची भेसळ नव्हती. चांगला रंग, मृद व लांब धाग्याचा होता. यातून तत्कालीन वऱ्हाडच्या शेतकऱ्याची प्रामाणिकता स्पष्ट होते.

अमरावतीच्या कॉटनला मँचेस्टमध्ये मोठ्या प्रमाणात प्रसिद्धी होती. अमरावतीला जाणारा कापूस हा अचलपूरमधून मोठ्या प्रमाणात जात असे. कारण या भागात मोठ्या प्रमाणात कापसाचे उत्पादन होत असे. म्हणूनच ब्रिटीशांनी रेल्वेचे जाळे अचलपूरपर्यंत नेलेले दिसून येते. हे असतांना सुद्धा वऱ्हाडचा शेतकरी नवाबाच्या काळात गरीबच होता. असे असतांना सुद्धा अचलपूर सारखे शहर अतिशय समृद्ध होते.



Scanned by CamScanner

ISSN 2277-8063

म्हणूनच १८४५ च्या दुष्काळावर एकाचा वर्षात मात करत पुर्वस्थितीत इथला शेतकरी आलेला दिसून येतो. एवढी आर्थिक क्षमता नवाबाच्या ढासळत्या काळातही इथल्या शेतकऱ्यांमध्ये होती ही बाब लक्षणीय मानायला पाहिजे.

**ब) विविध व्यवसाय :-** नवाबाच्या काळात वऱ्हाडच्या अर्थव्यवस्थेचा मुख्य पाया हा शेती व कृषीवर आधारीत होता. आणि म्हणूनच शेतीव्यतिरिक्त जे व्यवसाय वऱ्हाडात होत असे ते संपूर्णतः शेतीवरच अवलंबून असायचे. वस्तू निर्मिती करणारे लोक वंशपरंपरागत वस्तू निर्माण करू लागले. त्यामुळे वस्तूच्या निर्मितीत अनेक प्रकारे प्रगती होत गेली. या प्रगतीतूनच विविध वस्तूंचे विविध व्यवसाय निर्माण झाले.

भारत हा कृषिप्रधान देश आहे. वऱ्हाडात प्रामुख्याने कृषिवर आधारीत अनेक व उद्योगधंदे चालत. त्यातील मुख्य व्यवसाय पुढीलप्रमाणे-

१) **कापड व्यवसाय :-** उपलब्ध पुराव्यावरून वऱ्हाडात कापसाचे उत्पादन प्राचीन काळापासूनच झाल्याचे आढळते. नवाबी काळात कापसाचे उत्पादन मोठ्या प्रमाणात होत असे. या कापसावर आधारीत कापड व्यवसाय वऱ्हाडात मोठ्या प्रमाणात होत असे. कापसाच्या उत्पादनानंतर त्यातून रूई व सरकी वेगळी केली जाई व रूईद्वारे सूत कातल्या जात. सूत कातण्याचे अनेक कारखाने वऱ्हाडात होते. तसेच सुतापासून कापड विणल्या जात असे. वऱ्हाडात कापड मोठ्या प्रमाणात निर्माण होत असे. एलिचपूर (अचलपूर), बाळापूर, खोलापूर येथे उत्तम प्रकारचे कापड विणल्या जात असे. वऱ्हाडच्या कापडाची मागणी वऱ्हाडबाहेरही मोठ्या प्रमाणात होती=

एलिचपूरच्या नवाबाचा कारभार वऱ्हाडात होता. तसेच त्याची जहाँगीर असलेले बाळापूर येथील कापूस अतिशय प्रसिद्ध होते. त्याची मागणी मोठ्या प्रमाणात होती. बाळापूर व्यतिरिक्त वस्तगुल्म (वाशिम) येथील कापड पेशव्याला पुरविल्या जात असे. वऱ्हाडात मोठ्या प्रमाणात निर्माण होत असल्याने वेगवेगळ्या प्रकारे कापडाचे प्रकार निर्माण झाले होते. आवश्यकतेनूसार त्यांचे विविध प्रकार होते. त्यातील मुख्य व प्रसिद्ध प्रकारात खादी, रूमाल, पागोटे, पटके, रेशीमकाठी, साड्या इत्यादी अचलपूरसारख्या ठिकाणी होत असे.

२) **विणकर व्यवसाय :-** नागरी व्यवसायात विणकर व्यवसाय मोठ्या प्रमाणात होता. अचलपूरसारख्या शहराचा विणकर व्यवसायामध्ये लक्षणीय वाटा होता. शेतीपासून मिळणाऱ्या कापसाचे कापड तयार करण्यासाठी सूतकताई व त्यापासून कापड निर्माण करणाऱ्या मंडळींना कोष्टी नावाने ओळखले जात. अचलपूरच्या विणकरांचा माल भारतात दूरपर्यंत विकला जात असे. यामध्ये पागोटा, साड्या, लुगडे, रूमाल, सतरंज्या इत्यादींसोबत रेशीम व्यवसायही होता. डोंगरातील रेशीम किड्यापासून रेशीम मिळत असे. तसेच ते मोठ्या प्रमाणात आयातसुद्धा केल्या जात.

३) **लाकूड व वनोपज व्यवसाय :-** उत्तरेस सातपुडा पर्वत आहे व त्यात मेळघाट पर्वत. या मेळघाटमध्ये सागाचे वृक्ष मोठ्या प्रमाणात मिळतात. सागाचे अतिशय चांगल्या दर्जाचे लाकूड मेळघाटच्या जंगलात निर्माण होते. सोबतच इतर वनोपज ज्यात राळ, डिंक, औषधी वनस्पती इत्यादी मोठ्या प्रमाणात उपलब्ध होता. या वनस्पतीचे रक्षण, त्याचे उत्पादन करणारी जात म्हणजे कोरकू. ते जंगलातील लाकूड बाजारपेठेत विकत. या लाकडापासून उत्तम विविध वस्तू निर्माण करण्याचा व्यवसायसुद्धा चालत असे. लाकडावर कोरीव नक्षीकाम करण्याचा व्यवसाय त्यावेळी चाले. त्यावेळी विविध रोगावर उपचार करण्यासाठी हकीम जंगलातील औषधी वनस्पतीचा वापर करीत असे. तसेच यात मधाचासुद्धा उपयोग केल्या जात. त्यामुळे त्याची मोठ्या प्रमाणात मागणी होती.

**क) वऱ्हाडची सामान्य आर्थिक परिस्थिती :-**

वऱ्हाडात निजामकाळापासून जमीन महसूलाची उत्तम व्यवस्था राखण्यासाठी देशमुख, देशपांडे यांना मोठ्या प्रमाणात जमिनीचे वाटप करण्यात आले होते. दोन्ही जमीनदार (देशमुख, देशपांडे) आपल्या ताब्यात शेकडो एकर जमिनी आपल्या नावावर ठेवत व गरीब शेतकरी कुळे त्यांच्या शेतावर राबत असे. त्यामुळे श्रीमंत जास्त श्रीमंत व गरीब जास्त गरीब होत असत. परंतु हे जमिनदार स्वतः शेती न करता आपल्या जमिनीवर कुळांना नेमत व त्यांच्याकडून नियमित उत्पन्न घेत. पावसाच्या मर्जीमुळे किंवा इतर नैसर्गिक आपत्तीमुळे शेतकऱ्यांचे नुकसान झाल्यास शेतकऱ्यांना कोणीही मदत करीत नसे.

वऱ्हाडमध्ये उत्पन्नाचा सर्वात मोठा हिस्सा जमीन महसुलद्वारे मिळत असे. जमीन महसुलाच्या वसुलीची व्यवस्था नवाबाने आपल्या अधिकारात निर्माण केली होती. जमिनीचे मोठे तुकडे वहिवाटीने नवाब, देशमुख, देशपांडे यांना दिलेले होते. काही जमिनी जमीनदारांना दिल्या होत्या. त्यासुद्धा वहिवाटीने चालत. काही जमिनी लिलावद्वारे इजाऱ्याने दिल्या जात. त्या विशिष्ट काळासाठी विशिष्ट रकमेत इजारदाराकडे राहत. हे इजारेसुद्धा पुढे-पुढे जवळ-जवळ कायमस्वरूपी बनले. काही जमिनी कर्तृत्त्वाने बक्षिस रूपात दिल्या जात. त्यांना इनामदाऱ्या म्हणत. त्या करमुक्त असत. याशिवाय प्रत्येक गावामध्ये करमुक्त असलेली गावच्या वतनदार पाटलाची जमीन असे. या जमिनीत जी महसूल आकारणी असे ती आकारणी देशमुख, देशपांडे, जहांगीरदार, इनामदार, पाटील हे वतनदार लोक सरकारात भरणा करीत. वसुली यंत्रणेवर नवाबाचा तसा वसुली खर्च कमी होता. पण या यंत्रणेवर त्याचे नियंत्रण मात्र मुळीच नव्हते. ही वतनदार मंडळी शेती स्वत: करीत नसत. त्या परिसरातील कुळांना शेतजमिनीचे पट्टे लागवडीसाठी देत असत. या कुळांना शेतकरी म्हणत. शेतजमिनी त्यांच्या मालकीच्या नव्हत्या. ही कुळे आपल्या परिसरातील मजुरांना नगदी वा धान्य रूपाने मजुरी देऊन शेतीतून उत्पन्न काढीत असे. या उत्पन्नातून बहुतांशी उत्पन्न मालक असलेल्या वतनदार मंडळीला धान्यरूपाने अथवा विकून त्याच्या रकमा पोहोचत्या कराव्या लागत.

वऱ्हाडची शेती ही कोरडवाहू शेती होती. नैसर्गिक पावसावर व इतर नैसर्गिक घटकावर शेतीचे पिक अवलंबून होते. मोसमी पावसाची अनियमितता वारंवार आढळून येते. त्यातून अतिवृष्टी व अवर्षण, अकाली पाऊस व गारपीट या नैसर्गिक आपत्तीत वारंवार कोसळत. शेतीचे उत्पन्न वर्षोगणती बुडाले जाई. अशा स्थितीत शेतकऱ्यांना अर्थसहाय्य व शासनाकडून वा मालकाकडून सुट मिळण्याची गरज असे. शासन वतनदारांना सूट देत नसे व वतनदार कुळांना सूट देत नसे. परिणामी जवळचे पैस काढून शेतकरी जमीन मालकाचा उत्पादनाचा मोबदला पाठवित असे. शेत लागवडीसाठी शेतकरी सावकाराच्या जाळ्यात स्वत:हून शिरत असे. जमीन लागवडीला पैसा अपूरा पडल्यामुळे उत्पादनात घट होत असे, हा भाग वेगळाच. याशिवाय डाके, दरोडेखोरी, शेतीची नासाडी, पिकांच्या ढिगांची राखरांगोळी,



Scanned by CamScanner

सैन्याच्या धावपळीने शेती तुडविली जाणे हा भार शेतकऱ्यांवर पडत होता. एकूणच वतनदार मंडळीची स्थिती बऱ्यापैकी होती. शेतकरी कुळाची स्थिती मात्र दयनीय होती. त्यांना शासनाकडून कुठलीही सूट वा सवलत नव्हती.

नवाबाच्या काळात अनेक दुष्काळ पडलेले दिसून येतात. इ.स. १८४५-४६ मध्ये जनतेप्रती नवाबाला किती दया वाटत असली तरी कोणताही कृतीशील सहाय्याचा कार्यक्रम हाती घेतला नाही.

**ड) राजस्व व्यवस्था (Revenue System)**

दक्षिणेच्या सहा मोघल सुब्यात वऱ्हाडचा सुभा हा सर्वात जास्त सुपीक व उत्पन्न असणारा होता. म्हणूनच वऱ्हाडच्या सुभ्याचा ताबा मिळविण्याची स्पर्धा होती. नागपूरकर भोसल्यांच्या अधिपत्याखालील प्रदेश म्हणून साठ-चाळीशीच्या तहाने हा दोअमली प्रदेश बनला. या दोअमली काळात चाळीस टक्के हिस्सा नागपूर भोसल्यांना तर साठ टक्के निजामाला मिळत असे. भोसल्यांचे चाळीस टक्के उत्पन्न निघून गेल्यावर साठ टक्के उत्पन्नात राज्यकारभार सांभाळणे कठीण जात असे. अशाप्रकारे ही तारेवरची कसरत होती. कर्तृत्ववान नवाब गादीवर असेपर्यंत राजस्व व्यवस्था नीट चालत असे. पण कर्तृत्वहीन चैनी, विलासी नवाबाच्या काळात वऱ्हाडच्या अर्थव्यवस्थेला घसरगुंडी चालू झाली.

१८ व्या व १९ व्या शतकांच्या मध्यंतरी सरकारच्या उत्पन्नाचा मुख्य आधार कृषी राजस्व हा होता. जमीन सुपीक असल्याने तर आकारणी इतर प्रदेशापेक्षा जास्त होती. धान्य व इतर जीनसा स्वस्त असत. वऱ्हाडच्या जमिनीतून कापूस मुख्य पीक होते. याला वऱ्हाडचे पांढरे सोने असे म्हणत. कापसाची मुख्य बाजारपेठ अमरावती, आकोट व खामगांव येथे होती. या पेठेतील व्यापारी या पांढऱ्या सोन्याच्या भरवश्यावर खोऱ्याने पैसा जमवू लागले. या व्यापारावर कराची आकारणी असल्यामुळे नवाबाच्या उत्पन्नाचा मोठा हिस्सा या करातून मिळत असे. नवाबी काळापर्यंत निजामी वजीर मलिकअंबर याने अस्तित्त्वात आणलेली जमीन महसूल वसूल करण्याची पद्धत अस्तित्त्वात होती. निजाम व नागपूरकर भोसल्यात वऱ्हाडच्या उत्पन्नातून साठ-चाळीशीच्या तह झाल्यानंतरही ही पद्धती अस्तित्वात होती. इ.स. १८०३ मात्र वऱ्हाड पूर्णतः निजामाच्या अधिपत्याखाली आला. या आधिपासून निजामाचे आर्थिक परिस्थिती खालावली होती. या परिस्थितीतून बाहेर पडण्यासाठी आर्थिक परिस्थिती सुधारणे आवश्यक होते. त्याचा एक भाग म्हणूनच वऱ्हाडातील उत्पन्न मिळविण्याच्या दृष्टीने वऱ्हाडात मक्तेदारी पद्धती सुरू करण्यात आली.

**मक्तेदारी पद्धती :-**

सन १८०३ मध्ये वऱ्हाड निजामाच्या ताब्यात आल्यापासून त्या मुलुखाचा वसूल मक्त्याने देण्याची वहिवाट पडली. वऱ्हाडचा मक्ता ५२ लाख रूपयात देऊ लागला. वऱ्हाड हा सधन प्रांत असल्याने मक्तेदारास नफा होत असे. त्यामुळेच वऱ्हाडचा मक्ता घेण्यासाठी स्पर्धा चालत असे. त्याचा वशिला त्या भाग्यवान समजला जाई. अर्थातच जसे शेत मक्त्याने दिले जात असे. त्याचप्रमाणे निजाम (वऱ्हाड मक्त्याने देत होता) अशा स्थितीत प्रजेच्या सुख-सुविधांकडे कोण लक्ष देणार? मक्तेदाराचे एकच देय होते ते म्हणजे जास्तीत जास्त वसूली करणे.

आणखी उत्पन्नाचे साधन होते ते म्हणजे युद्धापासून मिळणारे धन आणि लुबाडणूक हे सुद्धा राज्याच्या उत्पन्नाचे साधन होते. ज्या मिळकतीवर कोणाचाही तावा नसे. अठराव्या शतकाची स्थिती अशी होती की ह्या अधिकाऱ्यांनी हा कर जुलमी पद्धतीने गोळा केला. त्याचा बोझा रयतेवरच होता व तो वसूल केल्या जाई.

**सारांश :-**

नवाबाच्या काळातील वऱ्हाडची कृषिव्यवस्था पाहत असताना वऱ्हाड हा अतिशय समृद्ध व संपन्न प्रदेश असल्याचे जाणवते. वऱ्हाडाची काळी व कसदार जमीन उत्पन्नासाठी पोषक अशीच होती. विशेषतः कापसाच्या उत्पन्नासाठी. या जमिनीला तोड नव्हता. परंतु अयोग्य व्यवस्थापनोमुळे तसेच जहांगीरदारी व्यवस्थेमुळे वऱ्हाडमधील शेतकऱ्याचे शोषण झालेले जाणवते. तसेच भोसले आणि निजाम यांचा शेतीसंदर्भात योग्य समन्वय नसल्याचे दिसून येते. त्यामुळे जहाँगीरदार, सावकार, मक्तेदारी व्यवस्था यासारख्या घटकाला वऱ्हाडचा शेतकरी बळी पडल्याचे दिसून येते.

१८५३ पर्यंत वऱ्हाडच्या कृषिव्यवस्थेसंदर्भात सुधारणावादी धोरण नकारात्मक स्वरूपाचे होते. १८५३ पासून मात्र कंपनी काळ सुरू झाला. व कंपनी काळापासून कृषीव्यवस्थेमध्ये अनेक सुधारणावादी पाऊले उचललेली दिसून येतात व परकीय सत्ता असतांना सुद्धा वऱ्हाडच्या शेतकऱ्याच्या स्थितीमध्ये बऱ्याचअंशी सुधारणा झालेली दिसून येते.

**संदर्भग्रंथ :-**

१. महाराष्ट्र स्टे गॅझेटियर, अमरावती जिल्हा, द्वितीय आवृत्ती, १९६९
२. हैद्राबाद अफेअर्स, खंड-१८८०.
३. काळे या. मा., वऱ्हाडचा इतिहास
४. कारंजकर भि. दे., अमरावती शहराचा इतिहास.
५. वक्काणी नि. आ., आधुनिक विदर्भ का इतिहास
६. Bhatt M.G., Berar under the Nizam
७. देशपांडे य. खु., एलिचपूर, वऱ्हाडची जुनी राजधानी



Scanned by CamScanner

Navjyot / Vol. V / Issue – II
ISSN 2277-8063

# आश्रमशाळा आणि भटका समाज

कु.सोनल विलास मंगल
संशोधन विदयार्थी, (एम.एस.डब्ल्यू) सायबर, कोल्हापूर मो. 8623923234 .7066254332

**प्रस्तावना :–**

भारतीय समाज हा अतिप्राचीन, साधारणपणे पाच हजार वर्षापासून वाटचाल करीत आलेला, गुंतागुंतीचा क्लिष्ट आणि सहज शोध घेणे अशक्य अशा स्वरूपाचा आहे. भारतीय समाजाचे ब्राम्हण, क्षत्रिय, वैश्य, शुद्र अशा चातुवर्ण समाज रचनेत विघटन झाले आहे. व्यक्तीच्या जातीवरून त्याचे समाजात स्थान, दर्जा व प्रतिष्ठा निश्चित केली जाते. ब्राम्हण ही उच्च जात त्यामुळे या जातीतील कर्तृत्वहीन व्यक्ती ही प्रतिष्ठीत समजण्यात येते. मात्र शुद्र जातीतील व्यक्ती कर्तृत्ववान असली तरी ती अप्रतिष्ठित हीन दर्जाची उच्च – निच्चतेच्या या भारतीय समाजात असा ही एक समाज :. ज्याला या वरिष्ठ कनिष्ठ जाती व्यवस्थेमध्ये कोठेही स्थान नाही. तो समाज म्हणजे विमुक्त जाती भटक्या जमाती. या जमातीना वेशींच्या आत जागा नाही आणि वेशीच्या बाहेरही स्थान नाही परंतु हा समाज स्थायी समाजाच्या आश्रयाने पिढयान्‌पिढया उपजिविका करीत आहे. अशा या अस्थिर समाजाला मुख्य प्रवाहात आणण्यासाठी शासनाने अनेक कल्याणकारी योजना अंमलात आणल्या आहेत. त्यापैकी या समाजातील शिक्षणापासून वंचित असणाऱ्या मुला मुलींसाठी ''आश्रमशाळा'' ही योजना राबवण्यात आली आहे.

**विमुक्त जाती भटक्या जमाती पार्श्वभूमी :–**

आर्याच्या टोळयांचे अनेक वर्ष भारतावर आक्रमण होत राहिले. आर्यानी देशातील द्रवीड लोकांवर प्रथम सौम्य हल्ले करण्यास सुरूवात केली. आर्य हे रानटी, कलाकौशल्य हीन होते. द्रवीडांनी देखील प्रतिकार करण्यास सुरुवात केली मात्र आर्यनी हे त्यांच्यावर जबरदस्त हल्ले केल्याने त्याचा उपयोग झाला नाही. अशा या पराभूत टोळयातील लोक मात्र आपले घरदार मालमत्ता सोडून केवळ भ्रमंती करीत राहिले. त्यांनी स्थिर जीवन कधीही अंगीकारले नाही. आर्य कला, कौशल्यहीन असल्याने जंगलात, रानावनात पळून गेलेल्यांना उपजिविकेच्या साधनाचे आमिष दाखवून त्यांना गुलाम केले.

या काळात कंपनी सरकार संपुष्टात येवून देशाचा कारभार इंग्रजांच्या हाती गेला. इंग्रज देशाचे राज्यकर्ते झाले. इंग्रजांचे संपूर्ण लक्ष व्यवसायावर आणि राज्यकारभारावर होते. त्यामुळे देशाची सुव्यवस्था कोलमडली. देशात गुन्हेगारीला पेव फुटले. लोकांनी वारंवार तक्रारी करून शासनाचे लक्ष याकडे वळवले. मात्र शासनाकडून फक्त आश्वासने मिळत राहिली. अस्थिर सरकार गुन्हेगारीला आळा बसवू शकले नाही. लोकांचा तक्रारीचा सुर कायमच राहिला. यावेळी खास चौकशी करून 1871 ला गुन्हेगारी कायदा देशात लागू केला. या कायदया अंतर्गत 14 जाती गुन्हेगार ठरवण्यात आल्या. त्यानुसार लोकांना सुरक्षित जीवन जगता यावे म्हणून या गुन्हेगार जातीतील 14 जातींना कुंपणात बंधीस्त करण्यात आले. या जातींसाठी विविध ठिकाणी वसाहती स्थापन करून तारेच्या कुंपनात बंधीस्त करण्यात आले. या कायदयाने जातच गुन्हेगार असल्याचे ठरवल्याने या जातीत जन्मास येणारे प्रत्येक मूल गुन्हेगारीचा कलंक माथ्यावर घेवूनच जन्मास येवू लागले.

या तारेच्या वसाहती म्हणजे काटेरी तारांचे एकातएक वर्तुळाकार असणारे विभाग असत. सर्वात मध्यभागी आटल गुन्हेगार समजली जाणारी कुटुंबे ठेवली जात. त्यानंतर त्याहून कमी गुन्हेगार समजली जाणारी कुटुंबे अशी त्या वसाहतीची रचना असे. वसाहतींना पोलीसांचा कडक पहारा, सरकारी परवानगी शिवाय कोणीही आत जाऊ शकत नसे. रात्री – अपरात्री हजेरी होत असे. हजेरी चुकवली की छळ होत असे अशा प्रकारे या वसाहतीत लोकांचे हाल, छळ होऊ लागले.. वसाहतीतील काही समजंस लोकांनी वसाहतीत होणारे हालअपेष्टा राज्याचे मुख्यमंत्री आणि देशाच्या पंतप्रधानापर्यंत वारंवार भेटून पटवून दिल्या. तत्कालीन पंतप्रधान पं. जवाहरलाल नेहरू यांनी 11 एप्रिल 1960 रोजी आखिल भारतीय पातळीवरचे गुन्हेगारी जाती – जमाती अधिवेशन सोलापूर येथे भरवले. त्यावेळी वसाहतीतील लोकांनी वस्तूस्थिती पाहून त्या लोकांना मुक्त करण्याचे आदेश मुख्यमंत्र्यांना दिले. तेंव्हापासून त्या 14 जाती तारेच्या कुंपनातून मुक्त झाल्या तेंव्हापासून त्या 'विमुक्त' जाती म्हणून ओळखल्या जाऊ लागल्या. वसाहतीतून मुक्त झालेल्या 14 जाती व उर्वरित 28 अशा 42 भटक्या – विमुक्त जाती उपजीविकेच्या साधना अभावी अद्यापही भटके जीवन जगत राहिल्या. विमुक्तांना स्वातंत्र्य देवून नव्या सामाजीक, आर्थिक व शैक्षणिक गुलामगिरीत ढकलण्यात आले. निदान त्या तुरूंगात इंग्रज सरकारने शिक्षणाची आणि रोजगाराची तरी सोय केली होती.

**विमुक्त जाती, भटक्या जमाती समाज :**

विमुक्त जाती भटक्या जमातींना राहण्यासाठी कायमचे गाव नाही. उदरनिर्वाहाचे कायमस्वरूपाचे साधन नाही. अशा कारणांमुळे हा समाज आज इथं तर उदया तिथं असा भटकंती करत चरितार्थ चालवत आहे.



Scanned by CamScanner

ISSN 2277-8063

स्वातंत्र्यापूर्वी लागलेला गुन्हेगारीचा कलंक स्वातंत्र्यानंतरही तसाच राहिल्याने या समाजाला उजळमाथ्याने जगता येणे कठीण बनले आहे. भटके म्हणजे परदेशी, परके किंवा चोर, भामटे अशा दृष्टीनेच पूर्वीपासूनच गावगाड्याने त्यांच्याकडे पाहिले व तशी त्यांना वागणूक दिली.

स्थिर समाजाचे मनोरंजन करणे, गरजा भागवणे अशा स्वरूपाचे काम करून आपला व आपल्या कुटुंबाचा चरितार्थ कसाबसा भागवला जातो. आपला सततच्या भटकंतीच्या जीवनामुळे समाजाला अनेक समस्यांना तोंड दयावे लागते. अस्थिर जीवन, आरोग्य विषयक समस्या, शैक्षणिक दुरावस्था, दारिद्रय, अज्ञान, अंधश्रध्दा, व्यसनाधीनता, सामाजिक समस्या इ. समस्या पिढ्यानपिढ्या हा समाज भोगत आलेला आहे.

अशा या दुर्बल, दुर्लक्षीत समाजाने आपले एक स्वतंत्र जग निर्माण केले आहे. परंपरेने चालत आलेल्या रूढी, जाचक अटी, चालीरिती, अनिष्ठ प्रथा अशा विचित्र जगात राहणारा हा समाज विकासापासून खूप दूर फेकला गेला आहे. विमुक्त जाती भटक्या जमातीची खास काही वैशिष्टये आहेत, ती पुढीलप्रमाणे : या समाजाला जातीव्यवस्थेत कोठेही स्थान नाही, उदरनिर्वाहासाठी भटकंतीचे जीवन अवलंबले आहे, स्थायी समाजापासून आपले वेगळेपण टिकवण्यासाठी गुप्त व सांकेतीक भाषा या जातीजमातीमध्ये आढळून येतात. उघडयावरचे अस्थिर जीवनामुळे समाजात देव–देवतांवर प्रचंड विश्वास दिसून येतो, यातूनच अंधश्रध्दा वाढण्यास प्रचंड वाव मिळतो. समाजाची स्वतंत्र संस्कृती जपून ठेवण्यासाठी परंपरागत चालत आलेल्या रूढी, चालीरितींच्या दृष्टचक्रात समाज पिचत पडला आहे या परंपरा समाजाने मौखिक पध्दतीने एका पिढीकडून दुसऱ्या पिढीकडे संक्रमीत केल्या आहेत. प्रत्येक जात आपल्या जातीविषयक दंतकथा सांगत असल्याने जाती, पोटजातीमध्ये श्रेष्ठत्वाची भावना असल्याचे आढळून येते. जन्मापासून –मृत्यूपर्यंतचे असणारे सर्व विधीमध्ये विविधता व वैशिष्टयपूर्णता दिसून येते. जन्मतःच गुन्हेगार हा शिक्का व उत्पन्नाचे साधन परांपरागत असल्याने आर्थिक स्थिती पूर्ण कोलमडलेली दिसून येते. दारिद्रय, व्यवसनाधिनता याचे साम्राज्य समाजावर वर्षानुवर्षे टिकून आहे. सर्वात महत्वाचे भटक्या विमुक्त जाती जमातींचे वैशिष्टये म्हणजे 'जातपंचायत'. या समाजात न्यायदानाचे कार्य जातपंचायती मार्फत होते. कोणत्याही प्रकारचे तंटे सोडवले जातात. गुन्हेगार व्यक्तीस शासन, शिक्षा दिली जाते. संपूर्ण समाजावर जातपंचायतीची घट्ट पकड आहे. कोणतीही व्यक्ती जातपंचायतीच्या विरूध्द जाण्याचे धाडस करत नाही. अशा या अलिप्त वैविध्यपूर्ण जीवनपध्दतीमुळे समाज विकासापासून दूर फेकला गेला आहे.

**विमुक्त भटक्या जमाती – आश्रमशाळा :**

भटकंतीच्या जीवनामुळे विमुक्त जाती भटक्या जमातीमध्ये शिक्षणाचे प्रमाण अत्यल्प आहे. या समाजाच्या सर्वांगिण विकास करण्यासाठी शिक्षणाशिवाय तरणोपाय नाही. शिक्षण हे समाज परिवर्तनाचे साधन आहे. समाज विकासासाठी शिक्षण आवश्यक आहे. भटक्या विमुक्त जाती जमातीमध्ये असणाऱ्या अशिक्षितपणाला सामाजिक, आर्थिक कारणे कारणीभूत आहेत. शिक्षणामुळे आपली मुले उध्दट बनतील, समाजापासून अलिप्त राहतील ही भावना त्यांच्या मनात दृढ झालेली आहे. त्याच बरोबर मुले कुटुंबाला आर्थिक हातभार लावत असल्याने पालक मुलांना शिक्षण घेण्यासाठी प्रोत्साहीत करत नाहीत. अशा विचित्र परिस्थितीत डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी पिचत पडलेल्या माणसाला घटनेद्वारे सामाजिक, राजकीय, आर्थिक आणि शैक्षणिक या विकासात्मक प्रवाहात सामिल होण्याचा हक्क मिळवून दिला आणि म्हणून या देशातील दीन, दलित, पददलित, भटके, विमुक्त, आदिवासी माणसाने शिक्षण घेण्यास सुरूवात केली.

शासनाने विमुक्त जाती भटक्या जमातीच्या सर्वांगिन विकासासाठी अनेक कल्याणकारी योजना आंमलात आणल्या. या समाजाचा शैक्षणिक विकास साधण्यासाठी 'आश्रमशाळा' ही योजना शासनाने अंमलात आणली. मात्र पिढ्यानपिढ्या शिक्षणाचा गंध नसणाऱ्या या समाजाला ज्ञानार्जनाचे काम केवळ शासनाकडून होणे शक्य नाही. यासाठी स्थायी समाजातील स्वयंसेवी संस्थानी हातभार लावण्याची आवश्यकता निर्माण झाली. विमुक्त जाती भटक्या जमातीच्या शैक्षणिक हित व उन्नतीसाठी आश्रमशाळा मोलाची ठरली आहे.

आश्रमशाळहा ही योजना सन 1953 पासून महाराष्ट्र राज्यात अंमलात आली. अस्थिर जीवन पध्दतीमुळे व आर्थिक मागासलेपणामुळे विमुक्त जाती भटक्या जमातीच्या मुलांना शिक्षण घेता येत नाही. या योजनेचा मुख्य हेतू त्यांना अस्थिर जीवनपध्दतीपासून परावृत्त करून शिक्षित करणे असा आहे. आश्रमशाळा या स्वयंसेवी संस्थामार्फत चालवण्यात येतात. शासनामार्फत या संस्थेस अनुदानातून आर्थिक सहाय्य प्राप्त होते. आश्रमशाळा या निवासी शाळा असून येथील निवासी विदयार्थ्यांना मोफत राहण्याची, जेवणाची सोय उपलब्ध करून देण्यात येते. निवासी विदयार्थी हे विमुक्त जाती भटक्या जमातीतील असतात. निवासी विदयार्थ्यांना गणवेश, लेखन साहित्य, पुस्तके, आंथरून, पांघरून इ. सोयी सुविधा विनामुल्य पुरविण्यात येतात. निवासी विदयार्थ्यांना गणवेश, लेखन साहित्य, पुस्तके पांघरून इ.सोयी सुविधा विनामुल्य पुरविण्यात येतात. याशिवाय इतर समाजातील विदयार्थ्यांना अनिवासी (डे स्कॉलर) म्हणून प्रवेश दिला जातो. मात्र या विदयार्थ्यांना प्रवेश फक्त शिक्षणापूरता मर्यादित असतो.



Scanned by CamScanner

आश्रमशाळा या निवासी शाळा असल्याने वसतीगृहाचे नियंत्रण सामाजिक न्याय विभागाकडे असून शिक्षण विभागाच्या नियंत्रणाखाली शैक्षणिक बाबी, अभ्यासक्रम, परिक्षा इ.गोष्टींचा समावेश होतो. आश्रमशाळा या प्राथमिक, माध्यमिक आणि उच्च माध्यमिक स्वरूपात काम करतात. सद्य स्थितीत महाराष्ट्र राज्यामध्ये 526 प्राथमिक आश्रमशाळा, 296 माध्यमिक आश्रमशाळा, 149 उच्च माध्यमिक आश्रमशाळा तसेच 1 विद्यानिकेतन आणि 2 ऊसतोड कामगारांच्या मुलांसाठी आश्रमशाळा अशा एकूण 973 आश्रमशाळा कार्यरत आहेत. आश्रमशाळेतील विदयार्थ्याचा शैक्षणिक, सांस्कृतिक व बौध्दिक विकास व्हावा यासाठी गुणवत्तापूर्ण शिक्षण आणि विविध उपक्रम यावर भर दिला जातो.

**आश्रमशाळा स्वरूप** :–महाराष्ट्रात कार्यरत असणाऱ्या स्वयंसेवी संस्था मार्फत चालवल्या जाणाऱ्या अनुदानप्राप्त प्राथमिक, माध्यमिक, उच्च माध्यमिक आश्रमशाळांचे स्वरूप खालीलप्रमाणे आहे.

**प्राथमिक आश्रमशाळा** :–इयत्ता 1 ली ते 4 थी (70 निवासी विदयार्थी), इयत्ता 1 ली ते 7 वी (120 निवासी विदयार्थी) प्रत्येक वर्गात 15 अनिवासी विदयार्थी प्रवेश मर्यादा आहे.

**माध्यमिक आश्रमशाळा** :–इयत्ता 5 वी ते 10 वी (170 निवासी विदयार्थी), इयत्ता 8 वी ते 10 वी (120 निवासी विदयार्थी) प्रत्येक वर्गात 15 अनिवासी विदयार्थी प्रवेश मर्यादा आहे.

**उच्च माध्यमिक आश्रमशाळा** :–इयत्ता 11 वी (20 निवासी विदयार्थी), इयत्ता 12 वी (20 निवासी विदयार्थी) प्रत्येक वर्गात 20 अनिवासी विदयार्थी प्रवेश मर्यादा आहे.

**कोल्हापूर जिल्हा – अनुदानित माध्यमिक आश्रमशाळा** :–

सदयस्थितीत महाराष्ट्र राज्यामध्ये 296 माध्यमिक आश्रमशाळा कार्यरत असून पुणे विभागात पाच जिल्हयामध्ये 73 माध्यमिक शाळा अस्तित्वात आहेत. या पाच जिल्हयापैकी एक जिल्हा म्हणजे कोल्हापूर. चालू घडीला कोल्हापूर जिल्हयामध्ये 14 प्राथमिक आश्रमशाळा 8 माध्यमिक आश्रमशाळा व 1 उच्च माध्यमिक आश्रमशाळा अस्तित्वात आहेत.

पी.एच.डी. संशोधनाकरीता कोल्हापूर जिल्हयातील 8 माध्यमिक आश्रमशाळांचा अभ्यास करण्यात आला. सदर संशोधनाचा विषय "कोल्हापूर जिल्हयातील अनुदानीत माध्यमिक आश्रमशाळामधील भटक्या विमुक्त जाती जमातीतील विदयार्थ्यांच्या अडचणी व शैक्षणिक विकास" असा निश्चित करून आठ आश्रमशाळांतील विदयार्थ्यांची प्रश्नावलीद्वारे माहिती संकलीत करण्यात आली. विदयार्थ्यांना शैक्षणिक व वसतीगृह बाबींवर विविध प्रश्न विचारण्यात आले. त्यापैकी काही प्रश्न पुढीलप्रमाणे आहेत.

**तक्ता क्र.1**

**आश्रमशाळा नसती तर तुमच्या मते कोणती बाब घडली असती**

| अ.क्र. | पर्याय | संख्या | शेकडा प्रमाण |
|---|---|---|---|
| 1. | जवळच्या शाळेत प्रवेश घेतला असता | 183 | 76.2 |
| 2. | शिक्षण घेतले नसते | 28 | 11.7 |
| 3. | खर्चाचे म्हणून इतर शाळेत प्रवेश घेतला नसता | 17 | 7.1 |
| 4. | कुटूंबाला आर्थिक मदत केली असती | 11 | 4.6 |
| 5 | इतर | 1 | 0.4 |

(संदर्भ – क्षेत्रकार्य)

वरिल संख्यात्मक माहितीवरून असे निदर्शनास येते की, सर्वात जास्त 76.2 टक्के विदयार्थीनी आश्रमशाळा नसती तर जवळच्या शाळेत प्रवेश घेतला असता, त्या खालोखाल 11.7 टक्के विदयार्थ्यांनी शिक्षण घेतले नसते. खूप कमी 7.1 टक्के विदयार्थ्यांनी खर्चाचे म्हणून इतर शाळेत प्रवेश घेतला नसता तर अत्यंत कमी 4.6 टक्के विदयार्थ्यांनी शिक्षण न घेता कुटुंबाला आर्थिक मदत केली असती असे संशोधनातून दिसून आलेले आहे.

**तक्ता क्र. 2**

**आश्रमशाळेत प्रवेश घेण्याचे कारण**

| अ.क्र. | पर्याय | संख्या | शेकडा प्रमाण |
|---|---|---|---|
| 1. | परिसरात एकच शाळा आहे | 13 | 5.40 |
| 2. | हिच शाळा चांगली आहे | 62 | 25.80 |
| 3. | इतरत्र शाळेत प्रवेश मिळाला नाही | 3 | 1.20 |
| 4. | नातेवाईकांनी याच शाळेत घातले | 21 | 8.80 |
| 5 | या शाळेत सर्व मोफत सोयी सुविधा मिळतात | 84 | 35.60 |
| 6 | पालकांवर शैक्षणिक खर्चाचा बोजा पडत नाही | 19 | 7.90 |



Scanned by CamScanner

| | | | |
|---|---|---|---|
| 7 | घरातील व्यसनाधीन वातावरणापासून दूर राहण्यासाठी | 10 | 4.20 |
| 8 | समाजातील रूढी, परंपरा, अंधश्रध्दापासून दूर राहण्यासाठी | 28 | 11.70 |
| | | 240 | 100 |

(संदर्भ – क्षेत्रकार्य)

आश्रमशाळेत प्रवेश घेण्याचे कारण कोणते हे वरिल तक्ता क्र. 2 मध्ये दर्शविले आहे. या शाळेत सर्व मोफत सोई सुविधा मिळतात असे सर्वाधिक 35 टक्के विदयार्थी सांगितले. त्या खालोखाल 25.8 टक्के विदयार्थ्यांनी हीच शाळा चांगली आहे असे मत मांडले. अत्यंत कमी म्हणणे 7.9 टक्के विदयार्थ्यांनी पालकांवर शैक्षणिक खर्चाचा बोजा पडत नाही असे अभ्यासाद्वारे दिसून येते.

**निष्कर्ष :–**

कोल्हापूर जिल्हयातील 8 माध्यमिक आश्रमशाळांतील निवासी विदयार्थ्यांचा अभ्यास केला असता असे दिसून येते की, शासनाने ज्या सहेतूने आश्रमशाळा योजना आंमलात आणली आहे ती काही प्रमाणात साध्य झालेली आहे. त्याचबरोबर ज्या संस्थामार्फत आश्रमशाळा चालविल्या जात आहेत. त्यांचे कार्यदेखील कौतुकास्पद आहे. आश्रमशाळेमुळे पिढयानपिढया शिक्षणाचा गंध नसलेली पिढी शिक्षणाच्या प्रवाहात येत आहे.

**संदर्भ :–**


1. रामनाथ चव्हाण – जाती आणि जमाती, मेहता पब्लिकेशन हाऊस, पुणे, प्रथमावृत्ती, एप्रिल 89
2. जाती अंताचा लढा – बुध्द ते कार्लमाक्स संकलन – शोभा चाळके
   जाती अंताचा लढा आणि अण्णाभाऊ साठे डॉ.गिरीश मोरे, प्रथमावृत्ती 10 मार्च, निर्मिती विचारमंच, कोल्हापूर
3. भारतातील भटके – विमुक्त इतिहास व संस्कृती – डॉ.राजेंद्र कुंभार, जागतिकीकरणाचा अवकाश आणि परिवर्तनाच्या चळवळी, दलितमित्र व्यंकाप्पा भोसले कार्य गौरव ग्रंथ, संपादक : डॉ. शरद गायकवाड.
4. व्यंकाप्पा भोसले आणि भटके – विमुक्तांची चळवळ – डॉ.जयसिंगराव पवार, जागतिकीकरणाचा अवकाश आणि परिवर्तनाच्या चळवळी, दलितमित्र व्यंकाप्पा भोसले कार्य गौरव ग्रंथ, संपादक : डॉ. शरद गायकवाड.
5. रामनाथ चव्हाण – भटक्या विमुक्तांची जातपंचायत, देशमुख आणि कंपनी पब्लिशर्स प्रा.लि. पुणे.
6. सामाजिक न्याय विभाग माहिती पुस्तक, समाज कल्याण संचालनालय, महाराष्ट्र शासन, पुणे.
7. आश्रमशाळा संहिता, सचिव, महाराष्ट्र शासन आदिवासी विकास विभाग, सन 2001
8. आदिवासीचं जगणं आणि मरणं यातील संघर्ष (धगधगत्या सत्य कथांचा संग्रह), मुक्तरंग प्रकाशन.




Scanned by CamScanner

# शालेय पोषण आहार योजनेच्या अहमदनगर जिल्हयातील प्राथमिक शाळेतील विद्यार्थ्यांवर होणाऱ्या परिणामाचा चिकित्सक अभ्यास.

श्रीमती.प्रा.सुजाता विक्रम सानप
राष्ट्रमाता इंदिरा गांधी महाविद्यालय.जालना

**सारांशः–**भारतीय संस्कृतीत आहाराला अत्यंत महत्वाचे स्थान दिलेले आहे. जेवणाला सुरूवात करण्यापूर्वी वदनी कवल घेता नाम घ्या श्रीहरीचे. सहज हवन होते नाम घेता फुकाचे. जीवन करी जीवित्वा अन्न हे पुर्ण ब्रम्हा. उदरभवन नोहे जाणिजे यज्ञकर्म हा श्लोक म्हणतात. अनेक साधू संतानी आहाराबाबतच्या ओव्या लिहिलेल्या आहेत श्री ज्ञानेश्वर महाराजांनी आहाराबाबत पुढील ओव्या रचलेल्या आहेत

धरावा तैसा संगु । जेणे पोखे सात्विक जागू ।
सत्व वृत्तीचा भागू । आहार घेणे ॥
एऱ्हावी तरी पाही । स्वभाव वृत्तीचा ठायी ॥
आहारावाचुणी नाही । बळी हेतू ॥

अन्न ही माणसाला परमेश्वराने दिलेली एक देणगी आहे आणि त्याची जाणीव राहण्यासाठी जेवणास जेवण्यास सुरूवात करण्यासपुर्वी श्लोक म्हणण्याची प्रथा पंरपरा आहे.

जीवनाच्या दृष्टिकोनातुन विचार केल्यास हवा. पाणी. अन्न असा गरजांचा वास्तविक कम लागतो. मात्र नेहमीच्या जीवनात अन्न, पाणी व नंतर हवा असा कम लागतो मानवाच्या प्राथमिक गरजातदेखील अन्नाला प्रथम महत्त्व दिले आहे अन्न ही माणसाची प्रमूख गरज आहे माणसाचे जीवन अन्नावर अवलंबून असते. योग्य आहारामुळे माणसात उत्साह आरोग्य, मानसिक स्वास्थ लाभते. आरोग्यसंपन्न जीवन जगण्यासाठी अन्न सेवन करावे. खाण्यासाठी जगणे हा दृष्ठीकोन नसावा. माणूस कशाप्रकराचे जीवन जगणार आहे हे आहारावरच आलंबुन असते. व्यक्तीचे आरोग्य आणि आहार याचा अतिशय निकट संबंध आहे.

**अन्नः– (Food)** अन्न आणि पोषणाची संकल्पना जाणून घेण्यासाठी अन्न म्हणजे काय 1 हे अगोदर जाणून घेउ या. अगदी साधा सोप्या शब्दात आपण जे खातो त्याला 'अन्न ' म्हणतात,

**आहारः– (Diet)** जे पदार्थ द्रव किंवा घण स्वरूपात मुखाद्वारे मानवाकडून सेवन केले जातात, ज्याचे पचन शोषण होउन मावनी शरीराच्या वाढीवर व आरोग्यावर परिणाम होतो अशा अन्नपदार्थांना मिळून आहार असे म्हणतात प्राथमिक शिक्षण हे प्रत्येकाला मिळाले पाहिजे म्हणजेच प्रथमिक शिक्षणाचे सार्वत्रिकीकरण केले पाहिजे. भारतामध्ये वाढत्या वयाच्या मूलांमध्ये कुपोषणाची समस्या आढळते याचां परिणाम प्राथमिक शिक्षणाच्या सार्वत्रिकीकणासावर होत असल्यामूळे भारत सरकारने राष्ट्रीय शालेय पोषण आहार योजना सर्व राज्यांसाठी टप्याटप्याने कार्यान्वित केले आहे

महाराष्ट्र शासनाच्या विविध योजनामधील एक महत्त्वाची योजना म्हणजे प्राथमिक शाळेतील विद्यार्थ्यासाठी सुरु करण्यात आलेली पोषण आहार योजना होय. विद्यार्थ्याचे शिक्षणात सातत्य राहावे व गळतीचे प्रमाण कमी राहावे या हेतूने शासनाने ही योजना राबविण्यात येत आहे

**उदिदष्टे :–**

1) शालेय पोषण आहार योजणेमूळे विद्यार्थ्याच्या शैक्षणिक कार्यावर होणारा परिणाम अभ्यासणे.
2) शालेय पोषण आहार योजनेमुळे विद्यार्थ्याच्या शैक्षणिक गुणवत्तेवर होणारा परिणाम अभ्यासणे.
3) शालेय पोषण आहार योजनेमूळे विद्यार्थ्याच्या शैक्षणिक उपस्थितीवर होणारा परिणाम अभ्यासणे.

**संशोधनाची ग्रहितके**(1) महाराष्ट्र शासनामार्फत सर्व शाळांमध्ये शालेय पोषण आहार योजना राबविली जात आहे. (2) शालेय पोषण आहार योजनेमुळे शिक्षकांच्या उपस्थितीवर होणारा परिणाम अभ्यासणे.

**मर्यादा :–**(1) संशोधन अहमदनगर जिल्हया पूरतेच मर्यादित आहे.

(1) सदरील संशोनधनासाठी प्राथमिक शाळेतील100 विद्यार्थीची निवड करण्यात आली मूलाखत व प्रश्नावली या तंत्राच्या साहयाने संशोधनासाठी आवश्यक असणारी माहिती जमा करण्यासाठी पोषण आहार योजनेत केद्रीय अनुदानाचा समावेश.

शालेय पोषण आहार योजनेअंतर्गत अनुज्ञेय शाळांतील इयत्ता 1 ली ते 5वी च्या विद्यार्थ्यांना अन्न शिजवून देण्यासाठी राज्य शासन प्रतिदिन प्रतिविद्यार्थ्यी रु– 0.50 या दराने अनुदान ऑगस्ट 2004 पर्यत उपलब्ध करुन देत होते तथापि केंद्र श्शासनाकडील अर्धशासकीय पत्र क –11– 1–2004 एम डी एम दिनांक 6–10–2004 अन्वये अन्न शिजवुन देण्यासाठी केंद्र शासनाने सप्टेबर 2004 पासून रु 1 प्रतिदिन प्रतिविद्यार्थ्यी अनुदान देण्याचा निर्णय पारित केला त्याप्रमाणे दिनांक 31–3–2005 च्या शासन निर्णयाण नमूद केल्याप्रमाणे अन्न शिजवून देण्यासाठी केद्र व राज्य शासनाकडून अनुकमे रु 1 आणि रु 0.50 पैसे प्रतिदिन प्रतिविद्यार्थ्यी



Scanned by CamScanner

असे एकूण रु 1.50 अनूदान दिले जात होत

**अन्न देण्यासाठी शिजविण्यात येणाऱ्या अन्नपदार्थामध्ये असलेल्या अन्नघटकांचा तक्ता**

| अ क. | बाब | शापोआसाठी प्रमाणित केलेले अन्न (ग्रॅममध्ये) | | रकाना क.4 मध्ये नमूद केलेल्या पदार्थातील प्रथिने आणि उष्मांक (प्रोटीन्स आणि कॅलरीज) | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|
| | | उष्मांक (कॅलरीजमध्ये) | प्रथिने (ग्रॅममध्ये) | उष्मांक (कॅलरीजमध्ये) | प्रथिने (ग्रॅममध्ये) | उष्मांक (कॅलरीजमध्ये) | प्रथिने (ग्रॅममध्ये) |
| 1 | 2 | 3 | 4 | 5 | 6 | 7 | 8 |
| 1 | तांदुळ | 100 | 150 | 340 | 450 | 8 | 12 |
| 2 | इतर पूरक पदार्थ<br>1.डाळी<br>2. पालेभाज्या – | 20 | 30 | 70 | 105 | 5 | 8 |
| | अ) पालेभाज्या | 50 | 75 | 25 | 37 | 0 | 0 |
| | ब) इतर<br>3.तेल आणि स्निग्ध पदार्थ<br>4.मीठ व मसाल्याचे पदार्थ | 5 | 7 | 45 | 23 | 0 | 0 |
| | | गरजेनुसार | | | | | |
| 3 | प्रस्तावित शिजविलेल्या अन्नातील एकूण उष्मांक व प्रथिने | | | 480 | 715 | 13 | 20 |

**(ब) मानधन** (1) प्राथमिक शाळा स्तरावर शालेय पोषण आहार योजनेच्या आनुषगिक बाबीचे काम करणाऱ्या मुख्याध्यापक संबधित शिक्षक या दोघेपैंकी एकास प्रतिमहा खलील दराने मानधन दिले जाते.

| अ क. | पटसंख्या | प्रतिमध मानधन प्रमाण |
|---|---|---|
| (1) | 500 पेक्षा जास्त | रुपये 200 |
| (2) | 500 पेक्षा कमी | रुपये 100 |

(2) विद्यार्थ्यांना स्वच्छतेच्या सवयी लावणे आरोग्यम सर्व साधनम

उत्तम आरोग्य हे उत्तम व यशस्वी जीवनाचा पाया असते. आरोग्य संपन्न व्यक्तीच्या अंगी अनेक गुण वास करत असतात. तसेच लहाणपणी लावलेल्या सवयी या कायमस्वरुपी राहतात.म्हणुनच शालेय जीवनातच मुलांना आरोग्यदायक सवयी लावणे शक्य आहे न्यात पुढील सवयीचा समावेश करता येईल.

(1) रोज सकाळी उठल्याबरोबर सौचास जाणे
(2) रोज दात स्वच्छ घासणे
(3) रोज स्वच्छ अंघोळ करणे
(4) रोज स्वच्छ कपडे घालणे
(5) नियमितपणे तेल लावणे
(6) आठडयातून एकदा हाताची व पायाची नखे काढणे
(7) रोज शाळेतून आल्यावर व खेळून आल्यावर हात–पाय स्वच्छ धुणे
(8) बाहेरचे उघडयावरचे पदार्थ न खाणे

**साहित्य आणि कार्यपध्दती**

**अध्ययन क्षेत्रः–** हे अहमदनगर जिल्हयातील प्राथमिक शाळेतील शालेय पोषण आहारमुळे विद्यार्थींच्या अध्ययनावर वितरीत परिणामाचा चिक्तिसक अभ्यास हा अहमदनगर जिल्हयातपुरताच मर्यादित होता यासाठी प्राथमिक शाळेतील 100 विद्यार्थ्यांची नमूना म्हणून निवड करण्यात आली.

**नमूना निवड पध्दती :–**

कोणत्याही विषयाचा अभ्यास करावयाचा असल्यास नमूना निवड करणे अत्यंत महत्त्वाचे असते. नमूना निवड पध्दतीत पुढील बाबींचा समावेश करण्यात आला.

(1) सोबत या अहमदनगर प्राथमिक शाळेतील 100 विद्यार्थी नमुना म्हणून निवडण्यात आले.
(2) ही माहिती जमा करण्यासाठी याद्रच्छीक नमुना निवड या पध्दतीचा वापर करण्यात आला
(3) ही माहिती प्रत्यक्षात विद्यार्थ्याकडे जाउन समोर बसून भरुन घेतली आहे.

विद्यार्थाकडून प्राप्त माहितीचे विश्लेषण व अर्थनिव्रचन



Scanned by CamScanner

संशोधन कर्त्यास असे अभिप्रेत आहे. की महाराष्ट्र शासनाची शालेय पोषण आहार योजना शाळेमध्ये ज्या विद्यार्थ्यासाठी राबविली जाते त्या विद्यार्थ्याच्या इच्छाा अपेक्षाचा विचार यात करणे आवश्यक आहे. करीता जालना जिल्हयातील प्राथमीक शाळेतील विद्यार्थ्याची शालेय पोषण आहार योजनेच्या प्रश्नावलीतील प्रश्न क्र 1 ते 4 विद्यार्थ्याची सामान्य माहिती मिळवण्यासाठी विचारण्यात आले होते. करिता संशोधन कर्त्याने खलील प्रमाणे प्रश्नांचा अंतर्भाव केला आहे.

**तक्ता क. 1** विद्यार्थ्याच्या मते शाळेतून दिल्या जाणाऱ्या आहाराची गरज दर्शविणारा तक्ता.

| अ.क | प्रतिसाद | टक्केवारी |
|---|---|---|
| 1 | होय | 65 |
| 2 | नाही | 35 |
| | ऐकूण | 100 |

निष्कर्षः– 65 टक्के विद्यार्थ्याच्या मते शाळेतुन दिल्या जाणाऱ्या शालेय पोषण आहाराची गरज आहे शालेय पोषण आहार योजनेअंतर्गत विद्यार्थ्याच्या मते कोणते पदार्थ असावेत हे दर्शविणारा

**तक्ता.क.2**

| अ क. | प्रतिसाद | टक्केवारी |
|---|---|---|
| 1 | खिचडी | 8 |
| 2 | दुध अंडी | 4 |
| 3 | फळ आहार | 28 |
| 4 | संपुर्ण जेवण;(चपाती –भाजी;) | 60 |
| | ऐकूण | 100 |

निष्कर्ष :– 60 टक्के विद्यार्थ्याच्या मते शाळेतुन दिल्या जाणाऱ्या आहारात संपूर्ण जेवणाचा (चपाती– भाजी) समावेश नाही

**तक्ता क 3** विद्यार्थ्याच्या मते शाळेतून दिल्या जाणाऱ्या पोषण आहाराची गरज नाही याचे कारण दर्शविणारा तक्ता

| अ. क. | प्रतिसाद | टक्केवारी |
|---|---|---|
| 1 | घेउन जेवून येत असल्याने | 44 |
| 2 | पालक आहार घेण्यास मनाई करित असल्याने | 56 |
| | ऐकुण | 100 |

निष्कर्षः– 56 टक्के विद्यार्थ्याच्या मते पालक आहार घेण्यास मनाई करत असल्याने शाळेतून दिल्या जाणारा शालेय पोषण आहाराची गरज नाही.

**तक्ता क.4** विद्यार्थ्यांना शालेय पोषण आहारातर्गत दिल्या जाणाऱ्या आहाराचा दर्जा दर्शविणारा तक्ता.

| अ.क. | प्रतिसाद | टक्केवारी |
|---|---|---|
| 1 | उत्त्कृष्ट | 05 |
| 2 | चांगला | 25 |
| 3 | सर्वसाधारण | 30 |
| 4 | निकृष्ट | 40 |
| | एकूण | 100 |

निष्कर्ष :–बहुसंख्य विद्यार्थ्यांच्या मते शाळेतून दिल्या जाणाऱ्या आहाराचा दर्जा निकृष्ट आहे.

**तक्ता क.5** विद्यार्थ्यांना दररोज आहार दिला जातो की, नाही यांची माहिती दर्शविणारा तक्ता.

| अ.क. | प्रतिसाद | टक्केवारी |
|---|---|---|
| 1 | होय | 45 |
| 2 | नाही | 55 |
| 3 | एकूण | 100 |



Scanned by CamScanner

**तक्ता क.6** उत्तर नाही असल्यास त्याचे कारण काय आहे.

| अ.क. | प्रतिसाद | टक्केवारी |
|---|---|---|
| 1 | शाळेला सुटटी असल्याने | 75 |
| 2 | अर्धवेळ शाळा असल्यास | 25 |
| 3 | एकूण | 100 |

निषर्ष्क :– 75 टक्के विद्यार्थ्याच्या मते शाळेला सुटटी असल्याने आहार दिला जात नही.

**तक्ता क.7** विद्यार्थ्यांना पालक अआहार खाउ देतात किंवा नाही हे दर्शविणारा तक्ता.

| अ.क. | प्रतिसाद | टक्केवारी |
|---|---|---|
| 1 | होय | 85 |
| 2 | नाही | 15 |
| 3 | एकूण | 100 |

निषर्ष्क :– 85 टक्के विद्यार्थ्याचे पालक शाळेतील आहार खाण्यासाठी मनाई करतात.
विद्यार्थ्यांना पालक पोषण आहार खाउ न देण्याचे कारण दर्शविणारा तक्ता.

**तक्ता.8** विद्यार्थ्यांना पालक पोषण आहार खाउ न देण्याचे कारण दर्शविणारा तक्ता.

| अ.क. | प्रतिसाद | टक्केवारी |
|---|---|---|
| 1 | शाळेतील आहार चांगला नसतो | 35 |
| 2 | हा आहार गरिबांसाठी असतो म्हणुन | 65 |
| 3 | एकूण | 100 |

निषर्ष्क :– 65 टक्के विद्यार्थ्यांचे पालक शाळेतील आहार खाण्यास मनाई करातात.

**तक्ता 09** विद्यार्थ्यानाशाळेतील आहार वेळेवर मिळतो की नाही हे दर्शविणारा तक्ता.

| अ.क. | प्रतिसाद | टक्केवारी |
|---|---|---|
| 1 | होय | 95 |
| 2 | नाही | 05 |
| 3 | एकूण | 100 |

निषर्ष्क :– 95 टक्के विद्यार्थ्यांच्या मते शाळेततील आहार वेळेवर मिळत नाही.

**तक्ता.10** शाळेतील दिला जाणारा आहार वेळेवर न मिळाल्यास विद्यार्थी काय करतात हे दर्शविणारा तक्ता.

| अ.क. | प्रतिसाद | टक्केवारी |
|---|---|---|
| 1 | जेवण करत नाही | 03 |
| 2 | दुस–यांच्या डब्बातील जेवण | 12 |
| 3 | शिक्षकांना सांगतो | 30 |
| 4 | जेवण मिळण्याचे वाट पाहणे | 55 |
| | एकूण | 100 |

निषर्ष्क :– 55 टक्के विद्यार्थ्याच्या मते शालेय पोषण आहार केव्हा मिळतो याची वाट पाहतो

**संदर्भ सुची :–**

1) आगलावे प्रदिप – संशोधन पध्दती शास्त्र व तंत्र विद्या प्रकाशन नागपुर, प्रथम आवृत्ती
2) बन्सी बिहारी पंडीत – शिक्षणातील संशोधन (संकल्पणात्मक परिचय ) नुतन प्रकाशन प्रकाशन पुणे
3) बेस्ट जे डब्लू 1998 रिसर्च इन एज्युकेशन नवी दिल्ली सातवी आवृत्ती.
4) बेलिंग हॉम जॉन – 1997 डिक्शनरी ऑफ एज्युकेशन ऑक्यडमीक इंडीया पब्लीश नवी दिल्ली.
5) ब्रु–बेकर जॉन अनुवादक–म.बा. कुडले 2001 शैक्षणिक संमस्यांचा इतिहास.महाराष्ट्र विद्यापिठ ग्रंथ निर्मिती मंडळ
6) दांडेकर बा.ना शैक्षणिक मूल्यमापन व संख्याशास्त्र श्रीविद्या प्रकाशन शनिवार पेठ पुणे.



Scanned by CamScanner

# स्त्री–पुरूष समानतेच्या हानीची कारणमिमांसा

**डॉ. नितीन रणदिवे**, समन्वयक, सामाजिक शास्त्रे विद्याशाखा दूर शिक्षण केंद्र, शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर.

**प्रस्तावना :** प्राचीन काळात मनुप्रणित विषमतेवर आधारित चातुर्वर्ण्य व्यवस्थेने शुद्र व स्त्रियांना सर्वात खालचा घटक मानला. भारतीय परंपरेत स्त्रियांचे शोषण उच्चवर्णीय संस्कृतीत प्रमाण मानले होते. पुरूषांची भूमिका ही नियम तयार करणारी असल्याने स्त्रिया नेहमीच धार्मिक, सामाजिक व आर्थिक नियमांना बळी पडल्या आहेत. या सर्वांना मनुस्मृतीने अधिष्ठान प्राप्त करून दिले. या मनुस्मृतीप्रणित विषमतेच्या प्रतिष्ठेला उच्चवर्णीय सुधारकांनी आपल्या वर्णप्रणितच मर्यादित ठेवलेल्या सुधार परिवर्तनाला या देशातील बहुजन, हरिजन आणि गिरीजन, शुद्रातिशुद्र स्त्रियांच्या मुक्तीसाठी त्यांच्या उन्नतीसाठी कोणताच प्रयास केला नाही. या उच्चवर्णीय संस्कृतीच्या विरोधात तथागत गौतम बुद्ध, राष्ट्रपिता ज्योतिराव फुले, ज्ञानज्योति सावित्रीबाई फुले व डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी स्त्री–पुरूष समानतेच्या वास्तववादी दृष्टिकोनातून मांडली केली. स्त्रीयांना 'माणूस'पण बहाल करून त्यांना स्वाभिमान, स्वावलंबन व आत्मसन्मानी प्रतिष्ठा प्राप्त करून दिली. त्यासाठी डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी त्याला संविधानात्मक अधिष्ठान प्राप्त करून दिले.

संपूर्ण भारतीय स्त्रीच्या उन्नयनाचे तत्वज्ञान आजच्या काळात पुन्हा एकदा चातुर्वर्ण्य व्यवस्थेत बंदिस्त करण्याचा घाट आजची सामाजिक, राजकीय, शैक्षणिक, आर्थिक व सांस्कृतिक व्यवस्था करताना स्पष्टपणे दिसते आहे. स्त्री–पुरूष परस्पर संबंध असमानतेच्या तत्त्वावर विराजमान होण्यासाठी हिंदू धर्मातील नितीतत्वे, मूल्ये आजच्या २१ व्या शतकात प्रकर्षाने बिंबविणे, रूजविणे हे हेतूपुरस्सरपणे केले जात आहे. यासाठी धार्मिक सण, प्रसारमाध्यमे, शैक्षणिक व्यवस्था, कौटुंबिक वातावरण, अंधश्रद्धा पसरविणे यासारख्या स्त्री–पुरूष समानतेला हानी पोहचविण्याचा गोष्टी महत्त्वाची भूमिका बजावत आहेत. त्यामुळे स्त्री–पुरुष समानतेच्या हानींच्या कारणमिमांसेची सविस्तर विवेचन प्रस्तुत शोधनिबंधात करण्यात आले आहे.

**मनुप्रणित चातुर्वर्ण्य व्यवस्था :**भारताच्या प्राचीन इतिहासात स्त्रीसत्ताक कालखंडात स्त्रियांचे स्थान महत्त्वाचे होते. याच कालखंडात स्त्रीयांनी शेतीचा शोध लावलेला होता. स्त्रीसत्ताक समाज हा सापेक्षतः अधिक स्त्री–पुरूष समानतेवर आधारलेला होता. तसेच आयुर्वेद व सांख्यतत्वज्ञानाची निर्मिती व विकास स्त्रियांनी याच कालखंडात केला. या गौरवशाली स्त्रीसत्ताक समाजाचा पुढे पराभव झाला कारण नव्या पुरूषसत्ताक समाजाने स्त्री सत्तेबरोबर संघर्ष केला व शेती ही पशूच्या सहाय्याने करण्यास सुरूवात केली आणि अपसूकच स्त्री ही कुटुंबातच बंदिस्त झाली. यातूनच भारतामध्ये पुरूषसत्तेचा उदय झाला. यांच्याबरोबरच वर्णव्यवस्था ही उदयास आली. वर्णव्यवस्था व पुरूषसत्ता टिकविण्यासाठी उच्चवर्णीयांनी अनुकूल अशा धर्मग्रंथाची निर्मिती केली यातून चातुर्वर्ण्य व्यवस्थेवर आधारित असणारी शिक्षणव्यवस्थेची रचना सांगणारी मुनस्मृती साधन म्हणून निर्माण केली गेली. प्राचीन रूढीचे संहितीकरण करणाऱ्या मनुने असे लिहिले

'वैवाहिको विधीः स्त्रीनां संस्कारो वैदिक : स्मृतः।
पतिसेवा गुरौ वार्सो गृहयोंग्रि परिक्रिया ।।२.६७।।'........ मनुस्मृती

अर्थ : स्त्रियांच्या जीवनात वैदिक (मंत्रांनी संपन्न होणारा) विधी एकच! तो म्हणजे लग्नविधी. स्त्रियांना ज्ञानासाठी गुरूगृही वसती करण्याची गरज नाही. पतीची सेवा हाच गुरूकूल निवासी व घरकाम हेच यज्ञकर्म. त्यांनी अग्नीत आहुती टाकण्याची गरज नाही. स्त्रियांना उपनयन, वेदाध्ययन, विद्याध्यन व यज्ञकर्म करायला शास्त्राची मनाई आहे. धरासाठी आगीवर पदार्थ शिजविणे हा पाक यज्ञ हाच स्त्रीचा ज्ञानयज्ञ आहे. म्हणजेच ज्ञानभाषा बंदीतूनच ज्ञानबंदीचा मार्ग ब्राह्मणी पुरूषसत्तेने स्विकारलेला होता. मनुस्मृतीकालीन कायदे हे विवाह, घटस्फोट, बहुपत्नीकता, वारसाहक्क यात स्त्रीयांना पती पारायण व पुरूषावलंबी बनविणारे होते या व्यवस्थेने स्त्रीला धार्मिकदृष्ट्या अपवित्र लेखण्यासाठी धर्मपरंपरेमध्ये पवित्र–अपवित्रतेची संकल्पना जनतेत रूजविली त्यामुळे स्त्रीने पावित्र्याचा भंग होऊ नये म्हणून स्वतःहून स्वतःची गुलामगिरी स्विकारली. तसेच विधवा विवाहबंदीपासून ते सती सावित्रीप्रथा ही पुरूष सत्तेची ब्राह्मणी संस्कार यंत्रणा माध्यम म्हणून वापरली.

प्राचीन समाजातील वर्णव्यवस्थेचे रूपांतर जातिव्यवस्थेत झाले. ब्राह्मण, क्षत्रिय, वैश्य व शुद्र या चार वर्णामध्ये विभागलेला समाज पुढे हजारो जातींमध्ये विभागला गेला. जातिव्यवस्था टिकविण्यासाठी स्त्रियांवर प्रचंड जाचक बंधने लादण्यात आली. त्या रूढी व परंपरा कायदा म्हणून पाळल्या गेल्या. धर्मशास्त्राच्या माध्यमातून या कायद्याला नैतिक बळ व अधिमान्यता प्राप्त करून दिली गेली. जातीव्यवस्थेने स्त्रियांना आर्थिक, सामाजिक, राजकीय, धार्मिक असे सर्व प्रकारचे हक्क नाकारले त्यांच्यावर ज्ञानबंदी लावून त्यांना बौद्धिकदृष्ट्या गुलाम बनविले गेले.

**महापुरूषांचे योगदान :**स्त्री शिक्षणातून जागृती घडेल व स्त्रिया आपले दुःख वेशीवर टांगायला शिकतील या भूमिकेतून



Scanned by CamScanner

ब्राह्मणीसुधारकांनी स्त्री शिक्षणाचा पुढाकार केला नाही तर इंग्रजी शिक्षण घेतलेली स्त्री अधिक चांगल्या व आधुनिक पद्धतीने कुटुंबाची देखभाल, पतीसेवा व अपत्यसंगोपन करेल या भूमिकेतून या उच्चवर्णीय सुधारक वर्गाने स्त्री शिक्षणाचा पुरस्कार केला.

**दयानंद सरस्वती : स्त्रियांसाठी जातवार शिक्षणाचा पुरस्कार** : आर्य समाजाचे संस्थापक दयानंद सरस्वती यांनी स्त्रि शिक्षणाबद्दल असे मत व्यक्त केले की, 'ब्राह्मण व क्षत्रिय स्त्रियांनी सर्वप्रकारचे ज्ञान मिळवावे, वैश्य स्त्रियांनी व्यवसायाचे व काही उपयोगी कलांचे शिक्षण घ्यावे व शुद्र स्त्रियांनी स्वयंपाकादी कलांचे शिक्षण घ्यावे.'

**बाळ गंगाधर टिळक :**पुरूष वर्चस्वाच्या अभ्यासक्रमाचा पुरस्कार करताना टिळक केसरीच्या अग्रलेखात लिहितात. 'ज्या अर्थी पुरूषांप्रमाणे स्त्रियांसही संसारात ईश्वराने काही कर्तव्ये अवश्य लावून दिली आहेत, त्या अर्थी पुरुष व स्त्रियांचा अभ्यासक्रम भिन्न असला पाहिजे.. विवाहितावस्था व गृहकृत्ये ही स्त्रियांची दोन प्रधान कर्तव्ये असल्यामुळे स्त्रियांच्या व पुरूषांच्या शिक्षणाची दिशा लवकर भिन्न भिन्न करावी लागणार.' अग्रलेखात पुढे म्हणतात, स्त्रियांनी स्वभावत:च घरातील कृत्ये करण्याकडे आलेली आहे व तीस अनुकूल असेच शिक्षण तीस मिळाले पाहिजे. (केसरी दि. ६ मार्च १८८८ अग्रलेख, स्त्री शिक्षणाची दिशा)

**गो. कृ. गोखले :** स्त्री शिक्षणाची पारंपारिक भूमिकाच ते स्वत: राजकारणामध्ये उदारमतवादी भूमिका घेत असले तरी मांडतात. गोखल्यांनी रमाबाई रानडे यांनी लिहिलेल्या आत्मचरित्रासाठी प्रस्तावना लिहिली आहे त्यामध्ये ते लिहितात, 'पाश्चिमात्य पती-पत्नीमध्ये खोलवर रूजलेले प्रेम' ही बाब अनेक वेळा दिसते. हे समतेवर आधारलेले संबंध आहेत. भारतीय पती-पत्नींमध्ये असेच खोलवर रूजलेले प्रेम असले तरी पत्नीने पतीच्या सेवेत सर्वस्वाचा त्याग करावा आणि यातच आपल्या जीवनाचे साफल्य शोधावे हे पूर्वेकडील व विशेषत: भारतीय स्त्रीचे परम वैशिष्ट्य आहे. हे हजारो वर्षाच्या भारतीय संस्कृतीचे व परंपरेचे फळ आहे हे आत्मचरित्र आपल्याला याचा प्रत्यय देते.

**धोंडो केशव कर्वे :**कर्व्यांनी जनाक्का नावाच्या परित्यक्त्या बहिणीला महिला विद्यापीठात प्रवेश नाकारला होता. शुद्र मुली येथे शिकू लागल्यात ब्राह्मण मुलींच्या प्रवेशावर विपरीत परिणाम होईल असा युक्तीवाद कर्व्यांनी केला होता.

**डॉ. राधाकृष्णन सर्वपल्ली :** स्वातंत्र्यानंतर उच्चशिक्षणाचा विचार करण्यासाठी डॉ. राधाकृष्णन सर्वपल्ली यांच्या अध्यक्षतेखाली आयोगाची स्थापना केली. स्त्री ही स्वयंपाकराणी आहे हे सांगताना आयोग म्हणतो, 'आयोगाचे असे मत आहे की, कर्तबगार पुरूषांची घडण ही सुनियोजित घरातच होते. इतिहास आणि साहित्य सारख्या विषयांची अधिक माहिती असलेली चौकस व तत्पर आई हीच मुलांच्या चारित्र्य व बुद्धिमत्तेच्या जडण घडणीत सर्वात महत्त्वाची भूमिका निभावते.' घरकाम ही स्त्रीची प्राथमिक जबाबदारी आहे असे आयोगाने गृहित धरले आहे.

**म. फुले आणि सावित्रीबाई फुले :** ज्ञान नाही विद्या नाही।
ते घेणेची गोडी नाही।
बुद्धी असूनी चालत नाही।
तयास मानव म्हणावे का?
बाईला काम करीत राही।
ऐतोबा हा खात राही।
पशू पक्षात ऐसे नाही।
तयास मानव म्हणावे का?

स्त्रीला शिक्षण देऊ नये हा मनुस्मृतीचा हजारो वर्षापासून चालत आलेला नियम राष्ट्रपिता म. ज्योतिराव फुले व सावित्रीबाई फुले यांनी मांडला. म. फुले यांनी इतिहासाची पुर्नमांडणी केली त्यांनी इतिहासाची अर्थपूर्ण संगती लावून अस्पृश्यता, स्त्री-पुरूष विषमता, अंधश्रद्धा, क्रुर मानवी प्रथा या प्रश्नांची उत्तरे शोधण्याचे काम केले. हंटर आयोगाला दिलेल्या साक्षीमध्ये फुल्यांनी स्त्री शिक्षणाची मागणी केली.

राष्ट्रपिता फुले म्हणतात, 'स्त्रियांची जात अबला असल्यामुळे या लोभी व धाडसी पुरूषांनी मोठी कावेबाजी करून... सर्व पुरूषांनी आपलेच घोडे पुढे दामटले त्यास मानवी हक्क समजू देऊ नये या इराद्याने त्यास विद्या शिकविण्याचा प्रतिबंध यामुळे सर्व स्त्रियांवर अशा तऱ्हेचा जुलमी प्रसंग येऊन गुदरला.'याच प्रकारचे लेखन म. फुल्यांच्या शाळेतील मुक्ता साळवे या मातंग विद्यार्थीनीने मांग महाराच्या दु:खाविषयी निबंध यातून केले.

**मुक्ता साळवे :**फुले यांची तीन वर्षे विद्यार्थीनी असणारी मुक्ता साळवे (मांग) हीने वयाच्या १४ व्या वर्षी 'मांग महाराच्या दु:खाविषयी निबंध' लिहिला. हा निबंध ज्ञानोदय च्या अंकात दोन भागात (१५ फेब्रुवारी, १८५५ व १ मार्च १८५५) छापून आला. कनिष्ठ जातीय स्त्रीचे दु:ख वेगळेच असते. याचा प्रत्यय या निबंधात येतो. मुक्ता साळवे निबंधात म्हणते, 'जर वेद ब्राह्मणासाठी आहेत तर वेदाप्रमाणे वर्तुणूक करणे हा ब्राह्मणांचा धर्म होय. जर आम्हास धर्मासंबंधी पुस्तके पाहाण्याची मोकळीक



Scanned by CamScanner

नाही. तर आम्ही धर्मरहित आहो असे साफ दिसते की नाही बरे' धर्माच्या अभिमान करावा असे आमच्या मनात येऊ नये असे मुक्ता निबंधात स्पष्टपणे सांगते. पुढे मुक्ता सांगते की, तुमच्या बुद्धीला ज्ञानरूप औषध घ्या म्हणजे तुम्ही चांगले ज्ञानी घेऊन तुमच्या मनातील कुकल्पना जाऊन तुम्ही नीतीज्ञान व्हाल.

**ताराबाई शिंदे (१८५०-१९१०) :**यांनी इ.स. १८८२ मध्ये 'स्त्री-पुरूष तुलना' हा ग्रंथ लिहून पुरूष व्यवस्थेची इतिहासातील साक्ष शोधत लेखन केले. स्त्री अत्याचाराच्या धर्मशास्त्राची व पुरूष प्रधानतेची चिकित्सा त्यांनी बुद्धिप्रामाण्यवादी दृष्टिकोनातून केली. ताराबाईंनी लिहिलेल्या प्रस्तावनेत लेखनामागचा उद्देश सांगतात, ज्या परमेश्वराने ही आश्चर्यकारकदृष्टी उत्पन्न केली, त्यानेच स्त्रीपुरूष निर्माण केले. तरी सर्व प्रकारचे साहस, दुर्गम स्त्रियांचेच अंगी असतात किंवा जे अवगुण स्त्रियांचे अंगी आहेत तेच पुरूषांत आहेत किंवा नाहीत हे अगदी स्पष्ट करून दाखवावे याच हेतूने हा लहानसा निबंध मी माझ्या सर्व देश भगिनींना अभिमान धरून रचिला आहे. याच अमुकच जाती किंवा कूळ याकडे माझे मुळीच लक्ष नाही. ह्या लेखनाचा उद्देश पुरूषांचे दोष काढणे हा नाही तर स्त्रियांचे गुण दाखविले हा आहे असे ताराबाई शिंदे स्पष्ट करतात.

**डॉ. बाबासाहेब आंबेडकर :**डॉ. आंबेडकरांच्या अस्पृश्यांच्या अन्याय व शोषणाच्या विरोधातील लढा म्हणजे स्त्रीयांना मुक्त करण्याचा लढा होता. डॉ. आंबेडकरांनी स्त्रिया व प्रतिक्रांती मनुचे वेडं, हिंदू स्त्रियांची उन्नती आणि अवनतीर (महाबोधी सोसायटीच्या मासिकातील लेख) या लेखांमधून मनुस्मृतीच्या २, ५, ८ व ९ या अध्यायांमधून श्लोक उद्धत करून मनुच्या स्त्री-विरोधी कायद्यांच्या विरोधात लेखन ही केले व स्त्रीयांची स्थिती बदलण्यासाठी त्यांनी हिंदुकोड बीलाची मांडणी ही केली. दि. २० जुलै १९४२ साली नागपूरला दलित स्त्रियांची परिषद सभा आयोजित करण्यात आली होती त्या सभेला उद्देशून डॉ. बाबासाहेब आंबेडकर म्हणाले, स्त्रियांची प्रगती ज्या प्रमाणात झाली असेल त्यावरून एखाद्या समाजाची प्रगती मी मोजत असतो. याच भाषणात त्यांनी लग्नाच्या मुलींसाठी उद्देश दिल्या ते म्हणतात, लग्न झालेल्या प्रत्येक मुलींने पतीची मैत्रिण म्हणून त्याच्या प्रत्येक कार्यात सहकार्य द्यावे मात्र गुलामाप्रमाणे वागवल्यास तिने खंबीरपणे नकार द्यावा व समतेसाठी आग्रह धरावा. महाड येथे सत्याग्रही परिषदेत (ता. २५ डिसेंबर १९२७ रोजी) शेवटी सत्याग्रही स्त्रीयांच्या सभेत डॉ. बाबासाहेब आंबेडकर म्हणतात, ज्ञान आणि विद्या या गोष्टी पुरूषांसाठीच नाहीत. त्या स्त्रीयांनाही आवश्यक आहेत. आपली पुढील पिढी जर सुधारायची असेल तर तुम्ही मुलींना शिक्षण दिल्याशिवाय राहू नका.

**राजर्षी शाहू महाराज :**यांनी राजाराम महाविद्यालयामध्ये उच्च शिक्षण घेणाऱ्या विद्यार्थीनींना फी माफी दिली. स्वत:ची सून छ. इंदुमती यांना वैधव्य प्राप्त झाल्यानंतर कर्मठ धर्म मार्तंडांच्या विरोधाला न जुमानता त्यांना शिक्षण दिले त्यांनी कोल्हापूर संस्थानात, जोगत्या मुरळी प्रतिबंधक कायदा, बालविवाहाला विरोध, विधवा विवाहाचा पुरस्कार, आंतरजातीय विवाहास कायदेशीर मान्यता, पुर्नविवाह नोंदणी कायदा आणि वसतिगृहांची उभारणी आदी स्त्री स्वातंत्र्यासाठी महत्त्वाचे निर्णय घेतले. शाहू महाराजांनी स्त्रीला सबला बनविण्यासाठी स्त्री, तिचे शिक्षण, तिचा विवाह, तिची प्रकृती, तिला पुर्नविवाहाचे आणि काडी मोड घेण्याचे स्वातंत्र्य, अश्लिल आणि अनिष्ठ प्रथांपासून तिची सुटका, तिचे स्वावलंबन आदी पातळ्यांवर जाणीवपूर्वक प्रयत्न केले गेले.

**भारतीय संविधान :**भारतीय राज्यघटनेत कलम १४ अन्वये म्हटले आहे की, कोणत्याही भारतीय व्यक्तीस भारताच्या राज्यक्षेत्रात कायद्यापुढे समानता किंवा कायद्याचे समान संरक्षण नाकारण्यात येणार नाही.

कलम १५ (१) अन्वये : राज्य केवळ धर्म, जात, वंश, लिंग, जन्मस्थान या अथवा यापैकी कोणत्याही कारणावरून कोणत्याही नागरिकाला प्रतिकूल होईल असा भेदभाव करणार नाही.

कलम १५ (२) अन्वये सार्वजनिक ठिकाणी अस्पृश्यता न पाळणे.

कलम १५ (३) अन्वये, स्त्रिया व बालके यांच्याकरिता विशेष तरतुदींचा उल्लेख केला आहे.

कलम १६ (१) व (२) अन्वये : पदनियुक्ती, नोकरी इ. धर्म, जात, वंश, लिंग, कुळ, जन्मस्थान, निवास इ. कारणांवरून भेदाव केला जाणार नाही. व सर्व नागरिकांस समान संधी मिळेल. तसेच राज्यघटनेच्या ४२ व्या कलमात स्त्रियांसाठी प्रसुती सहाय्याची तरतुद केली आहे हे सर्व कायदे डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या भारतीय संविधानामुळे मिळाले.

**स्त्री-पुरूष समानतेची हानी :**समाजाचा स्त्री-पुरूषांकडे बघण्याचा विषमदृष्टिकोन स्त्रियांचे समाजातील दुयमत्व निश्चित करतो. स्त्री-पुरूष यांच्यातील सामाजिक भेद आणि स्त्रीयांचे गौण स्थान यांची कारणे नैसर्गिक नसून ती सांस्कृतिक आहेत. आपल्यावर लहानपणी झालेले संस्कार, आपण आयुष्यभर एकमेकांशी व्यवहार करत असताना एकमेकांवर करतो ते संस्कार, आपले विचार, आपले साहित्य, कला, शिक्षण यांच्यातून स्त्री-पुरूष भेद समाजामध्ये आधार घेत असतो. स्त्री-पुरूष विषमतेची मुळे पितृसत्ताक कुटुंबव्यवस्थेत असतात. एवढेच नव्हे तर समाजातील इतर क्षेत्रात, इतर सामाजिक नात्यातही या पितृसत्ताक कुटुंब संस्थेचे प्रतिबिंब पडलेले असते. उदा. एखाद्या संस्थेचा मालक स्वत:ला पिता समजतो. तसेच काही अपवादात्मक मालक कामगार स्त्रीयांवर लैंगिक अत्याचार करतात. पितृसत्ताक कुटुंब संस्थेची सुत्रे समाजाच्या इतर संस्थांमध्येही दिसतात. ती शासन संस्थेवर,



Scanned by CamScanner

राजकारणावर, धार्मिक कल्पनांवर व रूढींवर प्रभाव पाडतात. यामुळे आपला समाज अजुनही पितृसत्ताक समाज आहे असे म्हणावे लागेल. आपला समाज जातिव्यवस्थेवर आधारलेला आहे. जातिव्यवस्था म्हणजे समाजाची एक संरचना आहे आणि स्त्रियांच्या गौण स्थानाशी जातिव्यवस्थेचे अगदी निकटचे संबंध आहेत. जात स्त्रियांवर लैंगिक नियंत्रण ठेवणारी, त्यांचे दुय्यमत्त्व अधोरेखित करणारी, त्यांचे स्वातंत्र्य हिरावून घेणारी व्यवस्था होती व आहे.

आदिवासी आणि दलित स्त्रियांवर उच्चजातीतील श्रीमंत पुरूषांनी, गावातील जमीनदारांनी सर्व प्रकारचे अधिकार गाजविणे हे आपल्या समाजाच्या मूल्य व्यवस्थेत गैर समजले जात नाही. गावात आणि शहरातही शासनयंत्रणेतील अधिकारी पुरूषांनी हा हक्क घेतलेला असतो. उलट त्यांचा अधिकार आणि सत्ता सिद्ध करण्यासाठी सामाजिक मान्यता मिळालेला तो एक मार्गच असतो. स्त्रिया करतात त्या सर्व प्रकारच्या श्रमाला समाजाच्या दृष्टीकोनातून कमीच मूल्य आहे म्हणजेच स्त्रियांनी महत्त्वाची कामे करून सुद्धा समाजात कमी महत्त्व दिले जाते. त्यांच्या श्रमाचे अंत्यतिक शोषण होते. जगप्रसिद्ध भारतीय अर्थतज्ञ अमर्त्य सेन म्हणतात की, 'कुटुंबातर्गत उपभोगाची विभागणी स्त्री–पुरूषांमध्ये समान नसते. सर्वांसाठी जेव्हा पुरेसे अन्न नसते तेव्हा स्त्रीच अर्धपोटी राहते.' बाजारी यंत्रणा स्त्रीचेही एक उपभोग्य वस्तू म्हणून चित्र, वस्तू पुन्हा पुन्हा जाहिरातींमधून मिरवते. स्त्रीच्या प्रतिमेला उपभोग्य वस्तूंचे, उपभोग्यपण आणि वस्तूपण ही जोडले जाते. याच बाजारयंत्रणेच्या सांस्कृतिक प्रभावातून सौंदर्य स्पर्धा किंवा सिनेमातील शरीर प्रदर्शनासारख्या गोष्टी निघतात. भारतीय समाजामध्ये जातिव्यवस्थेचा प्रश्न आणि स्त्री पुरूष समानतेचा प्रश्न हे दोन्ही एकमेकांशी घट्ट बांधलेले आहेत.

**कारणे :** स्त्री पुरूष समानतेच्या हानीची कारणे शोधून त्यावरती कल्याणकारी राज्य ते उपाययोजना करणे ही जबाबदारी शासन व्यवस्थेवर असते. परंतु शासन संस्था दुसऱ्या बाजूला ही समाजव्यवस्था आहे तशी टिकवून ठेवण्यासाठी कार्य करीत असते. ती मुळातच भांडवलदार वर्ग, उच्च जाती, पुरूष प्रधानतेच्या बाजूने उभी राहणारी असते. हिंदू धर्म व्यवस्था टिकविण्याचा प्रयत्न मनुप्रणित ब्राह्मणी व्यवस्था करीत असते. हिंदू धर्मात स्त्रीला शूद्राबरोबरचे स्थान दिलेले आहे. हे टिकविण्यासाठी आटोकाट प्रयत्न केला जातो. उदा. हरियाणा सरकारने भगवत गीता अभ्यासक्रमाला लावण्याचा निर्णय नुकताच घेतला.

स्त्रियांना अंधश्रद्धेच्या खाईत लोटून देण्यास धर्म कारणीभूत आहेत. मुलींचा आज शिक्षणातील सहभाग वाढत असतानाच जागतिकीकरण, खाजगीकरणामुळे शिक्षणाची प्रचंड फि वाढली परिणामी मुलींना शिक्षण सोडून घरी बसावे लागत आहे. वैदिक काळापासून स्त्रियांच्या लैंगिकतेवर बंधने घातली होती. यातूनच तिला 'चूल' आणि 'मूल' यात गुंतवुन ठेवले. बाहेर पडावेच लागले तर चालण्या बोलण्यावर बंधने घातली. आज अनेक मुली व स्त्रियांना नोकरी निमित्त बाहेर पडू दिले जात नाही.

**उपाय :**

१. प्रत्येक स्त्री–पुरूषांनी धर्माची चिकित्सा केली पाहिजे.

२. स्त्री–पुरूष समानतेच्या कायद्याची अंमलबजावणी करणे गरजेचे आहे.

३. महापुरूषांच्या स्त्री मुक्तीच्या विचाराचा जागर झाला पाहिजे.

४. भारतीय संविधान घराघरात पोहचले पाहिजे.

५. स्त्री–पुरूष समानतेला हानी पोहचविण्याच्या शासन व्यवस्थेच्या विरूद्ध बंड पुकारले पाहिजे.

६. स्त्री पुरूषांना धार्मिक जोखडातून मुक्त केले पाहिजे.

७. 'माणूस' पण बहाल करणाऱ्या बुद्धिप्रमाण्यवादी विचाराची कास धरली पाहिजे.

**संदर्भ :**

१. चव्हाण दिलीप, स्त्री शिक्षणाचा संघर्ष, क्रांतिज्योती सावित्रीबाई फुले विद्यार्थीनी मंच, सिंधुदुर्ग, दुसरी आवृत्ती, ३ ऑगस्ट २००७.
२. वेदशास्त्र संपन्न बापट विष्णूशास्त्री, श्रीमनुस्मृती, (संपूर्ण मराठी भाषांतर).
३. प्रा. भोसले नारायण, डॉ. आंबेडकर आणि ब्राह्मणी इतिहास मीमांसा, दिग्नाग प्रकाशन, पुणे प्रथमावृत्ती, ६ डिसेंबर २००४.
४. साळवे मुक्ता, मांगमहाराच्या दुःखाविषयी निबंध, नाग–नालंदा प्रकाशन, इस्लामपूर, (सांगली) पुर्नमुद्रण, २ मे २००७ बुद्ध पौर्णिमा.
५. भालेराव इंद्रजित, महाराष्ट्राचे शिल्पकार ताराबाई शिंदे, महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळ, मुंबई, द्वितीय आवृत्ती, डिसेंबर २००८.
६. डॉ. बाबासाहेब आंबेडकर लेखन व भाषणे खंड १८, भाग २, डॉ. बाबासाहेब आंबेडकर चरित्र, साधने प्रकाशन व समिती, उच्च आणि तंत्रशिक्षण विभाग, महाराष्ट्र शासन, २००२.
७. खरात शंकरराव, डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे सामाजिक विचार, इंद्रायणी साहित्य प्रकाशन, पुणे २६ जानेवारी २००९.
८. कांबळे उत्तम, राजर्षी शाहू महाराज आणि महिला मुक्ती, सुगावा प्रकाशन, पुणे, प्रथमावृत्ती २६ जुलै २०१३ (राजर्षी शाहू महाराज जयंती)
९. भारतीय संविधान (दि. २६ सप्टेंबर २००६ पर्यंत फेरबदल केल्याप्रमाणे) भारत सरकार विधी व न्याय मंत्रालय, संचालक, मुद्रक व लेखन सामग्री, महाराष्ट्र शासन यांनी भारत सरकारच्या वतीने मुद्रित व प्रकाशित केले, २००६.
१०. सोनाळकर वंदना, शर्मिला रेगे, पितृसत्ता व स्त्रीमुक्ती, क्रांतिसिंह नाना पाटील अकादमी, अहमदनगर, द्वितीय आवृत्ती, ३ ऑगस्ट २००७.
११. चव्हाण आप्पाराव, अंधश्रद्धा आणि स्त्रीशोषण, दिग्नाग प्रकाशन, पुणे प्रथमावृत्ती १४ एप्रिल २०१२.



Scanned by CamScanner

ISSN 2277-8063

# शिक्षक विचार प्रक्रिया

प्रा. विजया लोखंडे
श्री संतकृपा इन्स्टिट्यूट ऑफ एज्युकेशन,घोगांव, ता.कराड, जि.सातारा

**प्रस्तावना :** शिक्षकाच्या अध्यापनक्षमतेवर शिक्षकाचे अध्यापन कार्य अवलंबून असते. शिक्षकाच्या अध्यापनावर त्याच्या विचारांचा प्रभाव पडत असतो. अध्यापनादरम्यान शिक्षक जे निर्णय घेतो त्यावर त्यांच्या विचारांचाच अधिक किंबहुना शिक्षकाचे अध्यापन ही त्याच्या विचारांची निष्पत्ती असते. अध्यापनाची सुरूवात ही व्यक्त वर्तनापेक्षा शिक्षकांच्या अव्यक्त विचार प्रक्रियेतून होते. शिक्षकास असलेले विषयज्ञान शिकविण्याच्या आशय व त्याची अध्यापन पध्दतीशी घातलेली सांगड, अध्यापनाचे नियोजन, प्रत्यक्ष अध्यापना दरम्यान घेतलेले या सर्व विचारप्रक्रिया अध्यापनाच्या व्यक्त वर्तनाच्या मुळाशी असतात. त्यांना शिक्षक विचार प्रक्रिया (Teacher Thought Process) असे म्हणता येईल. अध्यापन प्रक्रियेचे अविभाज्य अंग आहे. या विचार प्रक्रियेतून शिक्षक अध्यापन वर्तन प्रदर्शित करतो.

गेज यांच्या मते, अध्यापन प्रक्रियेतील अनेक घटकांमधील परस्पर संबंधाचे अचूक ज्ञान शिक्षकाला असेल तर त्याचा परिणाम त्यांच्या विचार प्रक्रियेवर होतो. त्याचप्रमाणे विद्यार्थ्यांचे वर्गातील वर्तन, वर्गातील परिस्थितीचाही परिणाम शिक्षक विचार प्रक्रियेवर होतो.

हाइट च्या मतानुसार अध्यापनाचा कोणताही फॉर्म्युला देता येणार नाही. हे मत बनण्याचे कारण अध्यापनाच्या पाठीमागे कार्यरत असलेली शिक्षक विचार प्रक्रिया होय.

शिक्षकांचे कोणतेही वर्तन वर्गअध्यापनात स्वतंत्रपणे घडत नाही. अनेक कृतींच्या मालिकेतील तो एक घटक आहे. अध्यापन ही अत्यंत गुंतागुंतीची प्रक्रिया आहे. वर्गाध्यापन हे तिचे व्यक्त स्वरूप आहे.

**शिक्षक विचार प्रक्रियेवरील संशोधने**

फिलिप जॅक्सन (१९६८) यांच्या Life in Classroom या पुस्तकात शिक्षक वर्तनामागील मानसिक प्रक्रियांचे वर्णन करण्याचा प्रथम प्रयत्न केला.

गेज यांनी The Scientific Basis of The Art Teaching या पुस्तकात शिक्षकांच्या अव्यक्त उपपत्ती आणि वर्गातील यांच्या परस्परसंबंध शोधाला जावा असे सुचविले आहे.

**शिक्षकांच्या विचार प्रक्रिया अभ्यासासाठी प्रतिमान.**

क्लर्क आणि पीटरसन (Clerk & Peterson) यांनी शिक्षक विचार प्रक्रियेतील विविध घटकांचा अभ्यास केला. या घटकांच्या अध्यापन परिणामकारकतेसंबंधी संशोधने करताना विचार केला जावा यासाठी एक प्रतिमान सुचविले आहे.




या प्रतिमानात पहिले विचार व दुसरी कृती अशी दोन क्षेत्रे दर्शविली आहेत. पहिले विचार प्रक्रियेचे क्षेत्र हे सहज निरीक्षणक्षम व मापनक्षम नाही शिक्षकांचे नियोजन करीत असतानाचे विचार, शिक्षक, प्रत्यक्ष अध्यापन करीत असतानाचे आंतरक्रियात्मक विचार व निर्णय आणि शिक्षकांच्या उपपत्ती हे तीनही घटक परस्पर संबंधित व परस्परासंबंधी आहेत. दुसरे क्षेत्र कृती व दृश्य परिणामाचे आहे. याबाबत केलेल्या संशोधनातून काही महत्वाची तत्वे मिळाली आहेत. उदा. अग्रत संघटकामुळे नवीन माहिती आत्मसात होण्यास मदत होते. प्रश्नानंतर पुरेसा वेळ थांबणे हे प्रश्नाच्या आकलनास पुरक ठरते. विद्यार्थी वर्तनाचा शिक्षक वर्तनावर परिणाम होतो. यासारखी तत्वे शिक्षक विद्यार्थी आंतरक्रिया या संदर्भात प्रकाश टाकतात.



Scanned by CamScanner

ISSN 2277-8063

या दोन्ही क्षेत्रांमध्ये दर्शविलेल्या बाणांतून शिक्षकांच्या विचार प्रक्रिया व कृती यातील परस्पर संबंध लक्षात येतो. शिक्षक कृतीवर शिक्षक विचार प्रक्रियेतील अडचणी व संधी यांचाही विचार अध्यापन प्रक्रियेचे आकलन होण्यासाठी करावा लागतो. शाळा, मुख्याध्यापक, समाज, अभ्यासक्रम साधन सुविधा इ.च्या संदर्भात शिक्षकाला अडचणी येतात. त्यामुळे काही विशिष्ट प्रकारच्या कृती करता येत नाहीत. त्या अडचणींना शिक्षकांच्या विचार प्रक्रियेवर प्रभाव पडतो. शिक्षक अशा अडचणींचा विचार जास्त करतो की, त्यातून मिळणाऱ्या संधीचा यावरही अध्यापन प्रक्रियेची परिणामकारकता अवलंबून असते.

**शिक्षक विचार प्रक्रियेचे गट प्रकार**

१. शिक्षकांचे नियोजन विषयक विचार
२. शिक्षकांचे आंतरक्रियात्मक विचार व निर्णय
३. शिक्षकांच्या अव्यक्त उपपत्ती आणि विश्वास

**१. शिक्षकांचे नियोजन विषयक विचार (Teacher Planning)**

पाठ नियोजन, घटक नियोजन, दैनंदिन नियोजन, अल्पकालीन नियोजन, दीर्घकालीन नियोजन, साप्ताहिक नियोजन , सत्र नियोजन, वार्षिक नियोजन, असे जवळजवळ आठ भिन्न प्रकारचे नियोजन शिक्षक करीत असतात. हे सर्व प्रकार एकमेकांशी निगडीत असतात. हे नियोजन करण्याची प्रत्येक शिक्षकांची पध्दती वेगळी दिसून येते. नियोजनाच्या शैलीवर त्यांच्या विचारांचा प्रभाव पडतो. नियोजन करताना शिक्षक उपलब्ध वेळ, उपलब्ध संदर्भ, साहित्य, आशय, साधने प्रत्यक्ष अध्यापनाचा वेळ, भोवतालची परिस्थिती या सर्वांचा विचार करून मगच निर्णय घेत असतो.

१. नियोजनामुळे अनिश्चितता, चिंता कमी होते सुरक्षितता मिळते व आत्मविश्वास वाढतो.
२. वेळेचा योग्य उपयोग होतो. अध्यापन साहित्य जमा करणे व त्याचे व्यवस्थापन करणे शक्य होते.
३. कृतींना दिशा मिळते.

नियोजन ही वर्षभर चालणारी प्रक्रिया आहे. अनुभवांचा नियोजनावर परिणाम होतो. अध्ययन निष्पत्तीबाबत जो काही विचार करतात त्यात क्रियात्मक निष्पत्तीपेक्षा बोधात्मक निष्पत्तीचे प्रमाण अधिक असते. नियोजनात ते आयत्यावेळी बदलही करतात. ते बदल करण्यास यांचे आंतरक्रियात्मक विचार व निर्णय प्रक्रिया कारणीभूत ठरतात.

**२. शिक्षकांचे आंतरक्रियात्मक विचार व निर्णय (Teachers Interactive Thoughts & Decisions)**

शिक्षकाच्या वर्गातील वर्तनावर त्याच्या आंतरक्रियात्मक विचारांचा प्रभाव असतो. व त्यातूनच तो निर्णय घेत असतो. शिक्षकाचे आंतरक्रियात्मक विचार आणि निर्णय यांचा अभ्यास करण्यासाठी बोधात्मक मानसशास्त्रज्ञ उद्दिपित प्रत्यावहन पध्दतींचा अवलंब करतात. या पध्दतीमध्ये शिक्षकांच्या अध्यापन वर्तनाची (ऑडिओ व व्हिडिओ) टेप तयार केली जाते व नंतर ती त्याला दाखवून त्यांच्या विविध कृतींवर आधारित प्रश्न विचारले जातात.

पीटरसन यांनी उद्दीपित प्रत्यावहन तंत्राचा वापर करून काही निष्कर्ष मांडले आहेत ते पुढीलप्रमाणे.

विचार १. बरेचसे शिक्षक वर्गाध्यापनाच्या वेळी सर्वात जास्त विचार विद्यार्थ्यांचा करतात.
२. विद्यार्थ्यांच्या खालोखाल शिक्षक अध्यापनाच्या प्रक्रियेबाबत विचार करतात.
३. शिक्षक काही प्रमाणात आशयाबद्दल विचार करतात.
४. शिक्षक सर्वात कमी विचार उद्दिष्टांबाबत करतात.

निर्णय – प्रस्तुत निष्कर्ष हे शिक्षकांनी जाणतेपणी घेतलेल्या निर्णयासंदर्भात आहेत.

१. शिक्षक पर्यायांचा विचार करतात. एखादा पर्याय निवडतात. व त्या अनुसार कृती करतात.
२. शिक्षक अध्यापन करताना विद्यार्थ्यांचे निरीक्षण करतात त्यावरून एखादी कृती सुरू ठेवायची की बदलायची याबाबत निर्णय घेतात.
३. दर दोन मिनिटांनी नवीन निर्णय शिक्षकांना घ्यावा लागतो.

**२. शिक्षकांच्या आंतरक्रियात्मक विचारांवर परिणाम करणारी तत्वे.**

१. **भरपाईचे तत्व** – सांस्कृतिक बौध्दिकदृष्या मागास विद्यार्थ्यांसाठी आपण काहीतरी केले पाहिजे असा विचार करणे.
२. **हेतूपूर्ण सौम्यतेचे तत्व** – मागास विद्यार्थ्यांच्या चुकांकडे दुर्लक्ष करणे.
३. **शक्ती सहभागाचे तत्व** – निवडक, योग्य विद्यार्थ्यांना हाताशी धरून त्यांच्यावर जबाबदारी सोपविणे.
४. **प्रगमनशील चाचणीचे तत्व** – विद्यार्थ्यांची प्रगती जाणून घेऊन त्यावर उपाय करणे आवश्यक आहे याची जाणीव होणे.
५. **भावनांवरील संयम** – विद्यार्थ्यांमध्ये व्यवस्थापन समस्या निर्माण होऊ नये म्हणून स्वतःच्या भावनांवर संयम ठेवणे.
६. **शिक्षक विश्वसनीयतेचे तत्व** – एक सच्चा प्रामाणिक मुक्त विचारसरणीचा शिक्षक म्हणून स्वतःची प्रतिमा विद्यार्थ्यांसमोर निर्माण होण्यासाठी वर्गात वातावरण निर्माण करण्याचा प्रयत्न करणे.
७. **स्वयं पर्यवेक्षणाचे तत्व** – स्वतःच्या वर्तनावर स्वतः लक्ष ठेवून ते योग्य असावे याबाबत जागरूक असणे.
८. **बोधात्मक शृंखलांचे तत्व** – शिकविताना पूर्वज्ञानाचा संबंध पुढील ज्ञानाशी जोडण्यावर भर देणे.
९. **एकात्मतेचे तत्व** – शिकविताना एका विषयाचा संदर्भ दुसऱ्या विषयासाठी वापरून अध्ययन संक्रमणावर भर देणे.
१०. **समापनाचे तत्व** – सर्व सारांश, सांगणे, मुख्य मुद्यांची उजळणी करणे.



Scanned by CamScanner

ISSN 2277-8063

११. **सहभागाचे तत्व** – सर्व विद्यार्थ्यांनी अध्ययनात सहभागी व्हावे यासाठी प्रयत्नशील राहणे.

१२. **समान वागणुकीचे तत्व** – सर्वांशी समानतेने वागण्यावर भर देणे.

अध्यापन चालू असताना स्वतःच्या व विद्यार्थी वर्तनासंबंधी शिक्षकाला अनेक निर्णय द्यावे लागतात. या निर्णयांना आंतरक्रियात्मक निर्णय म्हणतात. या तत्वांपैकी ज्या तत्वांना शिक्षक प्राधान्य देतात. त्यानुसार ते विचार करतात व निर्णय घेतात.

**३. शिक्षकांच्या अव्यक्त उपपत्ती व विश्वास – (Teachers Personal Theories & Beliefs)**

शिक्षक आपल्या अनुभवातून, चिंतनातून, अध्यापन व शिक्षक याविषयींची स्वतःची वैयक्तिक मते, तत्वे किंवा सिध्दांत बनवित असतो. या विचारांचा त्यांच्या अध्यापनावर परिणाम होत असतो. शिक्षकांची मते म्हणजे शिक्षकाचे अध्यापन विषयक वैयक्तिक विश्वास (Beliefs) होत. शिक्षकाच्या या वैयक्तिक विश्वासाचा वर्गातील आंतरक्रियांवर परिणाम होतो.

एखादा शिक्षक जर विद्यार्थ्यांच्या अपयशाचे स्वतःच्या अध्यापनात शोधत असेल तर तो अध्यापनाचे स्वयंमूल्यमापन करून त्यातील त्रुटींवर मात करण्याचा प्रयत्न करतो. या उलट एखादा शिक्षक विद्यार्थ्यांच्या अपयशासाठी ते स्वतःच जबाबदार असतात असे मानत असेल तर तो विद्यार्थ्यांच्या चुका शोधत राहतो. वर्गातील प्रत्येक कृतीविषयी शिक्षकाची जशी मते असतात तशीच अध्यापन विषयक काही नियम तत्वे व चांगल्या अध्यापनाच्या काही प्रतिमाही असतात.

शिक्षकांच्या अव्यक्त उपपत्ती म्हणजे आजूबाजूच्या वस्तू, व्यक्ती, पद्धती व त्यांचे गट याबद्दलच्या व्यक्तींच्या कल्पनांचा संच होय. त्या कल्पनानुसार तो आपले निर्णय घेत असतो.

खाली उदाहरण दाखल काही कल्पना व निर्णय.

| कल्पना | निर्णय |
|---|---|
| १. उच्च संपादनासाठी मूलभूत माहितीचे दृढीकरण करणे. | १ सोपे प्रश्न विचारणे. |
| २. प्रबलन सिध्दांताला महत्व देणे. | २ प्रत्येक बरोबर उत्तराची स्तुती करणे. |
| ३. प्रत्येक कृतीसाठी प्रोत्साहन देणे आवश्यक आहे असे वाटणे. | ३ विद्यार्थ्यांना प्रत्येक समस्या सोपी आहे असे वाटणे. |
| ४. विद्यार्थ्यांच्या प्रत्येक यशाचे कारण स्वतः आहे असे वाटणे. | ४ विद्यार्थ्यांच्या अपयशाचे कारण विद्यार्थ्यांवर फोडणे. |
| ५. आपण विद्यार्थ्यांना घडवू शकतो ही कल्पना. | ५ योग्य मार्गदर्शन करणे. |

**शिक्षक विचार प्रक्रियेबद्दल माहिती मिळविण्याची साधने व तंत्रे.**

१. **प्रकट विचार (Thinking Aloud)** शिक्षक अध्यापनाचे नियोजन करीत असताना व अभ्यासक्रमाबाबत निर्णय घेत असताना त्यांच्या मनात येणारे विचार मुक्तपणे प्रकटपणे बोलायला सांगून त्यांचे ध्वनिमुद्रण केले जाते. नंतर त्यांचे पृथ्थकरण करून शिक्षक विचारातील आशय, मानसिक प्रक्रियांचाक्रम निश्चित करता येतो.

२. **उद्दिपित प्रत्यावहन (Stimulated Recall)** यामध्ये शिक्षकांच्या अध्यापनाचे रेकॉर्डींग केले जाते. ती ध्वनी किंवा चित्रफीत पुन्हा त्या शिक्षकांना दाखविली जाते आणि त्या विशिष्ट वेळी कोणते विचार मनात आले होते कोणते निर्णय त्यावेळी घेतले, का घेतले, याबाबत माहिती आठवून सांगतात.

३. **धोरण विषयक माहितीची प्राप्ती (Policy Capturing)** यामध्ये शिक्षकांसमोर एखादी काल्पनिक अध्यापन परिस्थिती अथवा अभ्यासक्रम सादर केले जातात. त्याच्या वाचनानंतर शिक्षकांनी त्या संदर्भात आपल्या कृती, विचार, निर्णय नोंदवायचे असतात त्या नोंदीवरून शिक्षकांचे विश्वास, विचार, यासंबंधी अप्रत्यक्षरित्या माहिती मिळते.

४. **शिक्षकांची रोजनिशी** यामध्ये अध्यापनापूर्वीच्या तपशीलवार नियोजनाची नोंद रोजनिशीत करणे अपेक्षित असते. नियोजन याच पध्दतीने का केले, स्वतःच्या अध्यापन नियोजनाचे मूल्यमापन अशा नोंदी वाचून त्यावर अधिक स्पष्टीकरण विचारले जाते व त्यावरून निष्कर्ष काढले जातात.

**संदर्भ :**

१) सप्रे निलीमा आणि पाटील प्रिती, (जून २००७),' शिक्षणातील विचार प्रवाह' कोल्हापूर फडके प्रकाशन.

२) डॉ. भोसले रमा आणि डॉ.डोणे उज्वला (जानेवारी २००९) 'शिक्षणातील बदलते विचार प्रवाह कोल्हापूर,फडके प्रकाशन.

३) डॉ. मोरे चंद्रकांत आणि डॉ. भिलेगावकर सदानंद (सप्टेंबर २००५) 'शिक्षक शिक्षण पुर्ण', नित्य नुतन प्रकाशन.

४) Jackson w Philip, (1968), Life in class rooms, New York, Publisher, Holt, Rinehart and Winston

५) Gage N.L. Gage (1977) The Scientific Basis of the Art of Teaching, New York : Teachers college press, Columbia University.



Scanned by CamScanner

# आधुनिक राष्ट्र म्हणून भारताच्या विकासामध्ये गांधी विचारांची उपयुक्तता

**प्रा. राजेंद्र ओ. बेलोकार** सहा. प्राध्यापक व राज्यशास्त्र विभागप्रमुख, एस. एन. मोर कला, वाणिज्य आणि श्रीमती गोदावरीदेवी सराफ विज्ञान महाविद्यालय, तुमसर, जि. भंडारा

**प्रस्तावना** : आधुनिक राष्ट्र म्हणून भारताच्या उभारणीमध्ये तसेच राजकीय, सामाजिक, आर्थिक आणि सांस्कृतिक जडणघडणीमध्ये अनेक भारतीयांच्या योगदानाचा समावेश असला तरी आपल्या विचार आणि कार्यशैलीमुळे इतरांपासून भिन्न दिसणारे महापुरूष म्हणजे महात्मा गांधी होय. ज्यांनी आपल्या कार्यकर्तुत्वाने एका विशेष युगाची निर्मिती केली. ते म्हणजे 'गांधीयुग' होय. अचेतन समाजाला सचेतन बनविण्यामध्ये आणि अंधार युगार चाचपडणा–या भारतीय समाजालाच नाही तर वैश्विक समाजाला प्रकाशाचा हात दिला. ब्रिटीशाच्या राजकीय गुलामगिरीत खितपत पडलेल्या भारतीय बंधू–भगिनींना मुक्त करण्यासाठी सात्य, अहिंसाबरोबरच असहकार, हरताळ, सामाजिक बहिष्कार, धरणे, सविनय कायदेभंग, हिजरत, उपोषण आणि संप अशा सात्याग्रहाच्या साधनाचा उचित वेळी उपयोग करून भारताला राजकीय स्वातंत्र्य मिळवून देण्यामध्ये महत्वाची भूमिका बजावली आहे.

आजच्या आधुनिक काळामध्ये मानवाच्या आनंदमय, सुखी आणि विकसित जीवनासाठी महात्मा गांधीचे विचार हा एकमेव मुख्य मार्ग होय. हया मार्गाने मानवाने मार्गक्रमण केल्यास त्याच्या जीवनातील ज्वलंत समस्याची सोडवणूक होणार आहे यामध्ये शंका नाही. महात्मा गांधीचे भारतीय राजकारणातील स्थान अद्वितीय असून १९२० ते १९४८ म्हणजे लोकमान्य टिळकांचा मृत्यूनंतरचा काळ हा ''गांधीयुग'' म्हणून ओळखला जातो.

मॅचेस्टर माडियनने गांधीजीचे वर्णन 'राजकारणातील संत व संतामधील राजकारणी असे केले' तर बाबा बामटे म्हणतात, 'गरीबांचे जग जगवायचे असेल तर गांधीजींच्या प्रेरणेला पर्याय नाही'. महात्मा गांधींनी आपल्या 'साधी राहणी आणि उच्च विचारसरणीने' ब्रिटीश राजवट, भारतीय जनता आणि जगातील राष्ट्राचे लक्ष वेधून घेतले. गांधीजी हे जणू काही की राजकीय संमोहन तज्ञ होते. गांधीजी राजकारणात पडले असले तरी धार्मीक प्रवृत्तीचे होते. गांधीजीच्या राजकीय विचारांना धार्मीक आध्यात्मिक आणि नैतिकतेची जोड होती. गीता, रामायण महाभारत, उपनिषदे, पातंजलीचे युगसुत्रे, जैनधर्म, बौद्धधर्म, जॉन रस्कीनचा प्रभाव, टालस्टॉयचा प्रभाव, बायबलातील 'सरमन ऑन दि माऊंट' आदीचा विचाराचा प्रभाव पडला होता. गांधीजींनी धर्म जिज्ञासेतून आत्मदर्शन, आत्मदर्शनासाठी लोकसेवा, लोकसेवेसाठी राजकारण प्रवेश आणि राजकारणासाठी सत्याग्रह अशी त्यांच्या विचारांची आणि जीवनाची परिणती होती आणि जीवनातील सर्व समस्या सोडविण्यासाठी त्यांनी याचा वापर केला.

महात्मा गांधीचे आधुनिक भारताच्या इतिहासातील स्थान पाहता ते आदर्शवादी विचारवंत होते. त्याच्या विचारांवर धर्माचा प्रभाव असल्यामुळे साहाजिकच त्याचे विचार तात्विक स्वरूपाचे बनले होते. गांधीजी सत्य आणि अहिंसेचे पुजारी होते. कर्मनिष्ठता ही त्याची साधना होती. साधनाचे पावित्र्य राखणे हे त्यांचे व्रत होते. योग्य–अयोग्य हया त्यांच्या जनसेवेचा निकष होता. आचरण, विचार, कृती, निरिक्षण आणि आकलनातून गवसले त्याविषयी ते ठाम असायचे. परिस्थितीनुरूप चुका सुधारणे असे गांधीजीचे मत होते. स्वार्थासाठी पाठ फिरविणारे नव्हते तर स्वत:ची चूक मान्य करून सुधारित भूमिकेचा स्वीकार करण्याएवढे ते मोठे होते. त्यांची एकूण जीवननिष्ठा सामान्य माणसाच्या जगण्या–वागण्याविषयीची असल्यामुळे ते महात्मा झाले.सत्य, अहिंसा, साध्य आणि साधनाच्या पावित्र्याविषयी त्याच्या थोरपणाचा विचार करता ते आचरणवादी होते. त्याच्या आचार विचार आणि कृतीमध्ये हिंसेला अजिबात स्थान नव्हते. ते नेहमी साध्य आणि साधनाच्या पावित्र्याबद्दल आग्रही असायचे. यामध्ये त्यांनी तडजोड कधीच केली नाही. महात्मा गांधीजीचे विचार मानने ही निष्ठा नव्हे तर त्यांचे विचार आचरणात आणून प्रत्यक्ष कृती करणे म्हणजे खरी निष्ठा होय.

स्वातंत्र्य लढयामध्ये अग्रणी, देदिप्यमान नेतृत्वगुण अंगी असलेला लोकनेता, मृतप्राय भारतीयांना संजीवनी देणारा समाजसुधारक आणि शांतीच्या मार्गाने सर्वांगिण क्रांतीचे रणशिंग फुंकणारा राष्ट्रपिता असे महात्मा गांधीजींचे मूल्यमापन आपण करतो. चरख्यावरून सुत कातणारे, दांडी यात्रेचे नेतृत्व करणारे, लंडनच्या बकिंग होम पॅलेसमध्ये केवळ पंचा नेसून अनवाणी पावलांनी प्रवेशणारे गांधीजीच होते, चंपारण्य सत्याग्रह आणि १९४२ चे 'चले जाव आंदोलन' आदीच्या प्रत्येक कार्याला सत्य आणि अहिंसेची जोड होती. देशाच्या स्वातंत्र्यप्राप्तीसाठी राजकारणात असलेल्या गांधीजींनी सत्तेची हाव न धरता राजकारणाला एक आध्यात्मिक उंची दिली. सत्य, अहिंसा, अस्तेय ब्रम्हचर्य, असंग्रह, शरीरश्रम, अस्वाद, सर्वत्र भयवर्जन सर्वधर्मी समानत्व, स्वदेशी स्पर्शभावना ही एकादश सेवावी नम्रत्वे व्रत निश्चये गांधीजींनी प्रतिपादीत केलेली ही अकरा कलमी आचारसंहिता म्हणजे सर्व धर्मातील सारभूत तत्वे होती यालाच 'गांधी विचारधारा' म्हटल्यास वावगे ठरणार नाही.

महात्मा गांधी म्हणजे पूर्णपणे सार्वजनिक जीवन जगणारा माणूस, व्यक्तीगत जीवन पूर्णत: सार्वजनिक जनजीवनात समर्पित करून 'वसुधैव कुटूंबकम' अशा आशयाचे आदर्श जीवन जगलेला माणूस गांधीजींना त्यांच्या जीवनातील सर्वच गोष्टी मग त्या छोटया वा मोठया असोत किंवा भल्या–बु–या असोत, सार्वजनिक केल्यास आपल्या अंत:करणातील विचार व विकारांच्या संघर्षातून विकास कसा झाला. याचे वर्णन गांधीजींनी



Scanned by CamScanner

 ISSN 2277-8063

आपले आत्मचरित्र 'सत्याचे प्रयोग' मध्ये केले आहे.भारत भ्रमणातून त्यांनी भारतीय जनसमुदाय आपले दैवत बनून भारतीय धर्म, जीवनविषयक दृष्टीकोन, सभ्यता आणि संस्कृतीला चांगल्याप्रकारे समजून घेतलेले आपणास दिसते. त्यांनी अन्यायी, अत्याचारी तसेच जूलमी ब्रिटीशाच्या विरोधात भारतीय स्वतंत्र सेना निर्माण केली. या सेनेचे ते सेनापती होते. त्यातील सैनिकाप्रमाणेच गांधीजीसुद्धा आयुष्यभर एक वस्त्र व अर्धनग्न राहून जीवन जगले. त्यांनी आपल्या सैनिकांना आत्मनिर्भर बनविण्यासाठी चरखाच्या माध्यमातून खादीद्योग विकसित केला. गांधीजींनी स्वत: हट्टी तर होतेच त्याहीपेक्षा अधिक ते सत्याचे शोधक होते. ज्या शाश्वत भारतीय मूल्यांची सांगड त्यांनी व्यावहारीक जीवनाशी घातली, जी आंदोलने उभी केली, चळवळी केल्या त्यामूळे ख–या अर्थाने त्याचे जीवन सत्याची प्रयोगशाळा झाले.

गांधीजींनी कधीही अधिकार मागितलाच नाही. पण जबाबदारी मात्र स्वीकारलेली व निष्ठापूर्वक पार पाडलेली आपणास दिसते. जेणेकरून अधिकार त्याचेकडे धावत आलेत इंग्रजांच्या जुलमी सरकारच्या दडपशाहीला, हिंसेला, सत्याने, अहिंसेने आणि निर्भयतेने उत्तर दिले. चंपारण्य सभागृह, मिठाचा सत्याग्रह, १९४२ मध्ये 'चले जाव आंदोलन' करून ब्रिटीशाच्याविरूद्धचा जनतेच्या मनातील भीती कायमची नष्ट केली. आणि भारतामध्ये स्वातंत्र्याचा सुर्योदय केला. गांधीच्या सहकार्याने भारतामध्ये हिंदू–मुस्लिम एकता, अस्पृश्यता निवारण, खादी ग्रामाद्योग, कुटीर पालन, हिंदी भाषेचा प्रचार, ग्रामस्वराज्य, सत्तेचे विकेंद्रीकरण, विश्वस्त संकल्पना, स्वदेशी, राष्ट्रीय शिक्षण, स्त्रियांची उन्नती, खेडयांची स्वयंपूर्णत:, सर्वधर्म समभाव, सामुहिक शेतीची संकल्पना, व्यक्ती जीवनावर आधारित शिक्षण पद्धती, मुलोद्योगी शिक्षणाला प्राध्यान्य, व्यसनमुक्ती, अवघड उद्योगांच्या विरोध, रामराज्याची संकल्पना, कल्याणकारीराज्याची संकल्पना, सर्वोदयाची कल्पना, अंतोदयाची संकल्पना आदी सारख्या कार्यक्रमातून सामाजिक, राजकीय, आर्थिक, शैक्षणिक व सांस्कृतिक क्षमता ख–या प्रस्थापित करण्याचा प्रयत्न केला.

संपूर्ण मानवतेचा विकास करणारे एवढे महत्वपूर्ण विचार देऊनही आज पुन्हा भारतामध्ये गांधीजी ऐवजी त्यांचा मारेकरी नत्थुराम गोडसेचे पुतळे उभारण्याची भाषा ऐकू येत आहे. वैचारिक मतभेद बंदूकीच्या गोळीने संपविले जात आहेत, पराकोटीची असहिष्णूता व धर्मांधता डोके वर काढत आहे. आज राष्ट्रीय एकात्मतेसमोर जातियवाद, सांप्रदायवाद, प्रांतवाद, आर्थिक विषय, भ्रष्ट्राचार, नक्षलवाद, दहशतवाद यासारख्या समस्या डोके वर काढत आहेत. तथाकथीत उच्च तंत्रज्ञानाने मुठभर लोक प्रचंड संपत्तीचे मालक बनले. पण हजारो शेतकरी मात्र आत्महत्येसच पात्र ठरलेत, असे का व्हावे ? या शोधात भारतीय मूल्यांची लोकव्यवहारांशी सांगड घालून गांधीजींनी सुखी समाधानी भारताचे स्वप्न पाहीले होते. त्या शाश्वत मूल्याचीच आज अवहेलना होत आहे. जगभर हिंसाचाराचे प्रमाण वाढले आहे. गांधीच्या सत्य, अहिंसा, सदाचार, प्रेम या मानवी मूल्यांचा भारतातच नाही तर संपूर्ण जगामध्ये दररोज खून होत आहे. या समस्याचे निर्मुलन करायचे असेल तर गांधीजींचे विचार आणि तत्वज्ञान उपयुक्त आणि प्रासंगिक ठरतात.

आज जगामध्ये होणारा मानवी संहार, जातीभेदाधित राजकारण आणि धर्मा–धर्मातील संघर्ष दिवसेंदिवस वाढत आहे. जर आपल्याला ही अवहेलना, हिंसा थांबवायची असेल तर गांधीजींचे विचार अवलंबणे व त्याचा प्रचार करून प्रत्येक व्यक्तीने आचरणात आणून प्रत्यक्ष कृतीत उतरविणे ही आजच्या काळाची मुख्य गरज आहे आणि तेच महात्मा गांधीजींच्या विचारांचे व कार्याचे ख–या अर्थाने फलित असेल.

**संदर्भ सूची :**


१) आडे विकास (संपादक), राष्ट्रीय एकात्मता आणि महात्मा गांधी, जी. सी. पब्लिशर्स, नागपूर, प्रथम आवृत्ती, २०१४.

२) दैनिक देशोन्नती, २ आक्टोबर २०१५.

३) बोराळकर, कु. दि. भारतीय राजकिय विचारवंत, पिंपळापूरे ॲण्ड पब्लिशर्स, नागपूर.

४) दैनिक देशोन्नती, ३० जनवरी २०१६.

५) महात्मा गांधी, सत्य के प्रयोग, अथवर आत्मकथा, गांधी साहित्य, खंड – ८, संस्था साहित्य मंडळ, दिल्ली.

६) दैनिक पुण्यनगरी, ०२ ऑक्टोंबर २०१५.

७) महात्मा गांधी, सत्याग्रहाची जन्मकथा, खंड – ५, महाराष्ट्र गांधी स्मारक निधी प्रकाशन, गांधी भवन, पुणे.

८) दैनिक भास्कर, ३० जनवरी २०१६.




Scanned by CamScanner

# दहशतवाद आणि भारत–पाक–चीन संबंध

प्रा.डॉ.विनोद को.गायकवाड
ग.भि.मुरारका महाविद्यालय, शेगांव मो.9850324202

प्रस्तावना :

सन 1965, 1971 व कारगिल युध्द या तिनही युध्दात पाकचा मोठा पराभव झाला. 1965 व 1971 च्या युध्दाला अमेरिकेचा अप्रत्यक्ष पाठिंबा असतांनाही हे दोन्ही युध्दा पाकला जिंकता आले नाहीत. भारताला सरळ–सरळ युध्दात जिंकणे शक्य नाही हे पाक सरकारला समजल्यानंतर त्यांनी छुप्या युध्दाचा मार्ग पत्करला हे छुपे युध्द दुहेरी मार्गाने सुरू आहे. पहिला मार्ग नियंत्रण रेषेवर वारंवार होत असलेला गोळीबार आणि दुसरा मार्ग म्हणजे दहशतवाद्यांना शस्त्रांच्या पुरवठ्यासह पाकभूमीचा वापर करु देणे व भारतातील दहशतवादी कारवाईस मदत करणे. भारत–पाक नियंत्रण रेषेवर युध्द विराम लागु झाल्यानंतरही वारंवार शस्त्रसंधीचे उल्लंघन करून पाककडून गोळीबार करणे नित्याचेच बनले. यामागे भारतीय सैनिकांना गुंतवूण ठेवून दुसऱ्या मार्गाने दहशतवादी भारतात पाठविणे हा उद्देश त्यांचा असतो.

एका बाजुला दोन्ही देशांच्या विदेश सचिवांच्या बैठकी सुरू असतात तर दुसऱ्या बाजुला नियंत्रण रेषेवर गोळीबार सुरू असतो. शांतता प्रस्थापित करण्यासाठी चर्चा सुरू असतांना दुसरीकडे जर शस्त्रसंधीचे उल्लंघन होत असेल तर ही चर्चा कशासाठी हा प्रश्न पडतो. भारतासोबत चांगले संबंध ठेवण्यात पाकला अपयश आले ही खंत असली तरी अजुनही वेळ गेलेली नाही, अशी कबुली पाकचे पंतप्रधान नवाज शरीफ यांनी ट्रीय सुरक्षा परिषदेला संबोधितांना इस्लामाबादमध्ये दिली. लगेच दुसऱ्या दिवशी जम्मूच्या सिमेवर भारतीय चौक्यांवर व सिमेलगत लोकवस्त्यांवर गोळीबार करण्यात आला. हा प्रकार म्हणजे आंतरट्रीय समुदायासमोर फक्त संबंध सुधारण्याचा आभास निर्माण करणारा आहे. यापुर्वी सुध्दा अनेकदा पाक नेतृत्वाकडून शांतता प्रस्थापित करण्याचे ढोंग केले गेले आणि कारगिल घडले. पाकचे माजी लष्करप्रमुख व माजी ट्रापती मुशर्रफ यांनी वारंवार भारतविरोधी वक्तव्य करून पाक सैनिकांचे मनोबल वाढविल्याची उदाहरणे आहेत. दोन्ही देशांमध्ये शांतता प्रस्थापित करावयाची असेल तर सर्वप्रथम पाक नेतृत्वाने आपल्या कथनी व करणीमध्ये जे अंतर आहे, त्याचे आत्मपरिक्षण करावे, चर्चा व छुपे युध्द या दोन्ही गोी एकाचवेळी सोबत सोबत प्रवास करू शकणाऱ्या नाहीत. परस्परविरोधी विचारसरणीत पाक वाटचाल करीत आहे. पाक सरकार व आय.एस.आय. यांच्यात ताळमेळ नाही किंवा आय.एस.आय. वर भारत धोरणाबाबत पाक सरकारचे नियंत्रण नाही म्हणूनच तेथे दहशतवादी छावण्या स्थिरावल्या.

उद्दिष्ट्ये :

1) दहशतवादविरोधी लढाईत अमेरिकेची व भारताची भूमिका तपासणे.
2) पाक कडून वारंवार उल्लंघन होणाऱ्या शस्त्रसंधीचा आढावा घेणे.
3) दहशतवादाबाबत पाक–अमेरिका संबंधाचा आढावा घेणे.
4) पाक–अमेरिका संबंधातील दुरावा आणि चीनची भूमिका तपासणे

दहशतवादाबाबत अमेरिकेने घेतलेल्या ठोस भूमिकेचा विचार मोदी सरकारला करावा लागणार आहे. अमेरिकेतील वर्ल्ड ट्रेड सेंटरवर ओसामाने केलेल्या दहशतवादी हल्ल्याचा बदला घेण्याकरीता अमेरिकन सरकारने अफगाणिस्तानवर हल्ला केला आणि तेथील तालीबान राजवट उलथवून टाकली, त्यानंतर लादेन हा पाकमध्ये लपलेला आहे हे स्प झाल्यानंतर रातोरात पाकवर सैनिकी कारवाई करून लादेनला मारले व त्याचे प्रेतही दिसू दिले नाही. ही केली गेलेली कारवाई आंतरट्रीय समुदायांशी साधी चर्चाही न करता तसेच पाक सरकारची परवानगी न घेता अमेरिकेने केली. एका दहशतवादी हल्ल्याच्या मोबदल्यात अमेरिकेने अशी मोठी ड्डुती केली. भारताला तर गेल्या 67 वर्षापासून दहशतवादाची झळ पोहोचत आहे. सार्वभौम भारताच्या संसदेवरही हल्ला झाला, तरीही भारताने पाकसह आंतरट्रीय समुदायाशी चर्चा करण्यापलीकडे ठोस काहीही केले नाही म्हणूनच पाकची हिम्मत वाढली. पाकमध्ये प्रत्यक्ष युध्द जिंकण्याची हिंमत नसली तरी छुपे युध्द करून भारतातील अंतर्गत शांतता भंग करण्याचा वारंवार प्रयत्न केल्या जात आहे. प्रत्यक्ष युध्द करणे दोन्ही देशांना परवडणारे नाही म्हणूनच पाक दहशतवाद्यांमाफत भारताला त्रास देतो आणि भारत तो सहन करतो, पण असे किती दिवस चालणार.

आतापर्यंतच्या भारतीय पंतप्रधानांचा आढावा घेतल्यास असे दिसते की, एकाही पंतप्रधानाने दहशतवादाविरोधात मोठी कारवाई केलेली नाही. भारतीय विमानांचे अपहरण करून ते पाकमध्ये उतरविले जाते आणि त्या मोबदल्यात आम्ही दहशतवाद्यांची सुटका करतो, भारताला हवे असलेले डॉन दाऊद सह इतर दहशतवादी म्होरके पाकमध्ये वास्तव्यास असून त्यांच्या अनेक छावण्या तेथे आहेत, अनेकदा त्यांचे दुरदर्शनच्या



Scanned by CamScanner

माध्यमातून जगाला दर्शनही होते, अनेक दहशतवादी प्रशिक्षण केंद्र पाकमध्ये आहेत, याबाबतचे सर्व पुरावे भारताकडे असतांनाही भारताचे पंतप्रधान फक्त शाब्दीक लढाईच लढतांना दिसतात, फक्त राजदुत परत बोलाविणे किंवा पाकच्या राजदुताला बोलावून समज देणे यापेक्षा वेगळे काहीही झालेले नाही. जम्मू काश्मीर भारताचा अविभाज्य भाग असल्यामुळे तेथे कायम शांतता ठेवण्याची जबाबदारी भारत सरकारची आहे. पण तेथे शांतता ठेवण्यास भारत सरकारला अपयश येत आहे हे नाकारता येणार नाही.

**शस्त्रसंधीचे उल्लंघन :** नोव्हेंबर 2003 मध्ये भारत–पाक नियंत्रण रेषेवर युध्द विराम लागू केल्यानंतरही पाककडून वारंवार शस्त्रसंधीचे उल्लंघन होत असून भारतीय सैनिकांवर गोळीबार केल्या जात आहे आणि भारत फक्त सौम्य भाषेत चेथावणी देण्यापलीकडे काहीही करतांना दिसत नाही.भारताला हवे असलेल्या दहशतवाद्यांची यादी पाककडे दिली आहे. या यादीतील जवळ–जवळ सर्वच दहशतवाद्यांचा मुक्त संचार पाकमध्ये असून बरेचदा ते जाहीररित्या कॅमेऱ्यासमोर येतात, तरीही ते सर्व पाकमध्येच आहे, हे मान्य केल्या जात नाही. तसेच आंतरराष्ट्रीय समूदाय सुध्दा पाकवर दबाव वाढवित नाहीत.

जानेवारी 2013 मध्ये जम्मूतील पुछच्या मेंढर सेक्टरमध्ये पाक सैनिकांनी नियंत्रण रेषा पार करून गस्त घालणारे भारतीय सैनिक हेमराज सिंग आणि सुधाकर सिंग यांचा शिरच्छेद केला होता. लष्कर–ए–तोयबाला भारतात घुसण्यास अपयश येत असल्याने पाक लष्कराची 'बॉर्डर ॲक्शन टीम' लष्करच्या दहशतवाद्यांना मदत करीत असल्याची माहिती भारतीय गुप्तचर संस्थेकडे असतांनाही भारताकडून ठोस निर्णय घेण्यास विलंब झाला, त्याचा परिणाम भारताने आपले दोन सैनिक गमाविले.

सात महिन्यानंतर लगेच पुछ भागात नियंत्रण रेषा ओलांडून भारतीय हद्दीत घुसून पाक सैनिकांनी केलेल्या गोळीबारात पाच भारतीय जवान शहीद झाले, यावेळी पुन्हा पाककडून शस्त्रसंधीचे उल्लंघन करण्यात आले. परंतु नेहमीप्रमाणे पाक सैनिकांनी नियंत्रण रेषेवर गोळीबार केल्याचा पाक लष्कराने इन्कार केला. या हल्ल्यात पाक जवानांचा कोणताही हात नसल्याचे पाक लष्कराने म्हटले आहे. उलट भारतावरच गोळीबाराचा आरोप करून पाकने इस्लामाबादमधील भारतीय उप उच्चआयुक्तांना बोलावून समज दिली. याला म्हणतात 'चोराच्या उलट्या बोंबा.' पाकच्या या भ्याड हल्ल्याचे भारतीय संसदेत तीव्र पडसाद उमटले, भारतीय सैनिकांवर हल्ला करणारे हे पाक सैनिक नसून त्यांच्या गणवेशातील दहशतवादी होते, अशी माहिती संरक्षण मंत्री ए.के. अँटनी यांनी लोकसभेत देताच प्रचंड गोंधळ झाला आणि तो होणे स्वभाविकच होते. कारण संरक्षण मंत्रीपदावरील व्यक्तीकडून असे बेजबाबदार वक्तव्य अपेक्षित नव्हते. परराष्ट्र मंत्रालयाने पाकच्या उप उच्चआयुक्तांना बोलावून तीव्र शब्दात निषेध व्यक्त केल्याची माहिती संरक्षण मंत्र्यांनी सभागृहाला दिली. विरोधकांचा गोंधळ वाढल्यामुळे तिसऱ्या दिवशी संरक्षण मंत्र्यांनी सावरासावर करून आपले निवेदन बदलविले. त्यानुसार पुछमध्ये घुसखोरी करून पाच भारतीय सैनिकांना ठार करणारे दहशतवादी नव्हे तर पाक लष्कराचे विशेष प्रशिक्षित जवान होते, असे सुधारीत निवेदन संरक्षण मंत्र्यांनी सभागृहात दिले. त्यानंतर सभागृहातील गोंधळ कमी झाला. परंतु भारताने संसदेचा दोन दिवसाचा अमुल्य वेळ व पैसा चर्चेविना वाया घालविला. तसेच पाच जवानही गमविले. याला जबाबदार पाक असतांनाही आम्ही मात्र शांती वार्ता चालूच ठेवणार आहोत.

भारताला हवा असणारा दहशतवादी डॉन दाऊद पाकमध्येच होता, मात्र तो सध्या तेथे नाही, असा गौप्यस्फोट पाक पंतप्रधानांचे विशेष दुत शहरयार खान यांनी नुकताच केला. या वक्तव्यावरून दाऊद हा पाकमध्येच आहे, हे स्प होते. तसेच पाकमध्ये दाऊदच्या घरासह सर्व माहिती उपलब्ध असतांना तो पाकमध्ये नाही, असे जाहीरपणे पाककडून घोषीत केल्या जाते. जमात–उल–दावा आणि लष्कर–ए–तोयबा या बंदी घातलेल्या संघटनांचा प्रमुख असलेला दहशतवादी हाफिज सईद याने ईदनिमित्त लाहोर येथे चेथावणी देणारे भाषण नुकतेच केले. तो मुंबईवरील दहशतवादी हल्ल्याचा सुत्रधार असून भारताला हवा आहे. अमेरिकेने सईदच्या शिरावर तब्बल 1 कोटी डॉलरचे बक्षीस जाहीर केले. तरीही पाकमध्ये हाफिज अगदी खुलेआम फिरतो आहे. पाक सरकारने त्याला तात्पुरती अटक करून नंतर सोडूनही दिले. परंतु भारताकडे मात्र सोपविले नाही.

भारताला हवे असणारे दहशतवादी तर पाक सोपविणार नाहीच, उलट तोच आपल्या सैनिकांना वारंवार नियंत्रण रेषेवर गोळीबार करण्याचे आदेश देत आहे. तरीही 'दिल मिले या न मिले, हाथ मिलाते रहीये' असे वक्तव्य करण्या इतके आम्ही लाचार बनलो आहे का? जे हात हस्तांदोलन करतात तेच हात जर भारतीय सैनिकांचा शिरच्छेद करण्याचे आदेश लिहीत असतील तर करण्यात येणाऱ्या हस्तांदोलनाचा पुनःर्विचार करण्याची वेळ निश्चीतच आली आहे. सध्या अल–कायदा दहशतवादी संघटनेच्या हल्ल्याच्या शक्यतेमुळे अमेरिकेने लाहोर येथील आपले दूतावास अनिश्चीत काळासाठी बंद केले आहे. पण हे सर्व आम्ही का करू शकत नाही?यापूर्वी संसदेवर झालेला हल्ला हा भारताच्या सार्वभौमत्वावर हल्ला होता. त्यावेळी जर आम्ही पाकमध्ये घुसून हवे असलेले सर्व दहशतवादी ताब्यात घेतले असते तर आंतरराष्ट्रीय समुदायाने सुध्दा त्याला विरोध केला नसता. जे अमेरिका करू शकते, ते आम्ही करू शकतो हे दाखविण्याची ती खरी वेळ होती. पण



Scanned by CamScanner

तीही संधी आम्ही गमाविली. महात्मा गांधीजींच्या अहिंसक भारतात मोठ्या प्रमाणावर पाक पुरस्कृत हिंसा होत आहे. भारत नेहमीच शांतीवार्ता सुरू ठेवण्यासाठी पुढाकार घेत आला. पण तो प्रयत्न प्रत्येकदा एकतर्फी ठरला. पाक फक्त शांतीवार्ताचे ढोंग करीत असून त्याचा अंतस्थ हेतू वेगळाच आहे. तरीही तो आंतरऱ्राीय पातळीवर आक्रमण हे भारतच करतो असा कांगावा करीत असतो. त्यामुळे पाकसोबतचे सर्व संबंध तोडून टाकणेच योग्य आहे, आणि जनसामान्यांचीही हीच इच्छा आहे.

पाकने केलेल्या हल्ल्यात रामसिंह मीना यांच्यासह सहा जवान शहीद झाले. प्रत्युत्तरादाखल भारतीय लष्कर परिस्थीतीनुसार कारवाई करण्यास मुक्त आहे, असा इशारा संरक्षण मंत्र्यांनी दिला असला तरी तो पुरेसा वाटत नाही. पाक हल्ल्यानंतर भारतात उमटलेल्या जनप्रक्षोभाची दखल घेवून ठोस निर्णय भारत सरकारने घ्यावा. पाक वारंवार चुका करून तो मी नव्हेच अशी भूमिका घेत असेल. तर आम्हालाही आमची भूमिका बदलविणे गरजेचे ठरते. आंतरऱ्राीय पातळीवर पाक पुरस्कृत दहशतवादावर फक्त चर्चा करून चालणार नाही, तर पाक सैनिकांसह दहशतवाद्यांचा भारताला होणारा त्रास पुराव्यासह जगासमोर ठोसपणे मांडून त्या आधारावर आंतरऱ्राीय समर्थन प्राप्त करावे. खरे म्हणजेच येथेच आम्ही कमी पडलो. आमच्या सहनशिलतेचा कळस झाल्यामुळे पाकला फक्त इशारे देणे बंद करून जशास तसे उत्तर देण्याच्या अपेक्षेने करोडो भारतीय वाट पाहत आहेत.

**चीन–पाक मैत्रीचा नवा अध्याय.**

ओसामा बिन लादेनला पाकमध्ये यमसदनी पाठविल्यानंतर आणि अनेक दहशतवादी संघटनांचे मुख्यालय पाकमध्ये असल्याचे स्प झाल्यानंतर पाक व अमेरिका संबंधात तणाव निर्माण झाला. या दोन्ही देशांदरम्यान संबंध दुरावत जात असल्याचा फायदा चीनने घेतला. विशेष म्हणजे चीन व अमेरिका संबंध अजुनही हवे तसे सलोख्याचे बनले नाहीत. दुसरे असे की, भारत व पाक मधील तणाव दोन्ही देशांच्या निर्मितीपासून कायम आहे, या तणावपुर्ण संबंधाचा फायदा घेण्याची संधी चीन शोधत होता. गेल्या काही वर्षात चीनला ती संधी मिळाली आणि हे दोन्ही देश एकत्र आले. अमेरिका–पाक संबंधात दुरावा निर्माण होत असल्यामुळे पाक ला एका मित्राची गरज होती तीही भारताविरोधात. ती पोकळी भरून काढण्याचा प्रयत्न मदतीचा हात पुढे करून चीन करतांना दिसतो. आता तर लख्वी प्रकरणाने अधिकच स्प झाले.

नोव्हेंबर 2008 मध्ये मुंबईवर झालेल्या दहशतवादी हल्ल्यात 166 नागरिक मारले गेले. या दहशतवादी हल्ल्याचा मुख्य सुत्रधार झकी–उर–रहेमान लख्वी हा होता. तो पाकीस्तानमध्ये मुक्तसंचार करतो याबाबत भारताकडून वारंवार पुरावे दिल्यानंतर त्याला पाक सरकारने अटक केली. पाक न्यायालयात त्यावर खटला सुरू असतांना भारताकडून लख्वी हा दहशतवादी कारवाईत सहभागी असल्याचा सबळपुरावा सादर न केल्यामुळे त्याला सोडण्याचा निर्णय एप्रिलमध्येच न्यायालयाने घेतला. तेव्हाही भारताकडून आंतरऱ्राीय समुदायासमोर या निर्णयाबाबत निषेध नोंदविला. त्याला प्रतिसाद देत अमेरिका, रशिया, फ्रान्स, जर्मनी व ब्रिटन या देशांनीही लख्वीला पुन्हा अटक करण्याची मागणी केली. परंतु पाक ने त्याकडे दुर्लक्ष केले. त्यानंतर हा प्रश्न संयुक्त ऱ्रासमोर मांडण्याचा निर्णय भारत सरकारने घेतला. लख्वी हा एक दहशतवादी असून त्याचा अनेक दहशतवादी संघटनांशी संबंध आहे. अशा दहशतवाद्यांची सुटका जर पाक करीत असेल तर पाक वर निर्बंध लादावे, असा प्रस्ताव भारत सरकारकडून मांडण्यात आला.

हा प्रस्ताव ऱ्रासंघ निर्बंध समितीसमोर चर्चेस आला या चर्चेदरम्यान अमेरिकेने पाक विरोधात भूमिका घेतली हे स्प झाल्यानंतर चीनने मात्र पाक ची बाजू घेतली. पाक न्यायालयाने या अगोदर जे स्प केले तेच चीन प्रतिनिधीने समितीसमोर म्हटले. भारताने या संदर्भात पुरेसे पुरावे सादर न केल्यामुळे आम्ही नकाराधिकाराचा वापर करीत असल्याची भूमिका चीनने घेतली. त्यानंतर दुसऱ्या प्रस्तावाला म्हणजे पठाणकोट येथील भारतीय हवाईदलाच्या तळावर झालेला दहशतवादी हल्ल्याचा सूत्रधार जैसे–महंमदचा प्रमुख मसुद अझहर यांच्यावर बंदीला चीनने यु.एन.मध्ये विरोध केल्याने त्याच्यावर बंदी लावण्यास विलंब होणार आहे. चीनने नकाराधिकाराचा वापर केल्यामूळे पाकवर कारवाई करण्यास संयुक्त ऱ्रा हतबल ठरला. पाच पैकी एकाही कायम सदस्याने नकाराधिकाराचा वापर केल्यास ही संघटना काहीही करू शकत नाही. चीनच्या या भूमिकेमुळे तो दहशतवादाचे समर्थन करतो की काय असा प्रश्न आंतरऱ्राीय समुदायाला पडला. चीनचा हा निर्णय आंतरऱ्राीय समीकरणे बदलविणारा ठरणार आहे. दहशतवादाला ज्या–ज्या देशाने दुसऱ्या देशाविरोधात वापरले काहीवर्षानंतर तेच दहशतवादी वापरणाऱ्या देशाविरोधात उभे राहील्याची उदाहरणे आहेत. याचा चीनला विसर पडल्याचे दिसते.

दुसऱ्या महायुध्दानंतर रशियाविरोधात अल कायदाप्रमुख ओसामा बीन लादेनला अमेरिकेने वापरले. शेवटी तोच लादेन अमेरिकेवर उलटला. अमेरिकेतील दहशतवादी हल्ल्यानंतर लादेनला मारण्यासाठी आर्थिक मंदीची झळ पोहोचत असतांनाही अब्जो रुपये खर्च करावे लागले. पाक मध्ये माजी पंतप्रधान बेनजीर भुट्टो यांची झालेली हत्त्या व इतर ठिकाणी झालेले दहशतवादी हल्ले, अफगाणिस्तानमधील संसदेवर झालेला हल्ला असे अनेक उदाहरणे देता येतील. अमेरिकेकडून मिळणाऱ्या मदतीच्या जोरावर पाक दहशतवाद्यांना खतपाणी घातले



Scanned by CamScanner

पण ते भारताविरोधात वापरले जात असल्यामुळे अमेरिकेने त्याकडे दुर्लक्ष केले. संयुक्त राष्ट्रामध्येही पाकचीच बाजु अमेरिका घेत होता. बरेचदा पाक हिताकरीता भारतावर अमेरिका दबाव वाढवित होता. अशाप्रकारे तेव्हा जी चुक अमेरिकेने केली तीच चुक सध्या चीन करतांना दिसतो. शीतयुध्दाच्या दरम्यान संयुक्त राष्ट्राच्या कायम सदस्य देशांनी स्वतःच्या स्वार्थाकरीता अनेकदा नकाराधिकाराचा वापर केला. शीतयुध्दाच्या समाप्तीनंतर व रशियाच्या विघटनानंतर काही प्रमाणात संयुक्त राष्ट्राच्या सदस्या देशातील गटबाजीला लगाम लागला होता. परंतु दहशतवादासारख्या मुद्दयावर चीनने नकाराधिकाराचा वापर केल्यामुळे आंतरराष्ट्रीय गटबाजी वाढणार.

**निष्कर्ष** . भारताचे पंतप्रधान नरेंद्र मोदींनी काश्मीर दौरा केला या दौऱ्यात त्यांनी जवानांशी व हवाई दलातील अधिकाऱ्यांशी संवाद साधला. यावेळी प्रथमच पंतप्रधानांनी पाकवर टिका केली, प्रत्यक्ष युध्दात मारल्या गेलेल्या लोकांपेक्षाही अधिक निरपराध या छुप्या युध्दात मारले जात आहेत, पाकचे छुप्या युध्दाचे डावपेच फक्त भारतातच नव्हे तर जगभरात वापरले जात आहेत, त्यामुळेच त्याविरुध्द जगभरातील देशांनी समान ध्येयाने एकत्र यावे, असे आवाहन पंतप्रधानांनी केले. पाकच्या छुप्या युध्दावर आंतरराष्ट्रीय दबाव म्हणून आंतरराष्ट्रीय समुदायाला केलेले आवाहन कौतुकास्पद असले तरी ती आतापर्यंतच्या पंतप्रधानांचीच रि ओढणारी आहे. येथे नरेंद्र मोदींनी लोकसभा निवडणुकीदरम्यान पाक पुरस्कृत दहशतवादाला आळा घालणाऱ्या मुद्दयांवर केलेल्या चर्चेची आठवण होते आणि तेच पंतप्रधान मोदींनी करावे ही जनसामान्यांची इच्छा आहे. पाकच्या छुप्या युध्दावर कायम तोडगा काढण्यासाठी मोदी सरकारला वेळ लागेल. त्याकरीता वेगळ्या कुटनितीची आवश्यकता असून दहशतवाद विरोधी आंतरराष्ट्रीय धोरण ठरविण्यास भारताला पुढाकार घ्यावा लागणार असला तरी ते अशक्य नव्हे. दहशतवादाविरोधात अमेरिकेसारखे ठोस कारवाई पंतप्रधानांनी करावी, अशी भारतीयांची अपेक्षा आहे. 'दिल मिले या न मिले, हात मिलाते रहीये' या दृीकोनात बदल करून ' ना दिल मिले, ना हात मिले, जो भी मिले लष्करी कारवाईसे मिले' हा दृष्टीकोन अंमलात आणून छुप्या युध्दावर तोडगा काढणे आवश्यक आहे. आमची अहिंसक विचारधारा असली तरी वेळ आल्यास हिंसेचे उत्तर आम्ही हिंसेनेच देऊ शकतो हे पुन्हा एकदा दाखविण्याची निश्चीतच वेळ आली. भारताच्या पंतप्रधानांनी पाकच्या छुप्या युध्दावर शस्त्रक्रिया करण्याचे धाडस करावे, अन्यथा निरपराध भारतीय जनतेसह कश्मीर सुरक्षित आहे, असे म्हणणे आभासात्मक होईल.

चीनच्या नकाराधिकारामुळे पाक ला बळ मिळाले हे बळ भारताविरोधात असले तरी त्याचा आधार दहशतवाद आहे हे जगाने विसरु नये. आशिया खंडातील चीन व पाक या दोन देशाचे संबंध सलोख्याने बनत असतील तर चांगले आहेत पण ते जर दहशतवादासारख्या मुद्दयांवर एकत्र येवून भारताला शह देण्याचा प्रयत्न करीत असतील तर ते या तीनही देशांना त्रासदायक ठरणार. दहशतवाद ही एक मानव जातीविरोधातील विकृती आहे. या विकृतीला पाठीशी घालण्याच चुक कोणताही देश करीत असेल तर पुढे त्याची झळ त्याच देशाला सोसावी लागणार आहे. दुसरे असे की, भारत, चीन व पाकच्या सीमा लागुन आहेत. त्यामुळे भारतात अशांतता निर्माण करण्यासाठी चीन आपल्या भूमीचा वापर दहशतवाद्यांना करु देवू शकतो अशी भिती चीनच्या व्यवहारामुळे निर्माण झाली. हिंदी–चीनी भाई–भाई चा नारा देणारे दोन्ही देशांतील संबंध नेहमीच सीमवादापर्यंत येवून थांबले. चीनच्या या हेकेखोरपणामुळे त्यावर अद्यापपर्यंतही तोडगा काढता आला नाही. आता तर त्यावर तोडगा निघेल असे वाटत नाही. ''हम पास पास है मगर साथ–साथ नही'' हे पंतप्रधान मोदींचे वक्तव्य खरे ठरलेले दिसते. आतापर्यत संयुक्त राष्ट्रामध्ये पाकची पाठराखण अमेरिकेने केली. सध्या चीन करीत आहे हा भारतासह अमेरिकेला शह देणारा निर्णय असला तरी दहशतवादाने अख्ख्या जगाला विळखा घातला, त्यावर वेळीच तोडगा न काढल्यास प्रत्येक देशातील शांतता भंग पावल्याशिवाय राहणार नाही. म्हणुनच चीन–पाक मैत्रीचा नवा अध्याय आंतरराष्ट्रीय समुदायांना गांभीर्याने घेणे गरजेचे आहे.

संदर्भग्रंथ :

1) आंतरराष्ट्रीय संबंध – डॉ.वसंत रायपूरकर
2) आंतरराष्ट्रीय संबंध – डॉ.बी.डी.तोडकर
3) भारतीय परराष्ट्र धोरण – डॉ.शैलेंद्र देवळाणकर
4) भारतीय एवं विश्व – एन.एन.ओझा
5) यु.एन.मधील चर्चा
6) बदलते समाजकारण आणि राजकारण – डॉ.अलका देशमुख
7) मासिकातील व वृत्तपत्रातील लेख



Scanned by CamScanner

# ना. गोपाळकृष्ण गोखले व त्यांचे समकालीन नेतृत्व :एक दृष्टीक्षेप

डॉ.सुजाता पाटील, राज्यशास्त्र विभाग,देवचंद महाविद्यालय,अर्जुननगर.कोल्हापूर

प्रस्तावना –

स्वातंत्र्यपूर्व काळात भारतात एक वेगळी दिशा दाखविणारे, मार्गदर्शन करणारे, संस्कृती, सामाजिक जडणघडण आणि भारताचा विकास यावर भर देवून प्रत्यक्ष कृती व सुधारणा करणारे काही महत्वपूर्ण प्रभावी व्यक्तीमत्व होते. त्यातील एक म्हणजे नामदार गोपाळकृष्ण गोखले होय.

ना. गोखलेंनी सन 1889 मध्ये राजकीय कार्याला सुरवात केली. सन 1888 ला पुण्यात भरलेल्या मुंबई प्रांतिक परिषदेत त्यांनी भाषण केले. मुंबई इलाखातील गव्हर्नर लॉर्ड रे यांच्या कार्यासंदर्भात शासनाची भूमिका पाहून 1889 मधील भाषणात गोखले यांनी असे उद्‌गार काढले की, 'इंग्लंडच्या उज्वल प्रतिमेवरील डाग धुवून काढण्याचा प्रयत्न लॉर्ड रे यांनी केला होता. लॉर्ड रे यांच्या मूठभर निंदकांच्या प्रयत्नांमुळे भारतमंत्र्यांनी यात हस्तक्षेप केला व लॉर्ड रे यांचे प्रयत्न निष्फळ ठरले याबाबत त्यांनी आश्चर्य ही व्यक्त केले. त्यांनी टाईम्स ऑफ इंडियावर प्रहार केला. क्रॉफर्ड प्रकरणातील त्यांचे भाषण विशेष गाजले. त्यामुळे नवोदीत राजकारणी व्यक्ती म्हणून जनतेसमोर त्यांची प्रतिमा निर्माण झाली.

जिवनपट : जानेवारी 1885 मध्ये डेक्कन एज्युकेशन सोसायटीच्या पुणे न्यू इंग्लिश स्कूलमध्ये शिक्षक म्हणून कार्य केले. त्याच वर्षी एल.एल.बी. पास झाले. 1886 डे.ए.सो. चे आजीव सभासद झाले. विविध लेख त्यांचे प्रसिध्द होवू लागले. 1888–1896 पर्यंत पुणे सार्वजनिक सभेचे कार्यवाह म्हणून काम पाहिले. 1892 पर्यंत सुधारक इंग्रजी विभागाचे संपादक म्हणून कार्य केले. 4 नोव्हेंबर 1896 ला डेक्कन सभेचे सेक्रेटरी बनले. 1896 मध्ये गांधीजींबरोबर पहिली भेट झाली. 1898 ला पुणे नगरपालिकेचे सरकारनियुक्त सभासद म्हणून कार्यरत, 1899 ला मुंबई विधी मंडळात निवडून गेले. 1900 प्लेग कमिशनर नियुक्ती, 1901 जिल्हा नगरपालिकेला जातीय प्रतिनिधीत्वास विरोध केला. 1902–1905 पर्यंत पुणे नगरपालिकेचे अध्यक्ष म्हणून कार्य केले. 12 जून 1905 ला भारत सेवक समाजाची स्थापना केली. 1905 ला कॉंग्रेसमार्फत इंग्लंडमध्ये सप्टेंबर ते डिसेंबर या कालावधीत शिष्ट मंडळात होते. 1905 मध्ये वारणसी कॉंग्रेसचे अध्यक्ष 1906 एप्रिल ते सप्टेंबर या काळात पुन्हा राजकीय सुधारणांसाठी शिष्ट मंडळातून इंग्लंडला गेले. 1908 मध्ये सत्ता विकेंद्रीकरणात रॉयल कमिशनपुढे पुरावा सादर केला. रानडे अर्थशास्त्र संस्था स्थापन केली. 1910 मध्ये नाताळ वेटबिगार बंदीचा ठराव केला. प्राथमिक शिक्षण हे सक्तीचे व मुक्तद्वार करण्याचा ठराव केला. तसेच मुद्रण वृत्तपत्र विधेयकार टिका केली. 1911 प्राथमिक शिक्षण सक्तीचे व मोफत करण्यासंबंधी वरीष्ठ विधीमंडळात विधेयक सादर केले. राजद्रोही सभाबंदी विधेयकास विरोध केला. 5 सप्टेंबर 1918 ला ब्रिटीश पार्लमेंटने त्यांचा पब्लिक सर्व्हीस कमिशनमध्ये समावेश केला. 1912 ला गांधीजींची इंग्लंडमध्ये भेट घेतली. अशा प्रकारच्या अनेक कार्यातून त्यांची राजकीय प्रतिमा कीती प्रभावशाली बनत गेली हे त्यांच्या जीवनपटाकडे बघीतल्यावर लक्षात येते. ही कार्ये करीत असताना त्यांची अनेक राजकीय, सामाजिक, प्रशासकीय व्यक्तींशी संपर्क येत गेला. त्यातूनही ते घडत गेले. गोखल्यांचे समकालीन आणि त्यांच्यातील संबंध याचाही प्रभाव परिणाम त्यांच्या जीवनावर निश्चीतच पडलेला जाणवेल. त्यांचे समकालीन असलेल्या महत्वपुर्ण व्यक्तीशी असणारे विचार व कार्य संबंध याचा थोडक्यात आढावा घेण्याचा प्रयत्न प्रस्तुत शोध निबंधात केलेला आहे.

गोखल्यांनी गोपाळ गणेश आगरकरांचे ऋषीतुल्य असे शिक्षकी जीवन अनुसरणे योग्य वाटले. आगरकरांचा मनाचा मऊपणा हा आप्त स्वकीय समुहात पहावयास मिळे. पण इतर वेळी नाही. गोखले मात्र मनाने अतिशय मऊ होते. अगदी प्राण्याला झालेल्या वेदनासुध्दा त्यांना सहन होत नसे. आगरकरांचे कष्ट हे सामाजिक–राजकीय अन्यायाविषयी समाजाला जागे करण्यात व समाजाचा अध्यात्मिक अधिकार वाढविण्यासाठी खर्च झाले. आगरकरांच्या 'हे विश्वची माझे घर' असा उद्देश गोखलेंनी स्विकारला होता. आगरकरांना 'सुधारकाचे संपादक' म्हणून कार्य करताना अनेक धमक्या यायच्या पण त्यास भिक न घालता ते निर्भयपणे कार्य करीत रहायचे. हे गोखल्यांनी जवळून पाहिले होते. त्यामुळे गोखलयांच्या जीवनातही अशा खुनाच्या धमकीची पत्रे आले तरी ते निश्चयापासुन न ढळता कर्तव्यनिष्ठता पार पाडत राहीले. आगरकरांनी आपल्या अंतिम संस्काराचा बोजा कोणावरही पडू नये पेटीत म्हणून 20 रूपये ठेवले होते. ते पाहुन गोखले भारावून गेले. ही घटना त्यांनी मनात जपून ठेवली. ज्यावेळी 1913 ला पब्लिक सर्व्हीस कमिशनचा दोन हजारच्या पगारामुळे गोखल्यांना वरीष्ठ विधीमंडळाचे सदस्य राहता येणार नाही. अशी भूमिका विधीमंडळाच्या आवारात उमटल्यावर, आगरकरांच्या निःस्वार्थी वृत्तीचा प्रभाव असलेल्या गोखल्यांनी एक पैसाही पगार घेणार नाही. असे स्पष्ट जाहीर केले. आगरकरांचे कार्य हे राष्ट्रीय पातळीवर मर्यादीत राहीले तर गोखलेंची कीर्ती आंतरराष्ट्रीय पातळीवर झाली. म्हणजेच आगरकरांच्या व्यक्तीमत्वाचा मोठा प्रभाव ना.गोखले यांच्या घडण्यात झालेला होता, असे म्हणणे चूकीचे ठरणार आहे.

1887 मध्ये गोखले व हरी नारायण आपटे यांचा स्नेह जुळला. हरी नारायण आपटे हे एक सामाजिक कादंबरीकार होते. पूर्ण समाजाचा अभ्यास करून समाजाला मार्गदर्शन करणारी कादंबरी लिहिण्याचा उद्देश हरी नारायण आपटेंचा होता. तर समाज अभ्यासक असणाऱ्या आपटेंचा देशाच्या सेवेसाठी राजकारणी म्हणुन सहभाग व्हावा असे गोखलेंना वाटत होते. गोखलेंना राजकीय पंथ निर्माण करावयाचे होते. त्यांना हरी नारायण आपटे यांनी पाठींबा दर्शविला. 1905 मध्ये भारत सेवक समाजाच्या स्वरूपात पुढे त्यांनी अस्तित्वात आणले. गोखले आणि आपटे यांचे संबंध



Scanned by CamScanner

अतिशय जवळचे होते. 1909 ला विधीमंडळाच्या बैठकीला जाताना गोखलेंच्या जिवावर बेतलेला प्रसंग आपटयांमुळे टळला. म्हणजे जिवलग मैत्री याचाच हा प्रत्यय म्हणता येईल.मुंबईतील एलिफस्टन कॉलेजमध्ये गोखले व कर्वे यांची भेट झाली. स्त्रीयांच्या प्रश्नासंदर्भात कर्वेच्या कार्याला जितकी साथ देता येईल तेवढी गोखले यांनी दिली. विधवांच्या प्रश्नाला महर्षींनी महत्व देवून समाज सुधारणेचे उपासक बनले. सामाजिक कार्यात कर्वे तर राजकीय कार्यात गोखले यांनी आपली वेगळी ओळख निर्माण केली.

महात्मा गांधी व गोखले यांच्यातील संबंध हे निर्मळ असल्याचे जाणवते. गोखल्यांनी हिंदू – मुस्लिम ऐक्याची भूमिका घेतली होती. अस्पृश्य निवारण ही त्यांच्यासाठी महत्वाचे होते. ज्यासाठी गांधीजीही आग्रही होते. गोखल्यांची नैतिक भाव विवेकनिष्ठा ही गांधीजींना भावली होती. गोखले हे गांधीजी भारत सेवक समाजाचे अध्यक्ष व्हावेत यासाठी प्रयत्न करत होते. पण गांधीजी हे भारत सेवक समाजात गेले नाहीत. पण गरज भासल्यास गांधीजी गरजेच्या वेळेस गोखल्यांकडे मदत करण्यास जात होते. अफ्रिकेत गोखल्यांनी गांधीजींना सत्याग्रह संग्रामाला आर्थिक सहाय्य केले. सरकार दरबारात असलेल्या आपल्या वजनाचा वापर करून सहकार्य केले. त्यामुळे गांधीजी ही दक्षिण अफ्रिकेच्य सत्याग्रहाच्या यशात गोखल्यांचे सहकार्य लाभल्याचे स्पष्ट करतात. त्यांच्यातील नाते गुरू–शिष्याचे होते.

न्यायमुर्ती रानडे व गोखले यांचे नाते अतुट होते. न्यायमुर्ती रानडेंच्या तालमीत गोखले तयार झाले होते. रानडेचे व्यवस्थितपणा, नियमितपणा, दिर्घोद्योग, चिकाटी, कोणत्याही गोष्टींचा सखोल अभ्यास करणे, देशाभिमान, तत्वनिष्ठता इ. वैशिष्ट्यपुर्ण गुण गोखल्यांनी आत्मसात केले होते. इतिहास, अर्थशास्त्र, राजकारण इ. चा सखोल अभ्यास त्यांनी केला. सरकारी कारभाराबाबत वास्तवाला धरून योग्य मुल्यमापन केल्याशिवाय बोलायचे नाही याची शिस्त न्यायमुर्ती रानडेनीच गोखल्यांना लावली होती.विरोधक किंवा निंदकांचा उपयोग आत्मसुधारणेसाठी एखाद्या गुरूप्रमाणे न्या.रानडे करीत असत. गोखल्यांनीही त्यांचा हा गुण उचलला होता. योग्य वेळी नमते घेणे, काही वेळेस समाजाठी हिताचे असते हे त्यांनी वेल्बी कमिशनपुढील साक्षीच्या वेळी पुराव्याच्या अभावी केलेल्या विधानाबाबत माफी मागावयास लावून दाखवून दिले.अशा पध्दतीच्या वैचारिक संस्कारांनीच न्या. रानडेंनी गोपाळकृष्ण गोखलेना आपल्या तालमीत त्यांनी तयार केलेले होते. लोकमान्य टिळक हे जहालवादी विचारसरणीचे तर गोखले हे नेमस्तवादी होते. 1893 मध्ये वाळव्यातील 'छोटी कॉंग्रेस' सभा झाल्यानंतर रेल्वेतून पुण्यास परत जाताना टिळक व गोखले यांची भेट झाली. दोघांनाही लोकशाही स्वराज्याचे ध्येय होते. गोखल्यांची भूमिका सरकारबरोबर जेथे आवश्यकता असेल तेथे सहकार्य व जिथे गरज असेल तिथे विरोध ही होती. त्यामुळे टिळकांना स्वराज्यासाठी गोखल्यांचा सहभाग महत्वाचा वाटला. चिकाटी, मनोधैर्य व बुध्दीमत्ता या तिनही गोष्टी टिळक व गोखल्यांकडे होते. टिळक हे राजकारणात बेदारकवृत्ती, डावपेचा, प्रतिस्पर्ध्याला करण्याचे ध्येय बाळगत. तर गोखले हे राजकारणातही साधेपणा होते. असे असले तरी या दोघांनाही आपल्या जीवनाच्या अंतापर्यंत एकाच उद्देश सफलतेसाठी लढले. गोखल्यांना वाटत होते की, ब्रिटीश राजवटीला पर्याय नसुन त्यांच जास्तीत जास्त उपयोग करून घेतला पाहीजे तर टिळक म्हणत स्वातंत्र्य हिरावून घेतलेल्यांना आपण दरडावून विचारले पाहीजे. देश स्वातंत्र्यासाठी दोघांचीही भूमिका परस्पर पूरक असली तरी विचारसरणीत मतभेद दिसुन येतात, असे असले तरी लोकमान्यांनी गोखल्यांबाबत असे उद्‌गार काढले होते की, परराष्ट्रीय वकील होण्यापेक्षा हिंदुस्थानाचे गृहमंत्री होण्यास आपण पात्र आहात. इतका त्यांच्या नैतिक, नम्र, वक्तशीरपणा, बुध्दीमत्ता मनोधैर्य अशा स्वभावाचा टिळकांना विश्वास होता.

अशा प्रकारे ना.गोपाळ कृष्ण गोखले यांचे समकालीन होते. गो.ग.आगरकर, न्या.रानडे, लो.टिळक, म.गांधी, म. कर्वे, यांच्याबरोबर दादाभाई नौरोजी, लाला लजपतराय, सुरेंद्रनाथ बॅनर्जी, सर फिरोजशहा मेहता इ. अशा समकालीन नेत्यांबरोबरही तितकेच स्नेहपुर्ण व निःस्वार्थी संबंध होते. देशाला पारतंत्र्यातून मुक्त करण्यासाठी गोपाळ कृष्ण गोखले यांचे विचार हे नैतिकतेला, शांततेला धरून होते. विकास प्रक्रियेला सर्व प्रथम स्थान देणारे होते. राजकीय परिस्थितीनुसार त्यांच्यात निर्णयक्षमता होती. व त्यांच्या समकालीन नेतृत्वांनाही त्यांच्या बाबतीत असाच विश्वास असलेला आढळतो.

शेवटी निष्कर्षाप्रत येताना असे जाणवते की, आज 21 व्या शतकात पुन्हा एकदा गोपाळ कृष्ण यांच्यासारखे बहुआयामी व्यक्तीमत्वाचे नेतृत्व भारतास प्राप्त होणे गरजेचे आहे. त्याचबरोबर योग्यवेळी निर्णय क्षमता असणारे, आक्रमक किंवा हिंसावादी असणाऱ्या नेतृत्वाऐवजी शांत, संयमी, असणे अशी गोखले सारखी आचार विचार बुध्दीवादी विचारसरणीचे व्यक्तीमत्व घडणे ही काळाची गरज बनली आहे, असे म्हणणे चूकीचे ठरणार नाही.

**संदर्भ :**

1 बलराम नंदा, गोपाळकृष्ण गोखले, मॅजेस्टिक बुक स्टॉल, अनुवाद वसंत पळशीकर बाजीराव पेठ, पुणे. 2

2 मासिके व इंटरनेटवरील लेख



Scanned by CamScanner

# भारतातील स्थानिक शासनसंस्था: ७३ व्या घटनादुरूस्तीचे स्वरूप आणि फलनिष्पत्ती

**प्रा. झाकीरहुसेन हाकीम संदे**
क्रांतिअग्रणी जी.डी.बापू लाड महाविद्यालय, कुंडल ता. पलूस जि.सांगली मोबा. ९२७०५३३००३

**प्रस्तावना** २०१४ च्या मे महिन्यात केंद्र सरकारमध्ये सत्तातंर होवून संयुक्त पुरोगामी आघाडीचे (UPA) सरकार पायउतार झाले आणि राष्ट्रीय लोकशाही आघाडीचे (NDA) सरकार पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या नेतृत्वाखाली सत्तारूढ झाले काही दिवसातच सरकारने १०० स्मार्ट सिटी बनविण्याची घोषणा केली. त्याचबरोबर जगभरातील खाजगी गुंतवणूकदारांना भारतात विविध क्षेत्रात गुंतवणूक करण्यासाठी निमंत्रित करण्यात आले. या सर्व परिप्रेक्षात ग्रामीण भारत दुर्लक्षित होतो की काय? असा प्रश्न मनात निर्माण होणे स्वाभाविक होते परंतू ११ ऑक्टोबर २०१४ रोजी स्व.जयप्रकाश नारायण यांच्या जयंतीचे औचित्य साधून वाराणसीजवळच्या जयापूर खेडयामध्ये पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या हस्ते सांसद आदर्श ग्राम योजना (SAGY) कार्यान्वीत करण्यात आली तसेच दूसरी एक योजना भारत सरकारने १४ एप्रिल २०१६ रोजी डॉ. आंबेडकरांचे जन्मस्थान असलेल्या मध्यप्रदेशातील महू या खेडयातून पंतप्रधान नरेंद्र मोदींच्या हस्ते ''ग्रामोदय से भारत उदय अभियान'' या योजनेची सुरूवात केली हे अभियान १४ एप्रील ते २४ एप्रील २०१६ असा फक्त ११ दिवसांचा होता व या अभियानात अनेक कार्यक्रमांची रेलचेल होती.

रालोआ सरकारने ग्रामीण भारताच्या उन्नतीसाठी केलेल्या या दोन्ही योजनांचा तटस्थपणे अभ्यास केल्यास या दोन्ही योजना म्हणाव्या तेवढया प्रभावशाली झालेल्या दिसून येत नाहीत. त्यामुळेच आपोआप १९९३ साली झालेल्या ७३ व्या घटना दुरूस्तीचे स्मरण होणे व त्यातील बारकावे अभ्यासणे स्वाभाविक ठरते.

७३ वी घटना दुरूस्ती ही भारतीय ग्रामीण राजकीय व्यवस्थेमध्ये अमुलाग्र बदल घडवून आणणारी ऐतिहासिक घटना ठरली. ग्रामीण भारताच्या जडणघडणीत महत्त्वपूर्ण भूमिका बजावणारी ही घटना अचानक किंवा आकस्मित घडलेली नव्हती. त्याला फार मोठा कालापव्यय करणारा इतिहास आहे. या घटना दुरूस्तीमुळे महिला आणि अल्पसंख्याकांना राजकीय प्रवेशासाठी हक्काचे प्रवेशद्वार उपलब्ध झाले व हे दोन दुर्लक्षित घटक देशाच्या ग्रामीण राजकारणात महत्त्वपूर्ण भूमिका बजावताना किंबहुना निर्णय निर्धारण प्रक्रियेमध्ये सहभागी होताना दिसू लागली.

भारतीय राज्यघटनेने सुरूवातीपासूनच लोकशाही आणि सत्तेच्या विभाजनाचा पुरस्कार खंबीरपणे केला. सत्तेचे विभाजन अर्थातच विकेंद्रीकरण किंवा सत्तेचे तळागाळापर्यंतचे सर्व घटकातील वितरण हे भारतीय लोकशाही राज्यघटनेचे वैशिष्ठय ठरले आहे. लोकशाही व्यवस्था मजबूत आणि सक्षम करावयाची असेल तर सत्तेचे विकेंद्रिकरण हा घटक अपरिहार्य ठरतो. किंबहुना त्याशिवाय लोकशाहीला कोणतेही भवितव्य उरत नाही. देशाच्या उन्नतीसाठी किंवा प्रगतीसाठी गाव, खेडे किंवा ग्राम हा अत्यंत महत्वाचा आणि मध्यवर्ती घटक आहे. देशातील बहुसंख्य लोक शेती आणि संबंधीत व्यवसायानिमित्त खेडयातच रहिवास करतात.

पुराणात तरी गावांची व्याख्या अशी दिली आहे.
तथाशूद्र जन प्राया। सुसमृध्द कृषीवला।
क्षेत्रो पभोग भूमध्ये वसतिर्ग्राम संज्ञिता।।

जिच्याभोवती किर्दसार – वहितीला योग्य – जमीन आहे, आणि जिच्यामध्ये मातब्बर शेतकरी व पुष्कळसे मजुर आहेत. अशा वस्तीला गाव म्हणतात.[१] या वरून आपणास खेडयाचे महत्त्व देशाच्या अर्थव्यवस्था व समाज व्यवस्थेत किती आहे हे स्पष्ट होते अशाच ग्राम किंवा खेडयामध्ये देशाची बहुसंख्य जनता राहिलेली आहे. त्यामुळे देशाच्या विकासाची सुरूवात खेडयातून शहराकडे अर्थातच खालून वर म्हणजे केशाकर्षन पध्दतीने झाली पाहिजे. म. गांधींना देखील ग्रामराज्य, रामराज्य, सर्वोदय व्यवस्था या अंगाने विकसित होणारी समाजव्यवस्था अभिप्रेत होती.

संसदिय लोकशाही व्यवस्थेमध्ये अधिकारांचे वितरण पध्दतशीरपणे होते या गोष्टीवर घटना समितीमध्ये मतभिन्नता होती परंतु शेवटी पंचायती राजव्यवस्थेचा स्विकार घटना समितीने देखील केला. परोपकारी व सहकार्यशील पंचायतींनी युक्त असे सुधारित ग्रामीण जीवन आणि विकेंद्रित शासनव्यवस्थेमुळे अगदी तळागाळापर्यंत पोहोचणारी लोकशाही याचे घटना समितीच्या सदस्यांनाही आकर्षण वाटले.[२] अर्थातच घटना समितीने देखील पंचायती राज व्यवस्थेवर शिक्कामोर्तब केले होते.



Scanned by CamScanner

तसेच समकालीन मोठया पुढाऱ्यांनीसुध्दा या व्यवस्थेचे खंबीरपणे समर्थन केले होते. ''भारतीय लोकांना हजारो वर्षापासुन अपमान व बळजबरी सहन करावी लागली आहे. आणि त्यांना यापासून सन्मान व स्वातंत्र्य देण्यासाठी लोकशाही व्यवस्था आवश्यक आहे. असे नेहरूंचे मत होते. लोकशाही पध्दती क्रांतिकारक आहे आणि तो मध्यमार्ग आहे असे पं. नेहरूंचे सांगणे होते.''[३]

वरील सर्व गोष्टींचा अभ्यास केल्यास भारतामध्ये सामान्य माणसापासून घटना परिषदे पर्यंत स्थानिक शासन संस्था या सर्वमान्य होत्या असे स्पष्ट होते. मॉटेस्क्यु प्रणित सत्तेच्या विभाजनाचा सिध्दांत केवळ शासन संस्थेच्या तिन्ही शाखांमध्ये अधिकारांचे विभाजन सुचविते परंतु भारतीय राज्यघटना त्याच्याही पूढे जावून केंद्रसरकार, राज्यसरकार, जिल्हा परिषद, पंचायत समिती, ग्रामपंचायत तसेच शहरातील नगरपालिका व महानगरपालिका अशा विविध पातळयांवर सत्तेचे वितरण करून खरी राजकीय सत्ता लोकांच्या हातामध्ये सुपूर्द करताना दिसते अशा या ग्रामीण भारतातील स्थानिक शासन संस्थांचा इतिहास किंवा पार्श्वभूमी अभ्यासणे. या निबंधाच्या दृष्टीने उपयोजित ठरते.

**भारतातील स्थानिक शासन संस्थांची ऐतिहासिक पार्श्वभुमी**

भारतातील स्थानिक शासन संस्थांचा इतिहास अत्यंत व्यापक आणि विस्तृत स्वरूपाचा आहे. साधारण पाच हजार वर्षापासुनचा इतिहास उपलब्ध आहे. या संपुर्ण कालखंडात पंचायती राज व्यवस्थेचे अस्तित्व अनन्य साधारण असल्याचे सिध्द होते. रामायण, महाभारत, वेद, कौटिल्याचे अर्थशास्त्र अशा अनेक ग्रंथात कालपरत्वे या स्थानिक शासन संस्थांचे अस्तित्व सिध्द होत राहते. प्राचीन काळात ग्रामीण पातळीवर अत्यंत स्वयंपूर्ण आणि स्वायत्त अशा ग्रामीण संस्था होत्या. त्यांना सभा किंवा समिती असे म्हटले जात. प्रथम सभा आणि नंतर समिती असा उल्लेख ऋग्वेदात आढळतो.

मोघल आणि इंग्रजांच्या कालखंडात या संस्था म्हणाव्या तेवढया प्रमाणात उभारी घेवू शकल्या नसल्या तरी व्हाईसराय लॉर्ड रिपन याने मात्र त्यांना नवसंजीवनी देण्याचा प्रयत्न केला त्यामुळे त्यास स्थानिक शासन संस्थाचा जनक म्हणतात. यानंतर १९०७ च्या रॉयल कमीशनचा अहवाल, १९०९ च्या २४ व्या लाहोर कॉंग्रेस अधिवेशनातील ठराव, १९१९ चा मॉटेग्यु चेम्सफर्ड सुधारणा अहवाल १९३५ चा भारत सरकारचा कायदा, आणि १९५० ची भारतीय राज्यघटना असा अत्यंत दिर्घ प्रवास करीत या संस्था आपले अस्तित्व टिकवण्यात यशस्वी ठरल्या. खेडयात ग्रामपंचायत, तालूका पातळीवर पंचायत समिती, जिल्हा पातळीवर जिल्हा परिषद अशी त्रिस्तरीय रचना बलवंतराय मेहता समितीने आपल्या अहवालात सुचविली ''कै बलवंतराव मेहता समितीने सुचविलेल्या विकेंद्रीकरणाच्या या त्रिस्तरीय व्यवस्थेस पंतप्रधान जवाहरलाल नेहरू यांनी पंचायत राज हे संबोधन दिले व त्याच नावाने ते देशभर रूढ झाली आहे.''[४]

**७३ व्या घटना दुरूस्तीचे स्वरूप आणि फलनिष्पत्ती**

ग्रामीण भारताच्या जीवनावर अमुलाग्र परिवर्तन घडविणाऱ्या या घटना दुरूस्तीकरिता माजी पंतप्रधान राजीव गांधी यांनी देखील खुप मेहनत घेतली होती. नंतर ७३ व्या घटनादुरूस्तीचे विधेयक २२ डिसेंबर १९९२ ला लोकसभेने पारित केले तर दुसऱ्याच दिवशी २३ डिसेंबर १९९२ ला राज्यसभेने मंजुर केले २० एप्रिल रोजी राष्ट्रपतींनी त्यावर मंजुरीदर्शक स्वाक्षरी झाली. आणि २४ एप्रिल १९९३ पासुन संपूर्ण भारतात त्याची अंमलबजावणी सुरू झाली या घ. दु. चे विधेयक २२ डिसेंबर १९९२ला राज्यसभेने मंजुर केले, २० एप्रिल रोजी राष्ट्रपतींची त्यावर मंजुरी दर्शक स्वाक्षरी झाली. आणि २४ एप्रिल १९९३ पासुन संपूर्ण भारतात त्याची अंमलबजावणी सुरू झाली. या घटना दुरूस्तीचे स्वरूप आणि फलनिष्पत्ती खालीलप्रमाणे

१. **स्थानिक शासन संस्था आणि संकल्पनांच्या व्याख्या निश्चित झाल्या**
   घटनेच्यया कलम नं. २४३ नुसार जिल्हा, मधलीपातळी (तालुका) पंचायत, पंचायत क्षेत्र, लोकसंख्या आणि ग्राम यांच्या निश्चित अशा व्याख्या अत्यंत सोप्या भाषेत करण्यात आल्या. आणि त्यांचा अर्थ स्पष्ट करण्यात आला. त्यामुळे संदिग्धता आणि द्विरूक्ती संपुष्टात आली.
२. **ग्रामसभेची स्थापना व त्यास वैधानिक दर्जा प्राप्त झाला –**
   कलम नं. २४३ क नुसार ग्रामपंचायतीत ग्रामसभा अनिवार्य करण्यात आली. तीची रचना व अधिकार स्पष्ट करणेत येवुन ग्रामसभेस बळ व वैधानिक दर्जा प्राप्त झाला. ग्रमसभेचे निर्णय अंतिम ठरविल्यामुळे खेडयाच्या कारभारात ग्रामीण जनता प्रत्यक्ष सहभागी होवू लागली परिणामी लोकशाही निर्णयप्रक्रिया अधिक पारदर्शक व सर्वसमावेशक बनली.
३. **पंचायतींची रचना निश्चित करण्यात आली –** कलम नं. २४३ ग नुसार ग्रामीण भागात कार्यरत असणाऱ्या त्रिस्तरीय पंचायत राज व्यवस्थेची रचना निश्चित करण्यात आली. यामुळे या संस्थांना निश्चित असा आकार प्राप्त झाला. त्यातील हस्तक्षेप कमी झाला.



Scanned by CamScanner

ISSN 2277-8063

४. **आरक्षण व्यवस्था मजबुत झाली. –**

कलम नं. २४३ घ नुसार पंचायत राज व्यवस्थेच्या तिन्ही पातळयावरील सभागृहांमध्ये अनुसूचित जाती व अनुसूचित जमाती, व एकुण सदस्य संख्येच्या १/३ एवढया स्त्रीयांकरीता राखीव जागांचे प्राधान करण्यात आले त्यामुळे अल्पसंख्याक जाती – जमाती व महिलांचा राजकिय प्रवेश सुकर व खात्रीचा झाला.

५. **सदस्यत्वाबाबत अपात्रता निश्चित करण्यात आल्या –**

कलम. नं. २४३ च अनुसार या तिन्ही स्तरावरील स्थानिक शासन संस्थामध्ये निवडून येण्यासाठी आवश्यक असलेल्या पात्रता व अपात्रता निश्चित झाल्यामुळे योग्य व लायक व्यक्ती राजकिय क्षेत्रात प्रवेशीत होवु लागली तर अयोग्य आणि अपात्र व्यक्ती आपोआपच राजकिय क्षेत्रापासुन दूर झाल्या.

६. **पंचायतींच्या लेख्यांचे लेखापरिक्षण –**

कलम नं २४३ त्र अनुसार सर्व पंचायतींना त्यांच्या वर्षभराच्या जमा खर्चाने लेखापरिक्षण करणे अनिवार्य झाले. परिणामी पंचायतीचे कारभारी जबाबदारीने वागू लागले तसेच भ्रष्टाचार व मनमानी कारभाराला आळा बसून पंचायतीवर सरकारचे नियंत्रण आले.

७. **पंचायतींचा कालावधी –**

कलम नं. २४३ ड नुसार सर्व पंचायतीचा कार्यकाल निश्चित करण्यात आला. पाच वर्षापुर्वी सभागृह विसर्जित झाल्यास तेथे ६ महिन्यांच्या आत निवडणूका घेणे निवडणूक आयोगावर बंधनकारक ठरले त्यामुळे पंचायती या अधिक जबाबदार व वैधानिक स्वरूपाच्या बनल्या राज्यसरकारांच्या अनियमितपणा व लहरीपणाला आळा बसला.

या सर्व गोष्टींचा अभ्यास केल्यास एक गोष्ट जाणवते ती म्हणजे जो ग्रामीण भाग भारताच्या अर्थव्यवस्थेचा आणि समाजस्यवस्थेचा कणा असुन जो दुर्लक्षित राहील होता. तो ग्राम्य समाज भारताच्या जडणघडणीत महत्त्वपुर्ण भूमिका बजावत असल्याचे दृश्य रूपात सिध्द झाले व त्याची आवश्यकता अधोरेखीत झाली.

समारोप – ७३ वी घटना दुरूस्ती ही ग्रामीण भारतास प्राप्त झालेली नवसंजीवनी होय. यापुर्वी दुर्लक्षित आणि संदिग्ध आधि गणतीत नसलेल्या ग्रामीण भागाला या घटना दुरूस्तीमुळे अचानक झळाळी प्राप्त झाली. व एकूणच भारताच्या सर्वांगीण विकासात ग्रामीण भारताचा सिंहाचा वाटा असल्याचे सिध्द झाले. परिणामी भारतीय शासनसंस्था सुध्दा ग्रामीण विकासावर अलीकडील काळात भर देताना दिसतात. परिणामी आज भारतातील खेडी स्वयंपूर्ण व स्वावलंबी होताना दिसत आहेत. विकासाची प्रक्रिंया आणि आधुनिकतेचे वारे ग्रामीण भागात वाहताना दिसतात.

संदर्भग्रंथ :

१.अत्रे त्रिं. ना. गाव—गाडा १९१५ संपादकीय आवृत्ती २०११ नाग—नालंदा प्रकाशन, इस्लामपूर पृष्ठ क्रमांक ३१

२.ऑस्टिन ग्रॅनव्हिल **मराठी अनुवाद** भारती केळकर भारतीय राज्यघटना राष्ट्राची कोनशीला पृष्ठ क्रमांक ३७ डायमंड पब्लिकेशन्स, पुणे.२०१३ ISBN:978-81-8483-512-0

३.चौसाळकर अशोक नवरात्र, लोक वाङ्‌मय गृह मुंबई २०००पृष्ठ क्रमांक १७१ ISBN:81-86995-77-3

४.चव्हाण रविंद्र – महाराष्ट्रातील पंचायत राज यशवंतराव चव्हाण विकास प्रशासन प्रबोधिनी(यशदा पूणे— २००१ पृष्ठ क्रमांक १५.४



Scanned by CamScanner

ISSN 2277-8063

# सातारा तालुक्यातील ग्रामपंचायत निवडणुकांवर महात्मा गांधी तंटामुक्त गाव मोहिमेचा प्रभाव : एक चिकित्सक अभ्यास

प्रा.डॉ. वसंत भूपाल शिंदे , आर्टस् अ‍ॅण्ड कॉमर्स कॉलेज नागठाणे, जि. सातारा

---

**प्रस्तावना :**जगातील सर्वात मोठी लोकशाही असलेल्या भारत या राष्ट्रातील महाराष्ट्र हे सजग, क्रियाशील व अनेक समाजाभिमुख योजना अंमलबजावणीत आद्यप्रवर्तक असे राज्य आहे. राज्यामध्ये अनेक धर्म, पंथ, जाती, उपजाती, त्याचबरोबर स्थित, विस्थापित व स्थलांतरित अशा अनेक घटकांचे लोक राहत असून, ते अनेक प्रकारचे व्यवसाय, व्यापार व उदिम आचरितात. या लोकांच्या विविध परंपरा, चालीरीती, सण, उत्सव, वेशभूषा, विचार व आचार इत्यादींमधून राज्यात एक बहुविध समाज प्रतिबिंबीत होतो. राज्यात भौगोलिक विविधितेबरोबरच सामाजिक विविधता असून, आर्थिक क्षेत्रातही कमी-अधिक उत्पन्नाचे सामाजिक घटक आहेत. सामाजिक, आर्थिक मागासलेपणा, निरक्षरता, अज्ञान, आर्थिक व सामाजिक विषमता, बरोजगारी यामुळे समाजात स्थिर शांतता निर्माण होण्यास अडसर येतो आणि त्यातून भांडण तंट्याचे प्रमाणही मोठे असल्याचे दृष्टोत्पत्तीस येते.

राज्यात विविध स्तरांवरील न्यायालयांमध्ये दिवाणी व फौजदारी स्वरूपाचे दावे मोठ्या प्रमाणावर प्रलंबित आहेत. न्यायव्यवस्थेवरील खटल्यांचा भार दिवसेंदिवस वाढत आहे. अशा परिस्थितीत लोकांना लवकरात लवकर व कमी खर्चात न्याय मिळवून देण्यासाठी पर्यायी व्यवस्थेची आवश्यकतेच्या अनुषंगाने मा. सर्वोच्च न्यायालय व केंद्र शासनाकडून यापूर्वी काही पर्यायी न्यायव्यवस्था स्थापन करण्यात आल्या आहेत. तंटे निकाली काढण्यासाठी पर्यायी व्यवस्था म्हणून सन १९८० मध्ये लोकन्यायालयाची स्थापना करण्यात आली. तालुका व गावपातळीवर लोकन्यायालय भरवून जलद गतीने खटले निकाली काढण्याचे काम त्यामार्फत केले जाते. अ‍ॅड. सालेम विरुद्ध केंद्र शासन या याचिकेमध्ये मा. सर्वोच्च न्यायालयाने कोर्टामध्ये प्रलंबित खटले कमी करण्यासाठी सिव्हिल प्रोसिजर कोड कलम ८९ मध्ये योग्य ते बदल करून Alternative Dispute Resolution (ADR) System सारखी प्रभावी यंत्रणा राबविण्याबाबत निर्णय घ्यावा, असे केंद्र शासनाने निर्देश दिले होते. त्यानुसार पर्यायी तंटा निवारण पद्धती (ADR) ही व्यवस्था अस्तित्वात आली असून, तंटे सोडविण्याचे हे नवीन माध्यम अलीकडच्या काळात प्रभावी होत आहे. सदर प्रणालीमध्ये चांगल्या वातावरणात तडजोड होऊन परस्परांमध्ये तेढ निर्माण न होता तंटे मिटविले जातात. गावपातळीवर छोट्या छोट्या कारणांवरून तंट्यांची सुरुवात होते. त्यामध्ये सुरुवातीला कमी लोकांचा सहभाग असतो. छोट्या तंट्याचे पुढे मोठ्या तंट्यात रूपांतर होते व अशा मोठ्या तंट्यात सहभाग घेण्याच्या लोकांच्या संख्येत वाढ होते. कधी कधी दिवाणी तंट्यातून फौजदारी तंट्याची निर्मिती होते. छोट्या कारणांवरून निर्माण झालेला तंटा मोठा होऊन फौजदारी तंटा बनतो व त्यातून कुटुंबाची, गावांची, समाजाची शांतता धोक्यात येते. पर्यायाने असे तंटे मिटविण्यासाठी प्रशासकीय यंत्रणेवर व न्यायिक व्यवस्थेवर ताण निर्माण होतो. तंटे मिटविण्यासाठी लोकन्यायालये, पर्यायी तंटे मिटविण्याची व्यवस्था (ADR) यांसारख्या पर्यायी व्यवस्था उपलब्ध असल्या तरी हे तंटे निर्माणच होऊ नयेत व निर्माण झालेले तंटे गावपातळीवरच मिटविले जावेत, याकरिता लोकसहभागातून व्यापक मोहीम राबविल्यास ती अधिक प्रभावी व फलदायी ठरेल. गावपातळीवर सौहार्दपूर्ण व सलोख्याचे वातावरण निर्माण करून त्यांद्वारे आपसातील तंटे सोडविण्यासाठी लोकसहभागातून राबविला जाईल, अशी मोहीम आखण्यासाठी राज्य शासनाने मा. उपमुख्यमंत्री यांचे तत्कालीन सचिव यांच्या अध्यक्षतेखाली अभ्यासगट नेमला होता. या अभ्यासगटाच्या अहवालात मोहीम आखणी, अंमलबजावणी व पुरस्कार योजनेचा आराखडा तयार करण्यात आला आहे.महाराष्ट्रात भक्ती सांप्रदायाची सुरुवात तेराव्या शतकात झाली. या संत परंपरेमधून संत नामदेव, संत ज्ञानदेव, संत एकनाथ, संत तुकाराम, संत चोखामेळा, संत गाडगेबाबा, संत तुकडोजी महाराज अशा अनेक संतांनी महाराष्ट्राच्या जनतेला वैचारिक व मानसिक दिशा दिली. संतांच्या शिकवणीतील सलोखा व बंधुभावाचा प्रवाह गेल्या ७०० वर्षांपासून आजही अव्याहतपणे प्रभावीत होत आहे. महाराष्ट्राला लाभलेली ही वैचारिक पार्श्वभूमी तंटामुक्तीसारखी लोक चळवळ निर्माण होण्यास पोषक अशीच आहे. म्हणून भक्ती सांप्रदायाने- महाराष्ट्रात निर्माण केलेली जनजागृतीच्या आधारे पूर्वापार खेड्यांमध्ये मान्यता पावलेल्या पंच पद्धतीसारखी पद्धती लोकसहभागातून निर्माण व्हावी आणि गावात तंटे निर्माण होऊ नयेत व झालेले तंटे मिटविण्यासाठी एक व्यापक मोहीम अभ्यासगटाच्या अहवालाच्या आधारे उभी केली जावी आणि या मोहिमेंतर्गत पात्र ग्रामपंचातींना पुरस्काराने सन्मानात करण्यात यावे, या अनुषंगाने १९ जुलै २००७ च्या शासन निर्णयान्वये १५ ऑगस्ट २००७ पासून राज्यात महात्मा गांधी तंटामुक्त गाव मोहीम सुरू करण्यात आली आहे. सन २००७-०८ हे वर्ष मोहिमेचे अंमलबजावणीचे प्रथम वर्ष होते. १९ जुलै २००७ च्या मूळ शासन निर्णयात विविध विषयांवर तरतुदी करण्यात आल्या आहेत. मोहिमेस प्रथम अंमलबजावणी वर्षातच राज्यात चांगला प्रतिसाद मिळावा असून, राज्यातील अनेक जिल्ह्यांमध्ये मोठ्या प्रमाणात लोकसहभाग लाभला आहे.

**अभ्यासक्षेत्र :** सन १८४८ मध्ये सातारा जिल्ह्याचे (पूर्वी या जिल्ह्यास सातारा प्रांत म्हणून संबोधले जाई) पुढीलप्रमाणे ११ शासकीय विभाग होते. विजापूर (सध्या कर्नाटक), जावली, कराड, खानापूर, खटाव, कोरेगाव, पंढरपूर, सातारा, तासगाव, वाळवा, वाई. सन १८५३ मध्ये तासगाव तालुका बेळगाव जिल्ह्यातून काढून सातारा जिल्ह्यास जोडण्यात आल. १८८४ मध्ये मालक्कम पेठ नावाची पेठे



Scanned by CamScanner

ISSN 2277-8063

निर्माण करण्यात आली. तिलाच पुढे महाबळेश्वर हे नाव पडले. दक्षिण सातारा जिल्ह्याचे मुख्यालय सांगलीला होते. त्यात खानापूर, तासगाव, वाळवा हे तालुके आणि शिराळा पेटा यांचा समावेश होता. उर्वरित उत्तर भागास उत्तर सातारा असे संबोधले जात होते. सन १९५६ मध्ये राज्याची पुनर्रचना झाल्यावर वरील दोन्ही जिल्ह्यांचा तत्कालीन मुंबई राज्यात समावेश करण्यात आला. सन १९६० मध्ये उत्तर सातारा जिल्ह्याचे नाव सातारा आणि दक्षिण सातारा जिल्ह्याचे नाव सांगली असे ठेवण्यात आले. सध्याच्या सातारा जिल्ह्यात सातारा, वाई, खंडाळा, कोरेगाव, फलटण, माण, खटाव, कराड, पाटण, जावळी आणि महाबळेश्वर असे ११ तालुके आहेत. सातारा जिल्ह्याचे एकूण भौगोलिक क्षेत्र १०४८० चौ.कि.मी. असून, ते महाराष्ट्र राज्याच्या ३.४% आहे. आकारमानाच्या दृष्टीने राज्यातील एकूण ३५ जिल्ह्यांमध्ये या जिल्ह्याचा १२ वा क्रमांक लागतो. सातारा, वाई, खंडाळा, कोरेगाव, फलटण, माण, खटाव, कराड, पाटण, जावळी आणि महाबळेश्वर असे जिल्ह्याचे एकूण ११ तालुके आहेत. तहसील व पंचायत समित्या यांचे कार्यक्षेत्र सर्वत्र समान असल्यामुळे तेवढ्याच पंचायत समित्या कार्यरत आहेत. जिल्ह्याचे सातारा, वाई, कराड व फलटण असे ४ महसूल विभाग आहेत. १) सातारा विभागामध्ये सातारा, कोरेगाव, जावळी. २) कराड विभागामध्ये कराड, पाटण. ३) वाई विभागात महाबळेश्वर, वाई, खंडाळा आणि ४) फलटण विभागात फलटण, माण, खटाव तालुक्यांचा समावेश होतो. जिल्ह्याच्या एकूण क्षेत्राची टक्केवारीप्रमाणे तहसीलनिहाय विभागणी पुढीलप्रमाणे आहे. सातारा ८.८, वाई ५.७, खंडाळा ५.०, कोरेगाव ९.०, फलटण ११.४, माण १३.८, खटाव १३.६, कराड १०.२, पाटण १२.७, जावळी ८.६, महाबळेश्वर २.२, सह्याद्रीच्या पर्वतश्रेणी, डोंगरदऱ्या, चढ–उताराची जमीन आणि सपाटीचे क्षेत्र असे सर्वसाधारण जिल्ह्याचे स्वरूप आहे. मुख्य डोंगराच्या दोन श्रेणी असून, त्यापैकी सह्याद्री पर्वताची सुमारे ९३ कि.मी. लांबीची उत्तरेकडून दक्षिणेकडे जाणारी रांग म्हणजे जिल्ह्याची पश्चिम सीमा होय. तिला बामणोलीची रांग असे म्हणतात. महादेवाचा डोंगर व त्यांचे फाटे ही दुसरी डोंगरी रांग असून, ती महाबळेश्वरच्या उत्तरेस सुमारे १६ कि.मी.पासून सुरू झालेली आहे. महाबळेश्वर–कोयना खोरे हा परिसर सोडला, तर जिल्ह्यातील इतर डोंगर सामान्यतः लहान, वृक्षरहित व खडकाळ आहेत. महाबळेश्वर हे जिल्ह्यातील सर्वांत उंच ठिकाण असून, समुद्रसपाटीपासून सरासरी उंची १४३६ मीटर आहे. कृष्णी ही मुख्य नदी आहे. कोयना, वेण्णा, कुडाळी, उरमोडी, वसना, येरळा आणि तारळी ह्या तिच्या उपनद्या आहेत. जिल्ह्याचे हवमान सखल भागात थंड आणि उंच पठारावरील भागात थंड आहे. हिवाळ्यातील हवामान सखल भागात थंड आणि उंच पठारावरील भागात थंड आहे. हिवाळ्यातील हवामान सखल भागात थंड आणि उंच पठारावरील भागात अतिथंड आहे. विशिष्ट भौगोलिक परिस्थितीनुसार जिल्ह्यातील पर्जन्यमानात खूपच तफावत आहे. पूर्व भागातील माण या दुष्काळी तालुक्यातील सरासरी वार्षिक पर्जन्यमान ४७३ मि.मी. इतके कमी आहे, तर महाबळेश्वर या पश्चिम भागातील उंचीवरील ठिकाणी ६२०९ मि.मी. इतके जास्त आहे.

सातारा जिल्ह्यात महात्मा गांधी तंटामुक्त गाव मोहिमेचा अंमलबजावणीच्या १० फेब्रुवारी २०१२चा आढावा घेतला असता पुढील माहिती दृष्टिक्षेपात येते. सातारा जिल्ह्यात ११ तालुके व २७ पोलिस ठाणे आहेत. जिल्ह्यातील एकूण ग्रामपंचायतींची संख्या १५०३ आहे. महात्मा गांधी तंटामुक्त गाव समित्यांची संख्या १५०२ आहे व तंटामुक्त गोव महिमेत सहभागी झालेल्या गावांची संख्या १४३७ आहे. ३१ जानेवारी २०१२ पर्यंत मोहिमेंतर्गत समितीकडे दाखल झालेल्या तंट्यांची संख्या ४९,४८६ इतकी आहे. समितीने सामोपचाराने मिटविलेल्या तंट्यांची संख्या ३१६६ इतकी आहे. सातारा जिल्ह्यातील ११ तालुक्यांपैकी सातारा तालुका हा सामाजिक, राजकीय व वैचारिक वारसा लाभलेला अग्रेसर तालुका आहे. सातारा तालुक्यास छत्रपती शिवाजी महाराजांचा थेट वारसा लाभलेला आहे. त्यामुळे सातारा तालुक्यास ऐतिहासिक महत्त्व प्राप्त झाले आहे. सातारा तालुक्यात स्वतंत्र ग्रामपंचायती व ग्रुप ग्रामपंचायती अशा दोन प्रकारच्या ग्रामपंचायती अस्तित्वात आहेत. सातार तालुक्यात २०० पेक्षा कमी लोकसंख्या असलेल्या गावांची संख्या ९ आहे. २०० ते ४९९ इतकी लोकसंख्या असलेल्या गावांची संख्या ४७ इतकी आहे. ५०० ते ९९९ इतकी लोकसंख्या असलेल्या गावांची संख्या ४६ इतकी आहे. सातारा तालुक्यात एकूण गावांची संख्या ९४६ इतकी आहे. सातारा तालुका अंतर्गत बोरगाव पोलिस स्टेशन परिक्षेत्राचा समावेश होतो.बोरगाव पोलिस स्टेशन परिक्षेत्रामध्ये एकूण गावांची संख्या ५९ इतकी आहे. एकूण ग्रामपंचायतींची संख्या ५९ इतकी आहे. महात्मा गांधी तंटामुक्त गाव मोहीम समित्यांची संख्या ५९ आहे. एकूण स्थापन झालेल्या ग्रामसुरक्षा दलांची संख्या ५९ असून या अभियानात सहभागी झालेल्या सदस्यांची संख्या १६०० इतकी आहे. २९ फेब्रुवारी २०११ पर्यंत महात्मा गांधी तंटामुक्त गाव मोहिमेंतर्गत सामोपचाराने मिटविलेल्या तंट्यांच्या विवरणामध्ये एकूण दाखल तंटे ३५१० व सामोपचाराने मिटविलेल्या तंट्यांची संख्या ६४६ इतकी आहे. परिक्षेत्रातील गावांच्या ग्रामपंचायत निवडणुका २ टप्प्यांमध्ये पार पडल्या आहेत. ग्रामपंचायत निवडणुका पार पडलेल्या गावांपैकी १८ गावांची निवडणूक ही बिनविरोध झाली आहे, तर पाडळी हे गाव विशेष महात्मा गांधी तंटामुक्त गाव म्हणून घोति करण्यात आले आहे. म्हणून सदर संशोधनासाठी या परिक्षेत्राची निवड करण्यात आली आहे.

**समस्या विधान :** महात्मा गांधी तंटामुक्त गाव मोहीम ही योजना १५ ऑगस्ट २००७ पासून महाराष्ट्रात कार्यान्वित करण्यात आली. या मोहिमेला लोकांचा प्रचंड पाठिंबा मिळाला. या योजनेचा ग्रामपंचायत निवडणुकांवर प्रभाव पडलेला आहे. या अनुषंगाने महात्मा



Scanned by CamScanner

गांधी तंटामुक्त गाव मोहिमेला सातारा तालुक्यातील बोरगाव परिक्षेत्रामधील ग्रामपंचायत निवडणुकांवरील प्रभावांचा चिकित्सक अभ्यास सदर समस्या अभ्यासासाठी निवडलेली आहे.

**संशोधनाची उद्दिष्टे :** सदर अभ्यासाची उद्दिष्ट्ये मूल्यमापनात्मक असून ती पुढीलप्रमाणे आहेत.

१. महात्मा गांधी तंटामुक्त गाव मोहिमेच्या अनुषंगाने अभ्यास करणे.२. महात्मा गांधी तंटामुक्त गाव मोहिमेचा शासन निर्णयाचा अभ्यास करणे.३. महात्मा गांधी तंटामुक्त गाव मोहिमेचा २००७ पासूनचा सातारा तालुक्याचा आढावा घेणे. ४. महात्मा गांधी तंटामुक्त गाव मोहिमेचा तालुका सातारामधील बोरगाव परिक्षेत्रातील ग्रामपंचायत निवडणुकांवरील प्रभाव अभ्यासणे.५. महात्मा गांधी तंटामुक्त गाव मोहिमेच्या सकारात्मक परिणामाचे अध्ययन करणे. ६. महात्मा गांधी तंटामुक्त गाव मोहिमेतील गुणदोष शोधणे व या योजनेच्या यशापयशाचा अभ्यास करणे. ७. महात्मा गांधी तंटामुक्त गाव मोहिमेच्या योजनेबाबत सकारात्मक निष्कर्ष व सूचना सुचविणे.

**गृहितके :** महाराष्ट्र शासनाने राबविलेल्या महात्मा गांधी तंटामुक्त गाव मोहीम योजनेमुळे गावातील तंटे सलोख्याने मिटले आहेत; परंतु या मोहिमेमुळे गावातील तंट्यांचे पूर्णपणे निर्मूलन झालेले नाही.

**अभ्यास पद्धती व माहिती संकलन :** प्रस्तुत संशोधन प्रकल्प हा महाराष्ट्र राज्याने राबविलेल्या महात्मा गांधी तंटामुक्त गाव मोहिमेच्या अभ्याससंबंधित आहे. त्यामुळे राज्य शासनाने घेतलेले विविध निर्णय मोहिमेची अंमलबजावणी, मोहिमेचा ग्रामपंचायत निवडणुकांवर झालेला पारिणाम, मोहिमेची यशस्विता, गुणदोष व उपाययोजनांचा अभ्यास संशोधक करणार आहे.विशेष अभ्यासासाठी सातार तालुक्याची निवड केली असून, सातारा तालुक्यात बोरगाव पोलिस ठाणे परिक्षेत्रातील ११ गावंचा प्रश्नावलीद्वारे अभ्यास केला जाणार आहे. यासाठी सरपंच, तंटामुक्ती मोहिमेचे अध्यक्ष ग्रामसेवक व ग्रामस्थ यांच्याकडून प्रश्नावलीद्वारे महात्मा गांधी तंटामुक्त गाव मोहिमेबाबत प्राथमिक माहितीचे संकलन केले जाणार आहे. संकलित केलेल्या सामग्रीचे पृथःकरण करून माहितीचे सांख्यिकी तंत्राद्वारे सादरीकरण माहितीच्या सादरीकरणासाठी सांख्यिकी तंत्राचा वापर केला जाईल.

सदर अभ्यासासाठी शासनाचे विविध निर्णय, आदेश, शासकीय विविध सांख्यिकीय अहवाल, विधानसभा ग्रंथालय मुंबई, जिल्हा परिषद सातारा, पंचायत समिती सातारा, सातारा तालुक्यातील ग्रामपंचायती कार्यालय, संदर्भग्रंथ, शोधप्रबंध, प्रकाशित शोधप्रबंध, मासिके तसेच वर्तमानपत्रातील लेख व महात्मा गांधी तंटामुक्त गाव मोहिमेबाबतच्या इंटरनेटवरील वेबसाईटस् यांचा द्वितीयक स्वरूपाच्या माहिती संकलनासाठी वापर केला जाणार आहे. प्राथमिक स्वरूपाची माहिती प्रश्नावलीद्वारे संकलित करण्यात येईल. त्याचबरोबर प्राथमिक माहितीसाठी निवडलेल्या सातारा तालुक्यातील बोरगाव पोलिस स्टेशन परिक्षेत्रातील गावांचे प्रत्यक्ष भौगोलिक निरीक्षण क्षेत्रभेटीद्वारे करून माहिती मिळविली जाणार आहे.

**अभ्यास महत्त्व :** सातारा जिल्ह्यामध्ये ११ तालुके आहेत. या ११ तालुक्यांच्या गावांमध्ये शांततेकडून समृद्धीकडे जाणाऱ्या खेड्यांची संख्या मोठी आहे. गावागावात तंटे मिटविले जाऊन गावे शांत होत आहेत. आतापर्यंत गावागावांत चालणारे गटातटाचे राजकारण संपुष्टात येऊन गावे एकसंघ होऊन प्रगतीच्या दिशेने वाटचाल करीत आहेत. ग्रामपंचायतीच्या निवडणुका विधायक व घटनात्मक मार्गाचा अवलंबन करून पार पाडत आहेत. त्याचबरोबर काही तालुक्यांतील ग्रामपंचायतींच्या निवडणुका ह्या बिनविरोध होत आहेत. सातारा जिल्ह्यातील काही तालुक्यांमध्ये ग्रामपंचायत निवडणूक बिनविरोध होण्याचे प्रमाण मोठे आहे. असे चित्र आपणास सातारा जिल्ह्यातील सातारा तालुक्यामध्ये पहावयास मिळते. म्हणूनच संशोधकांस सातारा तालुक्याच्या महात्मा गांधी तंटामुक्त गाव मोहिमेचा सखोल अभ्यास करण्याची गरज भासली आहे.सातारा तालुक्याबरोबर जिल्हा, राज्य, देशपातळीवर महात्मा गांधी तंटामुक्त गाव मोहीम या योजनेची अंमलबजावणी करून समाजातील सामाजिक, राजकीय व धार्मिक समस्यांचे निराकरण करता येईल. जागतिक पातळीवरही शांतता प्रस्थापित करण्यासाठी या योजनेचा चांगल्या पद्धतीने उपयोग करून घेता येईल. कागदपत्रे, पुरावे व नियमांच्या आधारे तंटे मिटविले जात नाहीत, तर मनोमीलनातून तंटे मिटविले जातात. या तत्त्वाचा उपयोग जागतिक संघर्ष मिटविण्यासाठी करून घेता येईल.

**निष्कर्ष :** सातारा तालुक्यातील महात्मा गांधी तंटामुक्त गाव मोहिमेचा ग्रामपंचायतीच्या निवडणुकांवर झालेल्या परिणामाचा अभ्यास केला असता तालुक्यामध्ये सक्रीय असलेल्या अभियानाबाबत, पदाधिकारी व ग्रामस्थांच्या समस्येबाबत, ग्रामपंचायतीच्या निवडणुकांबाबत व करावयाच्या उपायांबाबत माहिती मिळते. या माहितीच्या आधारे संशोधकाने काही प्रमुख निष्कर्ष काढले आहेत, ते पुढीलप्रमाणे – १) सातारा तालुक्यातील ग्रामस्थांच्या शैक्षणिक स्थितीचा अभ्यास करता प्राथमिक शिक्षणाचा प्रसार ४५% झाल्याचे



Scanned by CamScanner

ISSN 2277-8063

दिसून येते. पदवीधरपर्यंतचे शिक्षण घेणाऱ्या नागरिकांचे प्रमाण ४३% इतके आहे, पण पदव्युत्तर शिक्षणाचे प्रमाण मात्र वरील विभागाच्या मानाने अत्यल्प आहे, ते केवळ १०% इतके आहे. अजून निरक्षरता मात्र पूर्णपणे हद्दपाल झालेली नाही. २) सातारा तालुक्यातील व्यावसायिक स्थितीचा अभ्यास करता ५२% लोकांचा मुख्य व्यवसाय शेती हा आहे. नोकरी करणाऱ्या नागरिकांचे प्रमाण २३% इतके आहे, पण व्यवसाय व इतर क्षेत्रांत असणाऱ्या नागरिकांचे प्रमाण अत्यल्प आहे. १३% लोक व्यवसायाकडे कार्यरत आहेत. ३) या अभियानांतर्गत तक्रार नोंदविलेल्या ग्रामस्थांच्या टक्केवारीचा विचार केला असता, ८० टक्के ग्रामस्थांनी विविध क्षेत्रांतील तक्रारी नोंदविल्या आहेत, असे दिसून येते. ८०% ग्रामस्थांनी सामाजिक, कौटुंबिक, राजकीय, धार्मिक व इतर बाबतीतल्या तक्रारी नोंदविल्या आहेत, पण २०% ग्रामस्थ अजून या अभियानापासून दूर आहेत असे म्हणावे लागेल.४) महात्मा गांधी तंटामुक्त गाव मोहिमेमध्ये सक्रीय सहभागी होण्यासाठी तक्रारींची नोंद करणे आवश्यक असते. ग्रामस्थांनी या अभियानात आपली तक्रार नोंदविताना येणाऱ्या अडचणींची नोंद केली आहे. यामध्ये मोहिमेची प्रक्रिया माहीत नसणे, वेळेअभावी सभांना हजर न राहता येणे, राजकीय वर्चस्व, साक्षरतेचा प्रश्न, विशेष पुरस्कारासाठी विशिष्ट तक्रारी दाखल करून घेणे, सदस्यांबाबत अविश्वास, पक्षीय गट-तट, राजकारण इत्यादी अडचणींना ग्रामस्थांना तोंड द्यावे लागते. ५) ग्रामस्थांनी अभियानामध्ये तक्रारी नोंदविल्यानंतर त्या तक्रारींचा न्यायनिवाडा करण्यात येतो. ६३% ग्रामस्थांनी तक्रारींचा न्यायनिवाडा केला गेल्याची नोंद केली. यावरून या अभियानाची आवश्यकता स्पष्ट होते, पण ३७% ग्रामस्थांना न्याय मिळाला नाही असे स्पष्ट केले. याचाच अर्थ अजून मोठ्या संख्येने ग्रामस्थ या अभियानापासून दूर आहेत. त्यांना प्रवाहात आणणे गरजेचे आहे.६) गावातील शांतता व सुव्यवस्था निर्माण करण्यास हे अभियान उपयोगी पडते. ६९% ग्रामस्थांनी या अभियानातून गावात सुव्यवस्था व शांतता निर्माण झाली असे सांगितले. यावरून या अभियानाचे महत्त्व सिद्ध होते. ७) महात्मा गांधी तंटामुक्त गाव अभियानांतर्गत कार्यरत असणाऱ्या अध्यक्ष, सदस्य, पदाधिकारी यांचा कार्याबाबतचा प्रतिसाद चांगला मिळतो, असे ग्रामस्थांनी नमूद केले. ५७% ग्रामस्थांनी पदाधिकाऱ्यांचा प्रतिसाद चांगला असतो असे नमूद केले, पण २८% ग्रामस्थ याबाबत असमाधानी आहेत. यावरून पदाधिकाऱ्यांच्या प्रतिसादात वाढ होणे गरजेचे आहे.८) ग्रामस्थांना या अभियानात तक्रारी नोंदविताना येणाऱ्या अडचणी यांबाबत आपली मते नोंदविली. तक्रारींच्या न्यायनिवड्यासाठी वेळ लागणे, पूर्वग्रहदूषितपणा, सदस् गैरहजर असणे, सदस्यांच्या निवडीबाबत तक्रारी, राजकीय वर्चस्ववाद इत्यादी अडचणी सांगितल्या. या अडचणींचा सखोल अभ्यास करणे गरजेचे आहे. ९) सातारा तालुक्यातील महात्मा गांधी तंटामुक्त गाव मोहिमेमध्ये कार्यरत असणाऱ्या पदाधिकाऱ्यांच्या शिक्षणाबाबत विचार करता १००% पदाधिकारी सुशिक्षित आहेत असे स्पष्ट झाले. १०) सातारा तालुक्यातील या अभियानामध्ये पदाधिकारी पदाचा विचार करता, या अभियानाच्या पदावर सर्व पुरुषच असल्याचे स्पष्ट झाले. १००% पुरुष सातारा तालुका महात्मा गांधी तंटामुक्त गाव अभियानामध्ये पदाधिकारी म्हणून काम पाहतात. यामध्ये स्त्रियांचा समावेश नसल्याचे आढळले. ११) सातारा तालुका या अभियानामध्ये कार्यरत असणाऱ्या पदाधिकाऱ्यांच्या व्यवसायाचा विचार करता ५५% पदाधिकारी शेती या व्यवसायाशी संबंधित आहेत व २५% पदाधिकारी नोकरीमध्ये कार्यरत आहेत. याचाच अर्थ या अभियानामध्ये गावातील सर्वस्तरांतील ग्रामस्थांचा समावेश आहे. १२) महात्मा गांधी तंटामुक्त गाव मोहिमेच्या प्रक्रियेची नोंद व जागरूकता यांबाबत असे म्हणता येईल की, मासिक बैठकांना लोकांचा सहभाग कमी आहे. न्यायनिवाडा बैठकांत मात्र लोकांचा सहभाग मोठ्या प्रमाणात आहे. ७८% ग्रामस्थ यामध्ये सहभागी होतात, पण ७९% पदाधिकाऱ्यांनी या मोहिमेच्या प्रक्रियेची कागदोपत्री नोंद होत नसल्याचे स्पष्ट झाले. १३) महात्मा गांधी तंटामुक्त गाव मोहिमेंतर्गत कार्यरत असणाऱ्या पदाधिकाऱ्यांनी हे अभियान गावास किती उपयुक्त आहे, याचे स्पष्टीकरण दिले आहे. ६९% पदाधिकारी या अभियानाची आवश्यकता स्पष्ट करतात. गावातील लोकांचा पैसा, वेळ वाचणे, किरकोळ वाद गावातच मिटविणे, सामोपचाराचे वातावरण निर्माण करणे, धार्मिक शांतता, चुकीच्या प्रथा नाहिशा करणे, नवीन विचारांची मांडणी करणे, इत्यादी फायदे यामोहिमेमुळे गावास होतात. १४) २००९ ते २०१४ या पाच वर्षांच्या कालखंडात तालुक्यातील तक्रारींची मोठी संख्या या अभियानामार्फत मिटविण्यात आली आहेत. ६५% कौटुंबिक तक्रारी, ४८% सामाजिक तक्रारी व याचबरोबर धार्मिक, राजकीय व इतर तक्रारी मिटविण्याचे कार्य तंटामुक्त गाव अभियानाने केले आहे. याचाच अर्थ या अभियानाचा मुख्य हेतू साध्य होत आहे, असेच म्हणावे लागेल. १५) महात्मा गांधी तंटामुक्त गाव अभियानामध्ये पदाधिकारी म्हणून काम करीत असताना राजकीय प्रभावाला बळी पडावे लागते. ८७% राजकीय प्रभावाबाबतच्या अडचणी पदाधिकाऱ्यांना पडतात असे स्पष्ट होते. ७५% ह्या सामाजिक अडचणी व ७०% धार्मिक अडचणींना पदाधिकाऱ्यांना तोंड द्यावे लागते. याचा परिणाम सदस्यांच्या कार्यक्षमतेवर होतो. १६) सातारा तालुक्यात महात्मा गांधी तंटामुक्त गाव मोहीम सक्षम होण्यासाठी, परिणामकारक होण्यासाठी काही महत्त्वाचे उपाय पदाधिकाऱ्यांनी सुचविले



Scanned by CamScanner

आहेत. समितीला संरक्षण हवे, समिती व पोलिस यांच्यात समन्वय हवा, समितीला मान्यता व सरकारी अधिकारी यांची नेमणूक, सदस्य संख्येत वाढ, राजकीय हस्तक्षेप कमी करणे, लोकजागृती करणे इत्यादी महत्त्वाचे उपाय सुचविले आहेत. या उपायांबाबत सखोल अभ्यास करून अभियानाची पुर्नरचना करणे गरजेचे आहे.१७) सातारा तालुक्यातील महात्मा गांधी तंटामुक्त गाव मोहिमेच्या माध्यमातून ग्रामपंचायत निवडणुकीवर कोणता परिणाम झाला, याचा विचार करता अभ्यासातील एकूण ग्रामपंचायतींपैकी ३५% ग्रामपंचायतींच्या निवडणुका बिनविरोध झाल्याचे आढळले, पण ६५% ग्रामपंचायतींच्या निवडणुका अटीतटीने झाल्या. याचाच अर्थ या अभियानाबाबतची जागरूकता, साक्षरता वाढविणे गरजेचे आहे, पण ३५% ग्रामपंचायतींच्या निवडणुका ह्यापूर्वी अटीतटीच्या होत होत्या, त्या मत्र बिनविरोध झाल्या, हे या अभियानाचे यश आहे.

**सारांश** : सातारा तालुक्यातील महात्मा गांधी तंटामुक्त गाव मोहिमेचा अभ्यास केला असता वरील निष्कर्ष स्पष्ट झाले असले तरी महात्मा गांधी तंटामुक्त गाव अभियानाने आणखी काही महत्त्वाच्या बाबी या तालुक्यात पूर्ण करीत असल्याचे जाणवते. यामध्ये ज्येष्ठ नागरिकांना उतरत्या वयात दिलासा देणे, जातीय सलोख्याचे वातावरण निर्माण करणे, बिनपोलिसाची यात्रा व मासांहारावर बंदी, हम दो हमारे दो, लोकसंख्या नियंत्रण, फ्लेक्स बोर्ड व डॉल्बी बंदी, मुलगी वाचवा अभियानास मदत, अंधश्रद्धा निर्मूलन कार्यास मदत, आंतरजातीय विवाहांना प्रोत्साहन, इत्यादी महत्त्वाच्या सामाजिक बाबींना या मोहिमेची मदत झाली आहे, हे मान्य करावे लागेल

**उपाययोजना** : सातारा तालुक्यातील महात्मा गांधी तंटामुक्त गाव मोहिमेचा सखोल अभ्यास केला असता काही महत्त्वाच्या प्रश्नांची उकल झाली. या प्रश्नांच्या बाबतीत संबंधित व्यवस्थेने लक्ष घालून हे अभियान सक्षम करणे गरजेचे आहे. या अभियानाचा अभ्यास करत असताना, अभियानाच्या बाबतीत येणाऱ्या महत्त्वाच्या प्रश्नांच्या बाबतीत खालील उपाय सुचवावेसे वाटतात. १) सातारा तालुक्यातील पदव्युत्तर शिक्षणाचे प्रमाण हे अत्यल्प आहे. १०% नागरिक पदव्युत्तर शिक्षण घेतलेले आहेत. याचे प्रमाण वाढविण्यासाठी सर्वच पातळींवर प्रयत्न होणे गरजेचे आहे. त्याचबरोबर निरक्षरतेचे प्रमाणही २% इतके आहे. म्हणजेच निरक्षरतेचे प्रमाण अजून पूर्ण नाहिसे झाले नाही, याबाबतही उपाययोजना करणे गरजेचे आहे. २) महात्मा गांधी तंटामुक्त गाव अभियानाला चांगला प्रतिसाद आहे, पण २०% ग्रामस्थ या अभियानापासून दूर असल्याचे दिसून येते. या २०% ग्रामस्थांना या अभियानाचे महत्त्व पटवून देणे, या अभियानाबाबत साक्षरता निर्माण करण्यासाठी शासकीय, स्थानिकपातळींवर प्रयत्न करावयास हवेत. ३) या अभियानात सक्रीय सहभागी होण्यासाठी विविध स्वरूपाच्या अडचणी ग्रामस्थांनी नोंदविल्या आहेत. मोहिमेची प्रक्रिया माहीत नसणे, वेळेअभावी सभांना हजर न राहणे, राजकीय वर्चस्व, पुरस्कारासाठी विशिष्टच तक्रारींची सोडवणूक, सदस्यांबाबतचा अविश्वास, गटस्तराचे राजकारण, इत्यादी बाबतीत ग्रामस्थांना सक्रिय सहभागाबाबत अडचणी येत असल्या तरी याबाबतचे उपाय योजने गरजेचे आहे. मोहिमेच्या प्रक्रियेबाबत प्रसिद्धी द्यावी, राजकीय वर्चस्वातून मोहीम मुक्त असावी, अभियान हे फक्त पुरस्कारासाठी कार्यरत असू नये. सदस्य निवडताना सर्व गावाच्या विश्वास असलेल्या व्यक्तीचीच निवड करावी, अभियानामध्ये गट-तट, राजकारण याला थारा देऊ नये. या उपायांमुळे हे अभियान लोकाभिमुख होईल.४) या अभियानांतर्गत ३७% ग्रामस्थांना न्यायनिवाड्यापासून वंचित रहावे लागले आहे. वंचित ग्रामस्थांच्या तक्रारींचा फेरविचार करण्याची प्रक्रिया राबवावी. या ३७% ग्रामस्थांना पुन्हा अभियानाच्या प्रवाहामध्ये आणावे. ग्रामस्थांचा अभियानाबाबतचा विश्वास वाढविण्याचे अभियानाने, समितीने, शासनाने प्रयत्न करावेत ५) महात्मा गांधी तंटामुक्त गाव मोहिमेच्या प्रक्रियेमध्ये अध्यक्ष, सेक्रेटरी, सदस्य यांची निवड गावसभेमधून होत असली तरी २८% ग्रामस्थ या निवडीबाबत असमाधानी आहेत. याचाच अर्थ अध्यक्ष-सदस्य, पदाधिकारी यांच्या निवडीबाबत- गावात होणारे राजकारण हे थांबविणे गरजेचे आहे. ही सामाजिक चळवळ आहे, हे लक्षात घेऊन या निवडीबाबत निरपेक्षता, विश्वासार्हता, तटस्थता व राजकारणविरहितता असणे गरजेचे आहे.६) महात्मा गांधी तंटामुक्त गाव अभियानामध्ये तक्रारी नोंदविण्यात येतात, पण या तक्रारींचा न्यायनिवाडा होण्यासाठी खूपच वेळ लागतो, असे लक्षात येते. समितीने येणाऱ्या तक्रारींच्या वेळा व तारखा नोंदवून विशिष्ट कालखंडासाठी एक वेळापत्रक करावे व ग्रामस्थांचा वेळ वाचविण्याचा प्रयत्न करावा. तक्रारींचे स्वरूप लक्षात घेऊन या वेळापत्राकाचा विचार करावा. अतिदक्षता, सामाजिक शांतता असे प्रश्न सोडविणे गरजेचे आहे. याचाच अर्थ असा की सामाजिक गरज व तक्रारींची निकडता याचा विचार करून तक्रारी वेळेत सोडवाव्यात. ७) ग्रामस्थ व तंटामुक्त गाव मोहिमेमधील सदस्य यांच्यामध्ये असणारा पूर्वग्रहदूषिपणा नाहिसा होणे गरजेचे आहे. पूर्वग्रहदूषितपणामुळे अभियानाचे कार्य सफल होत नाही.८) अभियानातील समितीमध्ये सदस्यांच्या गैरहजेरीचे प्रमाण हा एक महत्त्वाचा प्रश्न आहे. समितीच्या सदस्याने हे सामाजिक कार्य म्हणून आपल्या व्यस्त कार्यातील थोडासा भाग या अभियानास देणे गरजेचे आहे. खूपच व्यस्तता, कार्यमग्नता असेल तर त्या सदस्यांनी वेळ देऊ शकणाऱ्या ग्रामस्थाला त्या



Scanned by CamScanner

ISSN 2277-8063

समितीमध्ये पाठवावे जेणेकरून समितीची कार्यक्षमता वाढेल. ९) महात्मा गांधी तंटामुक्त गाव मोहिमेंतर्गत कार्य करणाऱ्या पदाधिकाऱ्यांमध्ये पुरुषांची संख्या १००% इतकी आहे. हे मात्र व्यस्त प्रमाण विचार करण्यास भाग पाडते. स्त्रियांना या मोहिमेमध्ये सहभागी करून घेणे हे खूपच गरजेचे आहे. यासाठी शासकीय पातळीवरील प्रयत्नांबरोबरच, जनजागृतीचीही गरज आहे.१०) तंटामुक्त गाव अभियानाच्या बैठकांना ग्रामस्थांची उपस्थिती कमी असते, यासाठी ग्रामस्थांमध्ये अभियानाचे महत्त्व पटवून देणे गरजेचे आहे. शांततेतून प्रगती याबाबत ग्रामस्थांना समजावून सांगणे गरजेचे आहे. गावचे प्रश्न हे आपले प्रश्न आहेत याची जाणीव करून देणे गरजेचे आहे. ११) महात्मा गांधी तंटामुक्त गाव मोहिमेच्या दप्तराबाबत काही प्रश्न निर्माण होतात. अभियानामध्ये खूपच चांगले निर्णय होतात, पण कागदोपत्री या निर्णयांची नोंद होणे गरजेचे आहे. ७९% पदाधिकाऱ्यांचे असे मत आहे की, निर्णयाची नोंद दप्तरी होत नाही. निर्णयाची नोंद दप्तरी होण्यासाठी समितीने वेगवेगळ्या सोप्या मार्गांचा अवलंब करावयास हवा. १२) या अभियानाच्या पाच वर्षांच्या अभ्यासावरून असे लक्षात येते की, २००८ ते २०१४ या कालखंडात ६५% कौटुंबिक तक्रारींची नोंद या अभियानात झाली. या तालुक्यात कौटुंबिक तक्रारींच्या संख्येत होणारी वाढ ही चिंताजनक आहे. कौटुंबिक तक्रारींबाबत या अभियानाबरोबरच समाजशास्त्रज्ञ, मानसशास्त्रज्ञ, अर्थशास्त्रज्ञ इ. व्यक्तींनी या प्रश्नांचा अभ्यास करून या प्रश्नांबाबतचे ठोस निर्णय घेणे गरजेचे आहे.१३) सामाजिक शांतता व समृद्धी हा या अभियानाचा मूळ पाया आहे. ८७% पदाधिकाऱ्यांचे हे मत आहे की, या अभियानाच्या सर्वच प्रक्रियेमध्ये राजकीय हस्तक्षेप मोठा आहे. अभियानाचा हेतू साध्य होण्यासाठी हे अभियान पूर्णपणे राजकारणापासून मुक्त असावे.१४) न्यायनिवाडा प्रक्रियेमध्ये योग्य निर्णयक्षमता असणाऱ्या व्यक्ती ह्या तंट्यापासून दूर असतात. अशा व्यक्तींना, सदस्यांना संरक्षणाची गरज आहे. ते दिले असता अभियानाच्या कार्यावर चांगला परिणाम होईल. त्याचबरोबर पोलिस व समितीमध्ये समन्वय असावा, सदस्य संख्येत वाढ करावी, इत्यादी महत्त्वाचे उपाय योजून समितीची कार्यक्षमता वाढवावी. १५) गावांमध्ये तंटे निर्माण होण्याच्या अनेक कारणांपैकी एक महत्त्वाचे कारण म्हणजे ग्रामपंचायत निवडणूक. सातारा तालुक्यातील २००९ ते २०१४ या पाच वर्षांच्या विविध ग्रामपंचायत निवडणुका पार पडल्या. यामध्ये ३५% ग्रामपंचायती ह्या बिनविरोध झाल्या. ही आकडेवारी पुढील काळात वाढण्यासाठी अभियानाने प्रयत्न करावेत.१६) शालेय शिक्षणामध्ये महात्मा गांधी तंटामुक्त गाव मोहिमेच्या अभ्यासाचा समावेश असावा. यामुळे अभियानाचे महत्त्व नागरिकांना कळेल. या जागृतीमुळे अभियानाचे अनेक हेतू साध्य होतील.

वरील उपायांचा विचार करून महात्मा गांधी तंटामुक्त गाव मोहिमेला सक्षम करणे गरजेचे आहे. या मोहिमेने खूपच समाजोपयोगी धोरणांची अंमलबजावणी केली आहे. उदा. पशु–पक्षी जीवदान, ज्येष्ठ नागरिकांसाठी उपाययोजना, आंतरजातीय विवाह, मुलगी वाचवा अभियान, अंधश्रद्धा निर्मूलन, विना पोलिस यात्रा अभियान, इत्यादी सामाजिक दृष्टीने महत्त्वाच्या बाबी या अभियानामुळेच यशस्वी होत आहेत.

**संदर्भ सूची :**१) महात्मा गांधी तंटामुक्त गाव मोहीम : शासन निर्णय दि. १९ जुलै २००७ व १४ ऑगस्ट २००८

२) पाटील आर. आर., राज्याच्या समृद्धीसाठी कायदा व सुव्यवस्थेला प्राधान्य, मुलाखत, लोकराज्य, नोव्हेंबर २००८.

३) गांगुर्डे किशोर – गावागावात सरु ... तंटामुक्तीचे वारे ... लोकराज्य, ऑगस्ट २०१०.

४) पाटील आर. आर., मा. गृहमंत्री, शांततेकडून समृद्धीकडे, यांची मुलाखत, लोकराज्य, ऑगस्ट २०१०.

५) दिघावकर प्रताप, तंटामुक्तीची युनो वारी, लोकराज्य, ऑक्टोबर २०१०

६) जिल्हा व सामाजिक व आर्थिक समालोचन : अर्थ व सांख्यिकी संचालनालय, महाराष्ट्र शासन, मार्च २०१०.

७) जगताप प्रभाकर रघुनाथ, लोकसंख्या विषयक धोरण : एक चिकित्सक अभ्यास, योजना जुलै २०१०.

८) फलके बाबासाहेब ना. महात्मा गांधी तंटामुक्त गाव मोहिमेचा पाटण तालुक्यातील ग्रामपंचायत निवडणुकांवरील प्रभाव : सुवर्ण महोत्सवी महाराष्ट्र व पंचायतराज विचारमंथन संशोधन पत्रिका जानेवारी २०१२.

९) महात्मा गांधी तंटामुक्त गाव मोहीम कोल्हापूर जिल्हा मार्गदर्शिका – २०१०–११.

१०) Web - www.govt.maharashtra.co.in 27-2-2012.

११) शासन निर्णय क्रमांक तंमुगा : १००८/सीआर–४३/२००८/पोल–१५, मंत्रालय, मुंबई– ४०० ०३२, दिनांक : १४ ऑगस्ट २००८.



Scanned by CamScanner

ISSN 2277-8063

# चार राज्यांच्या निवडणूका :– एक परामर्श

डॉ. रविंद्र पांडुरंग भणगे सहयोगी प्राध्यापक राज्यशास्त्र अधिविभाग शिवाजी विद्यापीठ कोल्हापूर

.................................................................................................

**प्रस्तावना** :भारतात १९ में २०१६ रोजी चार राज्य व एका केंद्रशासीत प्रदेशाच्या विधानसभा निवडणुकीचा निकाल लागला. या विधानसभा निवडणुकीत आसाम, तामिळनाडू, पश्चिम बंगाल, केरळ या चार राज्यांचा आणि पॉंडिच्चेरी या केंद्रशासीत प्रदेशाचा समावेश होता. या निवडणुकीच्या निकालाने प्रथमच आसाम या राज्यात भारतीय जनता पक्षाच्या (भाजपत्र च्या नेतृत्वाखाली निर्माण झालेल्या आघाडीने यश मिळवले तसेच तामिळनाडू व पश्चिम बंगालमध्ये अनुक्रमे अण्णा द्रमुक व तृणमूल कॉंग्रेस या प्रादेशिक पक्षांनी विजय संपादन केला. तर केरळमध्ये डावी आघाडी विजयी झाली. आणि केंद्रशासीत प्रदेश पॉंडिच्चेरीमध्ये कॉंग्रेसने आपली सत्ता राखली ही निवडणूक भाजप या राजकीय पक्षाला उभारी मिळाली तर प्रादेशिक पक्षांनी आपले अस्तित्व सिध्द केले डाव्या आघांडीनी केरळच्या रुपाने आपले अस्तित्व शाबूत राखले. कॉंग्रेस या पक्षाचा निवडणूक निकालाने अपेक्षाभंग केला व या पक्षाला पॉंडीच्चेरी या केंद्रशासीत प्रदेशा व्यतिरिक्त तर पराभव पत्करावा लागला. अशा या निवडणुकीच्या सविस्तर विश्लेषण राज्यावर प्रस्तुत संशोधनपर लेखात मांडले आहे.

**१ आसाम विधानसभा निवडणूक** :–ईशान्य भारतातील सर्वात मोठे राज्य म्हणून आसाम राज्याची ओळख आहे. आसाम या राज्यामध्ये गेली १५ वर्षे तरुण गोगाई यांच्या नेतृत्वाखाली कॉंग्रेस पक्षाचे सरकार सत्तेत होते. २०१६ च्या निवडणुकीमध्ये आसाममध्ये भाजप पक्षाने जोरदार मुसंडी घेतली या पक्षाने आसाम विधानसभा मतदार संघातील १२६ पैकी ८६ जागा भाजप व त्याच्या आघाडीतील घटक पक्षानी प्राप्त केल्या आसाममध्ये २००१ च्या विधानसभा निवडणुकीत कॉंग्रेस नेते तरुण गोगाईच्या नेतृत्वाखाली ऑल इंडिया युनायटेड डेमोक्रेटीक फ्रंट या पक्षाबरोबर युती करुन सत्ता प्राप्त केली होती. व २००६ व २०११ च्या विधानसभा निवडणुकीत या युतीला सत्ता राखण्यात यश प्राप्त झाले. पण २०१६ ची निवडणूक ही अत्यंत चुरशीची झालेली दिसते. ज्यामध्ये भाजपाने आसाममधील आसाम गण परिषद व बोडोलॅंड पीपल फ्रंट या दोन स्थानीक पातळीवर असलेल्या प्रादेशिक पक्षाशी युती केली याचबरोबर दक्षिण आसाममध्ये आदिवासी बहुल क्षेत्रामध्ये बांग्लादेशी घुसखोरामुळे निर्माण झालेला हिंसाचार व त्यात आदिवासींची होणारी कुचंबना यामूळे तेथील आदिवासींचा गट या निवडणुकीवेळी भाजपाकडे गेलेला दिसतो. याचबरोबर आसाममध्ये हिंदु धार्मिक गटाचा वाढता प्रभाव यातून तेथे मतांची झालेली धार्मिक विभागणी आणि चहामळयातील कामगार, दलित यांनी कॉंग्रेसकडे फिरवलेली पाठ या विविध कारणामुळे आसामच्या निवडणूकीत कॉंग्रेसचा पराभव झाला व भाजप आघाडीचा विजय सुकर झाला. आसाममधील निवडणूकीतील पक्षनिहाय स्थिती खालीलप्रमाणे दिसून येते.

आसाम विधानसभा निवडणूक २०११ व २०१६

| पक्ष | २०१६ | २०११ |
|---|---|---|
| भाजप | ६० | ०५ |
| आसाम गण परिषद | १४ | १० |
| बीपीएफ | १२ | १५ |
| कॉंग्रेस | २६ | ७८ |
| एयुडीएफ | १३ | १८ |
| इतर | ०१ | . |

वरील तक्त्यावरुन दिसून येते की २०११ साली भाजपाची स्थिती फक्त ५ विधानसभा सदस्याची होती पण २०१६ साली ६० विधानसभेच्या जागा जिंकून मोठी आघाडी घेतली आहे. पण कॉंग्रेसला २०१६ च्या निवडणूकीत ५२ जागा गमवाव्या लागल्या तर एयुडीएफने ही आपल्या ५ जागा गमवल्या या निवडणूकीत आसाम गण परिषदेने २०११ च्या निवडणूकी पेक्षा ४ जागा अधिक प्राप्त केल्या.

आसामच्या निवडणुकीमध्ये भाजप आघाडीला जे यश मिळाले त्यामध्ये भाजपाचे नियोजन व प्रादेशिक स्तरावरील नेतृत्वाला दिले गेलेले महत्त्वपूर्ण स्थान हे अत्यंत महत्वाचे होते. त्यांनी ८० वर्षाच्या तरुण गोगाई या कॉंग्रेसच्या नेतृत्वापुढे नव्या दमाचे आणि राज्याच्या राजकारणात सक्रीय असलेले आसाममधील बांग्लादेश घुसखोरीविरोधी प्रखरपणे लढा देणारे सर्वानंद सोनोवाल यांना मुख्यमंत्री पदाचे उमेदवार म्हणून घोषीत केले ज्याचा फायदा भाजपाला या निवडणुकीत झाला. तसेच आसाम मधील कॉंग्रेसमधील अंतर्गत बंडाळी मधून कॉंग्रेसचा अत्यंत कट्टर विश्वासू नेता 'हिमांत विश्व शर्मा यांचा




Scanned by CamScanner

भाजपमधील प्रवेशाने निवडणुकीआधीच भाजपाच्या विजयाची चाहुल निर्माण झाली होती. मागील विधानसभा निवडणुकीत कॉंग्रेसला ७८ जागा व भाजपाला ५ जागा होत्या पण २०१६ च्या निवडणुकीत कॉंग्रेसला २६ व भाजप आघाडीला ८६ जागा मिळाल्या व हे भाजप पक्षाचे पूर्वेकडील राज्यात मिळालेले अतुलनीय असे यश असलेले दिसते.

**२ पश्चिम बंगालची विधानसभा निवडणूक :—**

पश्चिम बंगाल विधान सभा निवडणुक ही ऐतिहासिक अशी होती. त्या निवडणुकीत ममता बॅनर्जीचा 'तृणमूल कॉंग्रेस पक्ष' डावे पक्ष कॉंग्रेस पक्ष व भाजप आघाडी या ४ पक्षांमध्ये प्रामुख्याने लढत होती. या निवडणुकीमध्ये डावे व कॉंग्रेस पक्ष पहिल्यांदाच आघाडीच्या रुपाने एकत्र आले होते. हा एक विचित्र संयोग होता असे म्हणावे लागेल कारण केरळ विधानसभा निवडणूकीत हे दोन्ही विरोधात लढत होते. या निवडणुकीत सत्तेत असलेला तृणमुल कॉंग्रेस पक्ष लोकांपुढे पुन्हा सत्ताप्राप्तीसाठी मते मागण्यासाठी जनतेसमोर आले पण त्याचवेळी त्यांच्या मंत्रीमंडळातील शारदा घोटाळा, सिंदीकेट प्रकरण, बडा बजार उड्डाणपुल दुर्घटना अशी विविध संकटे ममता बॅनर्जी समोर होती. व या संकटाना सामना करत ममता बॅनर्जी यांना आपल्या पक्षाला विजय मिळवून दयायचा होता. यावेळी ममता बॅनर्जी यांनी 'एकला चलो रे' या तत्वाचा अवलंब करुन निवडणुकीची प्रचार धुरा हातात घेतली. व २०११ च्या विधानसभा निवडणुकीपेक्षा ही अधिक जागा या निवडणुकीत प्राप्त केल्या.

पश्चिम बंगाल विधानसभा निवडणूक २०११ व २०१६

| पक्ष | २०१६ | २०११ |
|---|---|---|
| तृणमुल कॉंग्रेस | २११ | १८४ |
| माकप | २६ | ४० |
| भाकप | ४४ | ४२ |
| कॉंग्रेस | ०३ | ०० |
| भाजप | ०२ | ११ |
| एआयएफबी | ०३ | .०७ |
| आरएसपी | ०३ | ०३ |
| गोरखा मुक्ती मोर्चा | ०३ | ०५ |
| इतर | ०१ | |

वरील तक्त्यानुसार दिसून येते की २०११ साली १८४ जागा मिळालेल्या तृणमुल कॉंग्रेसला २०११ सालच्या विधानसभा निवडणुकीत २११ जागा प्राप्त झाल्या तर या निवडणुकीत डाव्यांची पिछेहाट होवून ७ जागात विजय होवून भाजप पक्षाला ७ जागा प्राप्त करुन पश्चिम बंगालच्या राजकारण चंचू प्रवेश झाला. ममता बॅनर्जीच्या या विजयाची कारणे खालीलप्रमाणे दिसून येतात.

**ममता बॅनर्जीचा ग्रामीण राजकारणावरील प्रभाव** :—तृणमूल कॉंग्रेसचा ग्रामीण राजकारणावर प्रभाव दिसून येतो या पक्षाने ४८ विधानसभा मतदार संघापैकी ४३ जागा जिंकलेल्या दिसतात. यामध्ये ममतांनी सुरू केलेल्या २ रू किलो तांदूळ योजना, कन्याश्री योजना, खाद्यासाठी योजना प्रमुख आहेत. तसेच ममताचे बंगाली भाषेतील वकृत्व अत्यंत प्रभावी ठरले.

डावी व कॉंग्रेस यांची विचित्र युती :— ममता बॅनर्जीच्या विरोधात डावे व कॉंग्रेस पक्ष यांची युती झाली असले तरी त्यांच्या कार्यकर्त्यांचे मनोमिलन झाले नव्हते त्यामुळे एकमेकांना मतदान न करण्याचे धोरण दोन्ही पक्षातील कार्यकर्त्यांने अवलंबल्याने डावे व कॉंग्रेस पक्षाचा पराभव झाला.

डाव्यांचे शहरी भागाकडे अधिक लक्ष :—डाव्या पक्षांनी ग्रामीण जनतेला गृहित धरुन शहरी मतदार संघाकडे अधिक लक्ष दिले. बंगालमध्ये २५: शहरी मतदान असल्याने शहरी भागातील मतदारांना आपल्याकडे वळवण्यास डावे पक्ष अपयशी ठरले. ज्यामुळे तृणमुल कॉंग्रेसला ग्रामीण भागाबरोबर शहराचा लाभ उठवता आला.

तृणमुल पक्षाला मुस्लिम मतदारांचा पाठिंबा :—पश्चिम बंगालच्या निवडणुकीत भाजप पक्षाने हिंदुत्वाचा अजंठा प्रखरतेने मांडला हिंदु मुस्लिमाचे ध्रुवीकरण झाले व मुस्लिम मतदार मोठया प्रमाणात ममता बॅनर्जीच्या पक्षाकडे वळाला पश्चिम बंगालमधील ७०: मुस्लिम बहुल मतदारसंघामध्ये तृणमुल कॉंग्रेसला आघाडी यामुळे मिळालेली दिसते.

केंद्राविषयी टिका :—ममता बॅनर्जीने केंद्र सरकारच्या धोरणावर टिका करुन आपण खूपच लहान व्यक्ति आहोत आपल्या सरकारवर वेगवेगळे कट रचले जातात त्रास दिला जातो असे मत प्रदर्शन करुन केंद्र



Scanned by CamScanner

सरकार मला ताप्तत्वाची वागणूक देते असे जनतेच ठासुन सांगुन सहानुभूति मिळवली. अशा विविध कारणांनी ममता बॅनर्जीच्या तृणमुल कॉंग्रेस पक्षाने डावी व कॉंग्रेस आघाडीचा धुवा उडवला व एक ऐतिहासिक विजय संपादन केला.

**३ तामिळनाडूतील विधानसभा निवडणूक** :—तामिळनाडूच्या राजकारणात दर ५ वर्षांनी होणारा सत्ताबद्दल २०१६ च्या विधानसभा निवडणुकीमध्ये फोल ठरला व सत्तेत असलेला अण्णा द्रमुक पक्ष बहुमताने विजय संपादन करुन ऐतिहासिक विजय मिळवला या २०१६ च्या विधानसभा निवडणुकीमध्ये करुणानिधी यांचा द्रमुक पक्ष जयललिता यांचा अण्णाद्रमुक पक्ष या दोन्ही प्रादेशिक पक्षात मुख्य लढत होती. कॉंग्रेस व भाजप हे राष्ट्रीय पक्ष हे या निवडणुकीमध्ये आपला प्रभाव पाडू शकले नाहीत यांचे स्थान या निवडणूकीत नगण्य असेच राहिलेले दिसते.

तामिळनाडूच्या विधानसभा निवडणूकीत २०११ व २०१६ सालीचे निकाल.

| पक्ष | २०१६ | २०११ |
|---|---|---|
| अणाद्रमुक | १३४ | १५० |
| द्रमुक | ८९ | २३ |
| पीएके | ०३ | ०३ |
| कॉंग्रेस | ०८ | ०५ |
| डीएमके | | २९ |
| इतर | ०१ | २२ |

वरील तक्त्यावरुन दिसून येते की २०११ साली अण्णाद्रमुक १५० जागा प्राप्त झाल्या होत्या पण २०१६ च्या विधानसभा निवडणूकीत १३४ जागा प्राप्त झाल्या. या जागा १६ ने कमी झाल्या पण सत्ता अण्णा द्रमुकच्या हाती राहिली. द्रमुक पक्षाने ६६ जागा अधिक जिंकून ८९ पर्यंत मजल मारली पण द्रमुक पक्ष सत्तेपासून वंचितच राहिला.

या तामिळनाडूच्या विधानसभा निवडणुकीत करुणानिधी द्रमुक पक्ष बाजी मारेल असे वाटत होते. पण या पक्षामध्ये कौटुंबिक कलह खुपच वाढला होता. करुणानिधीचे दोन पुत्र स्टॅलिन व अलगीरी यांच्यात सुप्तसंघर्ष होता. याचबरोबर ९२ वर्षाचे करुणानिधी यांची प्रकृती व्यवस्थित नसल्याने या पक्षाला म्हणावे तसे यश या निवडणुकीत प्राप्त करता आले नाही. याऊलट जयललिता यांनी निवडणुकीची सर्व सुत्रे आपल्या हातात घेवून अत्यंत जोमाने प्रचार केला. जयललिता यांनी आपल्या ५ वर्षाच्या शासनकाळात अनेक लोकप्रिय योजना राबवल्या त्यामध्ये 'आम्मा कॅटिंग' हॉस्पिटल, सामान्य, गोरगरिबांना विविध सोयीसुविधा पुरविल्या तसेच युवकांना आकर्षित करण्यासाठी योजना राबवल्या ज्यामुळे बेकायदा मालमत्ता संपादन प्रकरणे त्या दोषी ठरल्या असल्या तरी त्यांची लोकप्रियता टिकून राहिली याचाच प्रभाव विधानसभेच्या निवडणूकीत दिसून आला व या पक्षाने २३४ जागांपैकी १३३ जागा संपादन करुन २९ वर्षाची परंपरा मोडित काढुन सत्ता प्राप्त केली. तामिळनाडूच्या विधानसभा निवडणुकीमध्ये इतर पक्षांचा प्रभाव दिसून आला नाही.

**४ केरळ विधानसभा निवडणूक** :—केरळ विधानसभा निवडणुक ही प्रामुख्याने युनायटेड डेमॉक्रॅटिक फ्रंट व लेफ्ट डेमॉक्रॅटिक फ्रंट या दोन आघाडयाच्या राजकारणाभोवती फिरत असल्याचे दिसते. केरळच्या विधानसभा निवडणुकीमध्ये स्मजि क्मउवबतंजपब थ्तवदज उमंदे डावी आघाडी यांनी १४० विधानसभा मतदार संघापैकी १९ जागा प्राप्त केल्या तर न्दपजमक क्मउवबतंजपब थ्तवदज कॉंग्रेस आघाडीने ४७ जागा प्राप्त केल्या. या निवडणुकीत परंपरेनुसार सत्ताबदल दिसुन येतो. दोन्ही आघाडया १९८२ पासुन आदलाबदलीने सत्तेत येत असल्याने दिसुन येते. केरळमध्ये कॉंग्रेस आघाडीची सत्ता असताना जिशा बलात्कार हत्या प्रकरण झाले. ज्याचा फटका कॉंग्रेसला दलित मते गमावून झाला. तसेच ओमनचंडी यांच्या नेतृत्वाखाली सरकार मते अनेक व भ्रष्टाचाराची प्रकरणे उघडी झाली. ज्याचा फटका कॉंग्रेस आघाडीच्या पराभवासाठी झाला. त्याच पध्दतीने डाव्या आघाडीचे अच्युतानंद हे ९३ वर्षाचे असुनही त्यांनी पक्षाला एकजुट ठेवून जोरदार प्रचार केला. व पक्षाला बहुमताचा आकडा प्राप्त करुन दिला. याचबरोबर या निवडणुकीत भाजप पक्षाने जोरदार प्रचार केला होता. व राष्ट्रीय स्वयंसेवक संघाच्या कामगिरीमुळे पहिल्यांदाच भाजप पक्षाचा राजागोपाल यांच्या रुपाने एक सदस्य केरळ विधानसभा निवडणूकीत जिंकून आला या निवडणुकीत भाजपाने १५: मते प्राप्त केली. जी भविष्यातील केरळच्या राजकारणात महत्त्वपूर्ण ठरणार असल्याचे दिसून येते. केरळ विधानसभा निवडणूकीत खालीत तक्त्यावरुन सत्तेचे परिवर्तन दिसून येईल



Scanned by CamScanner

केरळ विधानसभा निवडणूक २०११ व २०१६

| पक्ष | २०१६ | २०११ |
|---|---|---|
| माकप | ५८ | १३ |
| भाकप | ११ | ४५ |
| कॉंग्रेस | २२ | ३८ |
| भाजप | ०१ | ०० |
| एनसीपी | ०२ | ०० |
| मुस्लिम लिग | १८ | २० |

केरळ विधानसभा निवडणूक ही डावे व कॉंग्रेस यांच्यासाठी अत्यंत अटीतटीची होती. पक्षातील मतांची टक्केवारी फक्त ३% चा अंतर होते व याचामुळे सत्ताही पत्करलेली दिसते.

**५ पुडुच्चेरी विधानसभा निवडणूक :** या विधानसभा निवडणूकीत एनआरसीचा पराभव झाला. सत्ताधारी असलेली एनआरसीचा कांग्रेस आघाडीने पराभव केला आणि स्पष्ट बहुमत प्राप्त करून पुडुच्चेरीत सत्ता प्राप्त केली. खालील आकडेवारीत ते दिसून येईल

पुडुच्चेरी विधानसभा निवडणूक २०११ व २०१६

| पक्ष | २०१६ | २०११ |
|---|---|---|
| कॉंग्रेस | १५ | ०७ |
| एआयएडीएमके | ०४ | ०५ |
| एआयएनआरसी | ०८ | १५ |
| डीएमके | ०२ | ०२ |

वरील तक्त्यावरुन दिसून येते की २०११ साली एनआरसी या पक्षाला १५ जागा प्राप्त झाल्या होत्या पण २०१६ साली ८०जागा मिळवल्या त्यांनी ७ जागा गमवल्या. पण याचवेळी कॉंग्रेसने २०१६ निवडणूकीत ८ जागा जास्त जिंकल्या व १५ जागा प्राप्त केल्या व डीएमकेच्या २ जागा एकत्र करुन सत्तेचे स्पष्ट बहुमत प्राप्त केले आहे.

**समारोप** —चार राज्याच्या विधानसभा निवडणूक व एक केंद्रशासित प्रदेशाच्या विधानसभा निवडणूकीत प्रादेशिक पक्षांचे वर्चस्व दिसून येते. यात पश्चिम बंगाल मध्ये ममता बॅनर्जीने २११ जागा बरोबर 44.9% मते प्राप्त केली आहेत तामिळनाडूत अण्णाद्रमुक व द्रमुक पक्षाने अनुक्रमे 40 व 31.6% मत प्राप्त केली आहेत. यामानाने या राज्यात भाजप व कॉंग्रेस राष्ट्रीय पक्ष अगदी नगण्य असल्याचे दिसून येतात. प. बंगालमध्ये भाजपाला 10.2% व कॉंग्रेसला 12.3% तर तामिळनाडूत भाजपाला 2.8% व कॉंग्रेसला 6.4% प्राप्त झाली आहेत या निवडणूकीत ईशान्य राज्यात असामच्या रुपाने भाजपाने सत्ता प्राप्त करुन प्रवेश मिळवला आहे. पण मताच्या टक्केवारीत भाजप 29.5% तर कॉंग्रेस 31% दिसून येतो. येथे मत विभाजन भाजपाला यश प्राप्त करुन दिलेले दिसून येते केरळमध्ये भाजप पक्षाला मिळालेली 10.5% मत व १ विधानसभेची जागा अत्यंत महत्व पूर्ण असल्याचे दिसते. या निवडणूकीत भाजप पक्षाला यश प्राप्त झालेले असले तरी ते मर्यादीत आहे पण कॉंग्रेस पक्षाची पिछेहाट होत आहे ज्याचा परिणाम कॉंग्रेस पक्षातील नेतृत्व बदल, अंतर्गत गटबाजी वाढण्यास होणार आहे असे म्हणावे लागेल.

संदर्भ —

१ दै,लोकमत

२ दै,पुढारी

३ दै,सकाळ

४ दै,महाराष्ट्र टाईम्स

५ निवडणूक आयोगाची वेबसाईट



Scanned by CamScanner

ISSN 2277-8063

# आरोग्य आणि तंदुरूस्तीची समस्या

प्रा.एम.एस.इंगळे
शारिरीक शिक्षण विभाग, पी.आर.डी.के.एम.व्ही,नांदगाव(खं), अमरावती

प्रस्तावना : स्वस्थ नागरिक ही स्वस्थ देश का निर्माण करता है, स्वास्थ्य किसी भी व्यक्ति की समन्वय और वातावरण के समायोजन की अवस्था है। इसके साथ जो व्यक्ति शारीरिक व मानसिक रूप से स्वस्थ होगा, उसकी फिटनेस भी इतनी ही अच्छी होगी। स्वास्थ्य किसी व्यक्ति की वह अवस्था है। जिसमें वह अपने कल्याण के साथ–साथ मानव व समाज कल्याण के प्रति प्रोत्साहन या प्रेरित रहता है। लेकिन आजकल देखा गया है कि कोई भी नागरिक अपने स्वास्थ और फिटनेस पर ध्यान नहीं दे रहा है जिसके कारण कई बिमारियों का सामना करना पड रहा है। प्राचीन काल में मनुष्य अपने शरीर को स्वस्थ बनाए रखने के लिए प्रतिदिन व्यायाम करता है। जिससे उसका शरीर बिमारियों से मुक्त रहता था । इसी कारण वह बिना थकान के अपने सभी कार्यो को पुरा करता था। लेकिन आजकल के युग में न तो व्यक्ति व्यायाम करता है और न ही सन्तुलित आहार लेता है। जिससे प्रतिदिन शारीरिक क्षमता का स्तर गिरता जा रहा है।

स्वास्थ का अर्थ : स्वास्थ्य को मनुष्य का सबसे बडा खजाना कहा जाता है। जिसका स्वास्थ्य अच्छा है उससे यह उम्मीद की जाती है कि वह इसका पुरा ख्याल रखे, ताकि यह खजाना उसके हाथों से ही न निकल जाए । स्वास्थ्य शास्त्री अब धीर–धीरे इस धारणा को त्यागते जा रहे है कि स्वास्थ्य सिर्फ बिमारियों का ईलाज या उनकी रोकथाम तक ही सीमित है। उनका स्वास्थ्य के प्रति जो संकल्प अब है उसने इस बात पर जोर दिया जाता है कि अपना स्वास्थ्य या भलाई का ख्याल रखना व्यक्ति की अपनी जिम्मेदारी है। स्वास्थ्य के ही प्रसंग में स्वामी विवेकानंद ने कहा है, एक कमजोर आदमी, जिसका शरीर या मन कमजोर है, वह कभी भी मजबूत काया का मालिक नहीं बन सकता है: H-Habits , E-Environment, A -Age, L-Living Standard, T-Training H-Heredity

स्वास्थ्य की परिभाषा :J. F. Willian के अनुसार जीवन का वह गुण है जो मनुष्यों को अधिकतम जीने व सर्वोत्कृष्ट सेवा करने योग्य बनता है।

वोल्टमर व ऐस्लिंगर के अनुसार, स्वास्थ्य वह मानसिक व शारीरिक स्थिति है जिसमें व्यक्ति अपने शारीरिक अंगो के माध्यम से अपने पर्यावरण में अच्छी तरह से ढल कर अच्छा काम कर सकता है।

शारीरिक क्षमता का अर्थ :शारीरिक क्षमता मानव शरीर के लिए ठीक उसी तरह है जिस तरह इंजन के लिए बढिया सुर यह हमें अपने प्रछन्न शक्ति को प्रदर्शित करने में सक्षम बनाती है। फिटनेस का उस हालात के रूप में भी वर्णित किया जा सकता है जो हमें देखने, अनुभूत करने और हमारे लिए अच्छा करने में मदद दे। इससे भी अधिक यह रोजाना के कार्यो को उत्साह और सतर्कता से सम्पन्न करने, फुर्सत के समय के कियाकलापों और आपात समय की आवश्यकताओ से निपटने के लिए उर्जा को बचाने की योग्यता है।

शारीरिक क्षमता की परिभाषाएँ :

1 निक्सन के अनुसार, शारीरिक फिटनेस व्यक्ति की अवयव क्षमता में सम्बध्द है जिसमें हम अपने रोजाना के सामान्य कार्य बिना थके या थकान के सम्पन्न करते है और अचानक आनेवाली किसी आपात स्थिति से निपटने के लिए पर्याप्त बल और उर्जा सुरक्षित रखते है।

2 किरचनेस के अनुसार, फिटनेस वह स्थिति है जो व्यक्ति व्दारा किये जा सकनेवाले कार्यो की डिग्री लक्षित करे। फिटनेस व्यक्तिगत मामला है। यह प्रत्येक व्यक्ति को उसकी अन्तः शक्ति के साथ अत्याधिक प्रभावी तरीके से कियान्वित करने की योग्यता प्रदान करती है।

स्वास्थ्य को प्रभावित करनेवाले घटक :

1 आहार :यह स्वास्थ्य को प्रभावित करने का महत्वपूर्ण घटक है। अगर हमारे शरीर को सन्तुलित आहार नही मिलता है तो उसकी शरीर के अन्दर किटाणुओं से लडने की शक्ति कम हो जाती है और हमारे शरीर में कई बिमारियॉ उत्पन्न हो जाती है।

2 पर्यावरण :हमारे चारों तरफ के वातावरण पर भी हमारा स्वास्थ्य निर्भय करता है। जिस स्थान पर हम रहते है और वहॉ का पर्यावरण दुषित है तो इसके कारण भी हमारे शरीर में कई प्रकार की बिमारियां लग सकती है। इसलिए पर्यावरण भी स्वास्थ्य को प्रभावित करने का घटक है।



Scanned by CamScanner

3 समाज :जिस समाज में हम रहते है अगर वहॉ की संस्कृति अच्छी नही है या लोगों को गलत आदतें है तो उसका प्रभाव भी स्वास्थ पर पडता है।
4 अनुवंशिकता :यह स्वास्थ्य को प्रभावित करने का महत्वपूर्ण घटक है। क्योंकि आमतौर पर देखा जाता है कि जैसे गुण या दोष बच्चे के माता–पिता में होते है वैसे ही गुण दोष बच्चे में होते है। इसलिए स्वास्थ्य अनुवांशिकता पर भी निर्भर करता है।
5 व्यवसाय :काई भी व्यक्ति अपने जीवन निर्वाह करने के लिए कोई न कोई कार्य करता है, उसी को उसका व्यवसाय कहा जाता है। व्यवसाय भी स्वास्थ्य को प्रभावित करता है। जैसे कुछ लोगों का व्यवसाय ऐसा होता है कि उनको पुरा दिन बैठकर ही काम करना पडता है जिससे शरीर में कई बिमारियां शुरू हो जाती है।

**समस्याका अर्थ :**

वादग्रस्त विषय के अन्तर्गत किसी भी एक मुद्दे पर वादविवाद करते हुए सभी तरफ से और बचावात्मक ज्ञान की चर्चा करने के कला को विवाद का विषय कहते है।
वादग्रस्त मुद्दे तैयार होने के कारण :
1 संस्कृती 2 परंपरा 3 आर्थिक व सामाजिक स्तर 4 व्यक्तिगत सम्बध 5 नम
शारीरिक क्षमता को प्रभावित करनेवाले घटक :
1 उम्र (Age) :शारीरिक फिटनेस के उपर प्रभाव डालने वाला प्रमुख तत्व उम्र है। प्रौढता को आमतौर पर कालकमिक, अस्थि पिंजर और देह की उम्र के आधार पर परिभाषित किया जाता है। जीवन काल को मुख्य रूप से पांच हिस्सों में बांटा जाता है– शिशुकाल, बचपन, किशोर, जवानी और बुढापा। बच्चों या किशोरों की शारीरिक तंदुरूस्ती दैहिक और शारीरिक प्रदर्शन उनकी हड्डियों, पेशियों, नसों और अन्य अंगो के विकास पर निर्भर करती है। जैसे–जैसे बच्चे का आकार बढता जाता है, उसकी कार्य करने की सामर्थ्य और शारीरिक फिटनेस में भी सुधार आता जाता है।
2 लिंग (Sex) :किशोर अवस्था में पहुँचने से पहले लडके–लडकियां कद, वजन, गोलाई हड्डियों की चौडाई और शारीरिक बनावट मैं एक दूसरे से बहुत ज्यादा भिन्न नहीं होते। लेकिन प्रौढता के आने पर उनके बीच शारीरिक भिन्नताएँ उभर कर सामने आने लगती है। यह शारीरिक दैहिक–रचनात्मक एवं मनोवैज्ञानिक भिन्नताएँ या असमानताएँ स्त्री–पुरूषों की शारीरिक फिटनेस को भी प्रभावित करती है। इसी तरह लिंग से जुडी असमानताओं के आधार पर दोनों वर्गो के लिए शारीरिक फिटनेस के अलग–अलग कार्यकम तैयार किये जाने चाहिए । कसरत की किस्म, इसका समय एवं आवृत्ति पुरूषों व स्त्रियों के लिए अलग–अलग होनी चाहिए।
3 शारीरिक बनावट (Body Composition) :शारीरिक बनावट पतले शारीरिक पिंड और इसके उपर जमा चर्बी का अनुपात है। मोटापे को शरीर की उस फालतु चर्बी के रूप में परिभाषित किया जाता है जो ह्दय रोग होने की संभावनाओं को बढाता है। पुरूषों में शारीरिक चर्बी 12 से 17 प्रतिशत और स्त्रियों में 18 से 22 प्रतिशत तक होनी चाहिए । शारीरिक चर्बी कुछ शारीरिक कार्यो के लिए जरूरी भी है। कई शरीरों में उत्पत्ति से जुडे कारणों की वजह से चर्बी नहीं बढती जबकि कईयों पर चर्बी बहुत जल्दी चढ जाती है।
शरीर या देह की मुख्य तौर पर तीन किस्में है।
एंडोमोर्फ :– जिसका विशेष लक्षण जिस्म का देह का बडे ब्लाक जैसा होना है।
मेसोमोर्फ :– वह देह जिसकी मजबूत, पेशियों वाली होती है। ऐसा मनुष्य देखने में भी ह्ष्ट–पुष्ट लगता है।
एक्टोमोर्फ :– वह देह है जो कमजोर या मरियल जैसी दिखती है और जिस्म में मांस भी बहुत कम होता है।
1 आहार (Diet) :शारीरिक फिटनेस स्तर को बनाये रखने के लिए खुराक या आहार महत्वपूर्ण भमिका अदा करती है। जैसा कि पहले ही दर्शाया जा चुका है कि वनज या भार को नियंत्रित रखने के लिए यह उुर्जा ग्रहण करने के बीच संतुलन हो। यदि हम उतनी ही खुराक लेते है जितनी की हमारे शरीर को जरूरत है तो वनज अधिक घटे या बढेगा नही। अगर शारीरिक जरूरत से अधिक आहार लगे तो हमारे शरीर पर चर्बी चढना स्वाभाविक ही है। इसी तरह यदि हम ग्रहण की गई उर्जा/ आहार से अधिक उुर्जा खर्च करते है तो हमारे जिस्म पर चढी चर्बी का ढलना और खर्च हो जाता है। खुराक की आवश्यकता अभ्यास की किस्म और व्यक्ति के शारीरिक ढांचे के मुताबिक अलग–अलग होती है। जोरदार अभ्यास करने वाली एुलीट के लिए अच्छी खुराक की



Scanned by CamScanner

आवश्यकता है जबकि दिमागी काम करने या कम शारीरिक कियाकलाप वाला काम करने वाले व्यक्ति को कम खुराक दी जानी चाहिए । शारीरिक फिटनेस का कार्यकम बनाते समय आहार की आवश्यकता पर पूरा ध्यान दिया जाना चाहिए ।

2 मौसम :शारीरिक फिटनेस पर अलग–अलग मौसमी हालात जैसे– सर्दीयां, गर्मियां, उमर आदि असर डालते है।

आरोग्य आणि तंदुरूस्ती :

1. Issue Related with Food :प्रतिदिन प्रत्येक व्यक्ति कोई न कोई कार्य करता रहता है। कार्य को करने के लिए उर्जा की आवश्यकता होती है और उर्जा हमें भोजन से मिलती है। भोजन हमोर शरीर के लिए एक महत्वपूर्ण घटक है। जिससे हमारे शरीर की वृध्दि होती है इसलिए हमें संतुलित आहार लेना चाहिए । लेकिन आज के आधुनिक युग में सभी लोग कृत्रिम आहार का सेवन करते है जैसे, नुडल्स, बर्गर, सैन्डविच आदी। जिससे उनकी भूख तो खत्म हो जाती है लेकिन शरीर को पौष्टिक तत्व नही मिलते है। जिसके कारण स्वास्थ्य और शारीरिक क्षमता का स्तर गिरता जा रहा है। इसलिए स्वास्थ्य और शारीरिक क्षमता से सम्बन्धित भोजन भी महत्वपूर्ण मुद्या है।

2. Issue Related with Sound Pollution :ध्वनी प्रदुषण भी महत्वपूर्ण वादग्रस्त मुद्या है। आजकल ज्यादा से ज्यादा लोग मोबाईल तथा कम्प्युटर को उपयोग में लाते है। जिससे कई बिमारियां उत्पन्न हो रही है, जैसे ब्रेन तथा ह्रद से सम्बन्धित। क्योंकि इन साधनों से जो इलेक्ट्रॉनिक वेवस निकलते है जो हमारे स्वास्थ्य और शारीरिक क्षमता को प्रभावित करते है।

3. Issue Related with Environment :पर्यावरण भी स्वास्थ्य और शारीरिक क्षमता के उपर महत्वपूर्ण मुद्या है। क्योंकि आजकल पर्यावरण इतना खराब हो गया है कि उससे कई बिमारियां उत्पन्न हो रही है। इस का कारण यह है कि दिन प्रतिदिन पेडों को काटा जा रहा है तथा कारखानों का निर्माण हो रहा है जिससे प्रदुषण बढता जा रहा है और लोगो का स्वास्थ्य तथा शारीरिक क्षमता का स्तर कम होता जा रहा है।

4. Issue Related with Profession :व्यवसाय यह भी एक महत्वपूर्ण घटक है। व्यक्ति का स्वास्थ्य और शारीरिक क्षमता उसके व्यवसाय पर भी निर्भर करती है। प्रत्येक व्यक्ति अपने जीवन निर्वाह के लिए अपनी योग्यता के अनुसार कोई न कोई व्यवसाय करता है। कुछ लोगों का व्यवसाय ऐसा होता है कि पुरा दिन चलना पडता है ऐसे व्यक्तियों का स्वास्थ्य और शारीरिक क्षमता अच्छी होती है लेकिन कुछ व्यक्तियों का व्यवसाय ऐसा भी होता है जो पुरा दिन कुर्सी पर बैठे रहते है जिससे उनका स्वास्थ्य खराब हो जाता है।

5. Issue Related with Exercise :व्यायाम भी एक बहुत बडा मुद्या है। पुराने समय में लोग रोज सुबह उठकर व्यायाम करते थे जिसके कारण उनका शरीर स्वस्थ रहता था। लेकिन आजकल कोई भी व्यक्ति व्यायाम नही करता है जिसके कारण बिमारियां उत्पन्न हो रही है।

6. Issue Related with Traditional Games :प्रत्येक जगह के कुछ न कुछ पारंपारिक खेल होते है जिनका उपयोग लोग पहले अपने खाली समय में किया करते थे। इन छोटे छोटे खेलों से हमारा शरीर का स्वास्थ्य अच्छा रहता था और शारीरिक क्षमता भी बढती थी। लेकिन आज यह खेल बिल्कुल लुप्त हो गये है। आज के युग में मनुष्य अपने खाली समय में मोबाईल, कॉम्प्युटर, टी.वी इसके अलावा कई साधनों को उपयोग में लाता है जिससे स्वास्थ्य का स्तर गिरता जा रहा है।

निष्कर्ष :–उपरोक्त बातों से पता चलता है कि स्वास्थ और शारीरिक क्षमता से सम्बन्धित बहुत से मुद्दे जो हमारे स्वास्थ्य और शारीरिक क्षमता को प्रभावित करते है। इसलिए इन मुद्यो पर विवाद किया जाये तो कोई न कोई हल निकल सकता है। जिससे हमारे स्वास्थ्य और शारीरिक क्षमता का स्तर अच्छा हो सकता है।

संदर्भग्रंथ सूची

1 सिंह अजमेर एवं अन्य, शारीरिक शिक्षा तथा ओलम्पिक अभियान, लुधियाना : कल्याणी पब्लिशर्स, 2014

2 कंवर आर. सी. शारीरिक शिक्षा के सिध्दांत एवं इतिहास, नागपूर : अमित ब्रदर्स, 1996

3 मरीयन ऐलीस एसनबोर्न, बेटी जी. हर्टमन, इश्युज इन फिजिकल एज्युकेशन, वाशिग्टन : ली ॲण्ड फेबिजर पब्लिकेशन, 1982

4 Gangawar B. R., Test, Measurement and Evaluation in Physical Education and Sports, Jalandhar : A. P. Publishers, 1999

5 अटवाल एण्ड कंन्सल, ए टेक्स बूक ऑफ हेल्थ इन फिजिकल एज्युकेशन एण्ड स्पोर्टस, जालन्धर : ए. पी. पब्लिकेशन, 200



Scanned by CamScanner

# अण्णाभाऊ साठेंची ग्रामीण दलित कथा : एक आकलन

डॉ. आर. एम. केदार
डॉ. गो. खे. महाविद्यालय, गाडेगाव (तेल्हारा)

**प्रस्तावना :** अण्णाभाऊ साठे यांनी लिलिलेल्या ग्रामीण दलित कथा लक्षवेधक आहेत. त्यांचे 'खुळंवाडी', 'बरबाद्या कंजारी', 'आबी', 'फरारी', 'कृष्णाकाठच्या कथा', 'भानामती', 'लाडी', 'गजाआड' इत्यादी कथासंग्रह प्रसिध्द झाले आहेत.त्यांच्या कथांमधून वारणेच्या खोऱ्यातील परिसर व तेथील लोकांचे चित्रण आले आहे. ग्रामीण भागातील दलितांची चित्रे त्यांनी आपल्या कथांमधून रंगविली आहेत. दु:ख, दारिद्रय, उपासमार, अन्याय, अत्याचार याचे वर्णन प्रामुख्याने त्यांच्या कथेतून येते. 'भूख' हा त्यांच्या कथेतील महत्वाचा विषय आहे. या भूकेपोटीच मग त्यांच्या कथेतील माणसे गुन्हा करण्यास प्रवृत्त होतात आणि स्वत:च्या जीवनाचा नाश करून घेतात. त्यांच्या कथेतील नायक मोठे झुंजार प्रवृत्तीचे आहेत.

अण्णाभाऊंच्या 'स्मशानातील सोनं' या कथेत बेरोजगारीने कंटाळलेल्या भीमाचे चित्रण आले आहे. स्वातंत्र्योत्तर कालखंडात खेडयातून बेकारांचा लोंढा शहराकडे वळू लागला होता. कारण गावात पुरेसा रोजगार उपलब्ध नसतो. म्हणून मग पोट भरण्यासाठी भिमाला गाव सोडून शहराचा आश्रय घ्यावा लागतो. परंतु तेथेही त्याचे नशिब त्याला साथ देत नाही. तो ज्या खाणीत काम करीत असतो ती दगडांची खाण बंद पडते. त्यामुळे भीमाला पुन्हा रोजगारासाठी भटकावे लागते. काम शोधता शोधता त्याला योगायोगाने मढयाच्या राखेत सोने सापडते आणि मग त्याला जगण्याचा एक नवाच मार्ग सापडतो. तेव्हा भीमा म्हणतो, ''मुंबई चाळून मला काम मिळालं नाही पण मढयाची राख चाळून सोनं मिळालं!''[१] म्हणजेच माणसाला जगण्यासाठी किती खालच्या पातळीवर जावे लागते ते आपल्या लक्षात येते. एव्हढेच नाहीतर एकदा मढयाच्या तोंडातील सोने काढतांना भीमाला पशूशी झुंज द्यावी लागते. या झटपटीत त्याच्या हाताची बोटे मढयाच्या तोंडात अडकून त्याला ती गमवावी लागतात. हा प्रकार ज्या दिवशी घडतो नेमका त्याच्या दुसऱ्या दिवशी दगडाची खाण पुन्हा सुरू होते. पण आता त्या खाणीत काम करण्यासाठी भीमाजवळ कामालायक हातच नसतात. असा हा भयानक जीवन संघर्ष भीमाच्या माध्यमातून अण्णाभाऊंनी चित्रीत केला आहे. या कथेच्या बाबतीत भालचंद्र फडके म्हणतात, ''खरचं ही भूक नसती तर जगण्याला काही अर्थ आला असता का? अन्नक्षुधा आणि कामक्षुधांच्या तृप्तीसाठी माणसाला पशू व्हावं लागतं....''[२] यावरून ग्रामीण माणसाला जगण्यासाठी काय काय करावे लागते ते लक्षात येते.

'विष्णुपंत कुलकर्णी' या कथेतही भूकेचाच प्रश्न आला आहे. या कथेतील मुरा व त्याचे साथीदार भूकेचा प्रश्न सोडविण्यासाठी जीवावर उदार होऊन माळवाडीच्या मढेकऱ्याच्या मठातील धान्य लूटून नेतात व आपली भूक भागवितात. या वेळेस त्यांच्या पाठीशी गावचा कुलकर्णी ठामपणे उभा असतो. कारण भूकेमुळे गावातील माणसांनी कुत्र्याच्या मौतीने मरावे हे त्यांना मान्य नसते. दुष्काळाचा व साथीचा बंदोबस्त सरकारने केला पाहिजे असा संदेश पाठवूनही सरकार काहीच हालचाल करत नाही हे पाहून लोकांनी कसेही करून जगलेच पाहिजे असे स्पष्ट मत विष्णुपंत व्यक्त करतात. यावरून ग्रामीण भागात दलितांची काळजी घेणारा एखादा विष्णूपंत असू शकतो हे लक्षात येते.

'सापळा' या ग्रामीण कथेत डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या शिकवणूकीचा गावातील दलितांवर काय परिणाम झाला त्याचे स्पष्ट चित्र आले आहे. ग्रामीण भागातील दलितांमध्ये घडून आलेले परिवर्तन या कथेत पहावयास मिळते. 'मेलेली जनावरे ओढू नका. घाण कामे करू नका' या संदेशाला जीवनात स्थान देऊन हरबा महार व इतर जातबांधव दादा देशमुखाचा मेलेला बैल ओढण्यास स्पष्ट नकार देतात. त्यामुळे गावातील वातावरण तंग होऊन जातं. गावकरी महारांना मारायला उठतात. शेवटी सर्वानुमते गावकरी महारांवर बहिष्कार घलतात. त्यांना गावबंदी व शिवारबंदी केली जाते. तरीही महार मंडळी बधत नाही. उलट हरबा महार आपल्या बांधवांना म्हणतो, ''ही कावडनी घेऊन आपल्या वाडवडिलांनी जन्मभर ढोर वढली आज आपून ती कावडनीच जाळून टाकली. आता परत मेलेल्या ढोराला हात लावायचा न्हाय. टाचा घासून मरूया पर मानानं मरू या. ढोरं वढतो म्हणून आम्ही कुत्र्यावानी ठरलोय'[३] गावाने महारांसाठी लावलेल्या सापळयात शेवटी गावचा पाटीलच सापडतो. तेव्हा मात्र पाटील हा बहिष्कार उठवतो. पाटील म्हणतो, ''गावाशिवाय महारवाडयाला शोभा न्हाय नि महारवाडयाशिवाय गावाला कळा न्हाय. ही पांढर साऱ्यांचीच हाय. साऱ्यांनी एका आईच्या लेकरावानी ऱ्हावं''[४] म्हणजेच खेडयातील दलितांमधेही जागृती घडून येत होती. आपणही माणसं आहोत ही जाणीव त्यांना व्हायला लागली होती. त्याचेच यथार्थ चित्रण अण्णाभाऊंनी 'सापळा' या कथेत केले आहे.



Scanned by CamScanner

स्वातंत्र्यप्राप्तीनंतर शिक्षण सार्वत्रीक झाले. गावोगाव शाळा सुरू झाल्या. स्त्री शिक्षणाचीही दारे उघडल्या गेली होती. त्यामुळेच स्त्रियाही शिक्षण घेऊ लागल्या होत्या. या घडून आलेल्या बदलाचा उल्लेख अण्णाभाऊ साठेंच्या 'इरेनं गाढव खाल्लं' या कथेत येतो. या कथेतील तुक्याची बायको सहाव्या वर्गापर्यंत शिकलेली असते. आपल्याला शिकलेलीच बायको पाहिजे असा आग्रह तुक्याने धरलेला असतो. या कथेतील तुका म्हणतो, ''बायकू पाईजी शिकल्याची. माझ्या घराण्याला शोभली पाइजी.'' ५ यावरून चांगल्या घरचे लोक शिकलेल्या मुलीची अपेक्षा करीत होते हे स्पष्ट होते. एव्हढेच नाही तर शिकलेल्या मुलीला दाखवायला म्हणून आबाजी नावाचा तुकाचा सोबती 'मास्तरगीरीचा दाखला' आपल्या सोबतच ठेवतो. त्या दाखल्याशिवाय शिकलेली नवरी मिळणार नाही असे त्याला वाटते. म्हणजेच शिक्षणाचे महत्व आता लोकांनाही कळायला लागले होते. स्त्रिया सुध्दा शिक्षण घेण्यासाठी शाळेत जात होत्या हेच या कथेवरून लक्षात येते.

'मरीआईचा गाडा' या कथेत चार अंधश्रध्दाळू म्हाताऱ्यांवर शिकलेला तरूण नाना कशी मात करतो त्याचे वर्णन आले आहे. ग्रामीण भागात अंधश्रध्दा फार पाळल्या जातात. खेडयातील म्हातारी माणसे नवीन पिढीला काही कळत नाही म्हणून त्यांचे ऐकत नाहीत. शेवटी नानासारख्या शिकलेल्या तरूणाला शक्कल लढवून त्यांना वठणीवर आणावे लागते. गावात हाग—ओकारीची साथ सुरू झाल्यामुळे मरीआई कोपली असेच गावातील अंधश्रध्दाळू गावकऱ्यांना वाटते. पण ती साथ गावात का पसरली हयाचा विचार कुणीच करीत नाही. तेव्हा सुशिक्षीत तरूण नाना आपल्या सोबत्यांना घेऊन संपूर्ण गाव स्वच्छ करतो. एव्हढेच नाहीतर गावातील म्हाताऱ्यांना न जुमानता शहरातून डॉक्टरांना बोलावून गावातील लोकांवर औषधोपचार करतो. त्यामुळे गावातील हाग—ओकारीची साथ आटोक्यात येते. एव्हढे सारे करूनही गावातील चार म्हातारे मात्र देवीचे तीन शुक्रवार पाळल्यामुळेच रोग हटला असे म्हणतात. त्यासाठी गावातून मरीआईचा गाडा वाजत गाजत काढला जातो. मरीआई कोणत्या दिशेला जाणार यावरून सारा गोंधळ माजतो. शेवटी मात्र नानाचा विजय होऊन मरीआईचा गाडा देवळातच ठेवला जातो व गावातील चार अंधश्रध्दाळू म्हातारे नानाचे पुढारीपणही मान्य करतात.

गावातील रोगराई दूर होण्यासाठी मरीआईचा गाडा गावाबाहेर घालविणे आवश्यक नसून गावातील घाण दूर होणे कसे गरजेचे आहे ते नानाच्या प्रयत्नामुळे पटते. म्हणजेच आरोग्यविषयक जागृती खेडयापाडयातून सुरू झाली होती. तसेच तीन शुक्रवार पाळतांना चाके बंद ठेवायची म्हटल्यावर नाना त्यांना घरातील जाती व शिवारातून गेलेली आगगाडी बंद करून दाखविण्याचे आव्हान देतो, तेव्हा मात्र या म्हाताऱ्यांचा इलाज चालत नाही. म्हणजेच त्या म्हाताऱ्यांच्या वागण्याबोलण्यातील फोलपणा त्यांच्या लक्षात आणून देण्याचा नाना प्रयत्न करतो. शेवटी नानाच्या नवविचारांचा विजय होतो.परिस्थितीमुळे माणसे कशी गुन्हेगार बनतात ते अण्णाभाऊंच्या 'कोंबडीचोर' या कथेतून लक्षात येते. या कथेतील 'कोंबडी चोर' (रामू) म्हणतो, ''तुमचं सरकार चोर पकडतं. पण चोराला चोरी का करावी लागते याचा विचार करीत नाही!'' म्हणजेच गुन्हेगार आणि सामाजिक प्रश्न याचाही उलगडा करण्याचा प्रयत्न या कथेतून करण्यात आला आहे.

अण्णाभाऊंच्या बहुतांश कथांमधील माणसे भुकेने त्रस्त झालेली दिसतात. भुकेचा प्रश्न सोडविण्यासाठी ही माणसे मग चोऱ्या करतात तर कधी दरोडे घालतात, समाज मग त्यांच्याकडे गुन्हेगार म्हणून बघतो. त्यांच्या कथांमधील माणसांचे भिषण जीवन आपल्याला हादरवून सोडते. अण्णाभाऊंच्या कथेतील माणसे आपल्यावर झालेल्या अन्याय अत्याचाराविरूध्द सतत संघर्ष करतांना दिसून येतात. त्यांच्या कथांबद्दल डॉ. प्रकाश कुंभार म्हणतात, ''अण्णाभाऊंची कथा तशी मराठी कथेच्याच वळणाची असली तरी त्यांची कथा ही जगण्यासाठी लढणाऱ्या माणसाची कथा आहे. त्यामुळे या माणसांच्या जीवनातील घटना व प्रसंग यांची शृंखलाच ते कथांमधून उभी करतात.'' ६

अण्णाभाऊ स्वत:च 'आबी'च्या प्रस्तावनेत म्हणतात, ''जे जीवन मी जगलो, जे जीवन अनुभवले तेच मी लिहिले आहे''७ यावरून एक गोष्ट निश्चित होते की त्यांच्या कथा काल्पनीक नसून वास्तव आहेत. त्यांच्या बऱ्याच कथांमधून आर्थिक व सामाजिक अत्याचाराविरूध्द संघर्ष करणारी, पोटासाठी लाचार होणारी, वेळप्रसंगी अन्यायाविरूध्द संघर्ष करणारी माणसे दिसतात. ग्रामीण भागातील दलित व अस्पृश्यांच्या जीवनाचे चित्रण करणे व त्यांची व्यक्तिचित्रे रेखाटणे हा त्यांच्या कथेचा विशेष म्हणता येईल.'बरबाद्या कंजारी' च्या प्रस्तावनेत अण्णाभाऊंनी जे सांगितले ते लक्षात घेण्यासारखे आहे. ते म्हणतात, माझी जीवनावर फार निष्ठा असून मला माणसं फार आवडतात. त्यांची श्रमशक्ती महान आहे. ती जगतात, जगाला जगवतात, त्यांच्या बळावरच हे जग चालतं. त्यांची झुंज नि त्यांचे यश यावर माझा विश्वास आहे. त्यांना विद्रुप करणं मला आवडत नाही. या माणसांना वैफल्याच्या नावाखाली विद्रूप करू



Scanned by CamScanner

नये. वैफल्य हे तलवारीच्या धुळीसारखं असतं नि ती धूळ झटकून तलवार लखलखीत करता येते. म्हणजेच माणसाच्या श्रमावर त्यांचा पूर्ण विश्वास आहे. जी माणसे त्यांनी आपल्या कथेत रेखाटली आहेत ती त्यांनी प्रत्यक्षात पाहिली आहेत.

डॉ. इंदुमती शेवडे यांना मात्र अण्णाभाऊ साठे यांचे कथाविश्व वास्तवपूर्ण वाटत नाही. त्यांच्या कथेतील पात्रे त्यांना 'मोअर दॅन लाईफ साईज' वाटतात. परंतु डॉ. इंदुमती शेवडे यांचे हे मत योग्य वाटत नाही. कारण अण्णाभाऊ ज्या लोकांमध्ये मोठे झाले. ज्यांचे सोबत राहिले त्यातूनच त्यांनी आपली पात्रे उभी केली आहेत. त्यांच्या कथेतील बहुतेक पात्रे भुकेचा प्रश्न सोडविण्यासाठी गुन्हे करतांना दिसतात. सरकारने, समाजाने जर भुकेचा प्रश्न सोडविला नाहीतर माणसे कशी गुन्हेगार बनतात, दरोडेखोर बनतात आणि मग स्वतःचे माणूसपण गमावून बसतात. त्यातूनच मग समाजात अराजकता माजते, कायद्यांना काही अर्थ उरत नाही. अण्णाभाऊंच्या 'विष्णूपंत कुलकर्णी' या कथेचा विचार केला तर हेच लक्षात येते.

अण्णाभाऊंच्या ग्रामीण कथेतील पात्रे ही दलितअस्पृश्य समाजातील आहेत. या दलित अस्पृश्यांमध्ये चेतना जागविणे, त्यांना आत्मभानाची जाणीव करून देणे हे अण्णाभाऊंच्या कथेतील पात्रांना चांगले उमजले आहे. मेलेल्या जनावराचे मास न खाणे, मृत जनावरे न ओढणे इत्यादी प्रकार सुरू केल्यामुळे उच्चवर्णीय त्यांच्यावर संतापतात. चावडीवर बोलावून त्यांना जाब विचारतात, दमदाटी करतात. काही ठिकाणी तर त्यांच्यावर बहिष्कार टाकला जातो. परंतु तरीही न डगमगता त्यांनी अन्यायाविरूध्द लढा दिला. अण्णाभाऊंच्या 'सापळा' या कथेत हेच दाखविले आहे. त्यातील हरबाचे विचार तर डॉ. आंबेडकरांचेच विचार आहेत.

एकंदरीत अण्णाभाऊ साठेंच्या कथांचा विचार केला तर असे दिसून येते की, त्यांच्या काही कथांमधून ग्रामीण दलित जीवनाचे चित्रण आलेले आहे. कारण अण्णाभाऊ स्वतः दलित जातीत जन्माला आले असून त्यांनी दलितांचे जीवन अगदी जवळून पाहिले आहे. त्यामुळेच त्यांच्या ग्रामीण दलित कथा आपल्या मनाला जाऊन भिडतात. त्या अस्सल बावनकशी सोन्यासारख्या आहेत. त्यांच्या कथा ग्रामीण आणि दलित अशा दोन्ही वर्गात मोडतात. त्यांच्या कथा वास्तवपूर्ण आहेत. त्यांच्या कथेतील माणसे अगतिक असतीलही परंतु ती लाचारी पत्करत नाही. एका मर्यादेपर्यंत ती अन्याय, अत्याचार सहन करतात मात्र मर्यादा संपताच ते अन्यायाविरूध्द आवाज उठवितांना दिसतात.

**निष्कर्ष —**

- अण्णाभाऊंची कथा म्हणजे संघर्ष करणाऱ्या माणसांची कथा आहे.
- त्यांनी आपल्या कथेतून ग्रामीण भागातील दलित जीवनाचे दर्शन घडविले आहे.
- त्यांच्या काही कथांमधून डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या विचारांचा प्रचार केलेला दिसून येतो. उदा. सापळा, वळण.
- काही कथांमधून गुन्हेगारांचे चित्रण केलेले आहे. उदा. बंडवाला, रामोशी, बरबाद्या कंजारी, कोंबडीचोर
- अण्णाभाऊंनी आपल्या कथेसाठी ग्रामीण भाषेबरोबरच हिंदी भाषेचाही वापर केला आहे.
- त्यांच्या कथेतून आत्मभान आलेल्या व्यक्ती पहावयास मिळतात

**संदर्भ :—**

१) डॉ. शरणकुमार लिंबाळे (संपादक) गावकुसाबाहेरील कथा, दिलीपराज प्रकाशन, पुणे, २००७ पृ. ५३.
२) भालचंद्र फडके — दलित साहित्य : वेदना आणि विद्रोह, श्रीविद्या प्रकाशन, पुणे, १९७७ पृ. १८२.
३) डॉ. एस. एस. भोसले (संपादक)—प्रतिनिधीक कथा, अण्णाभाऊ साठे, लोकवाङ्मय गृह, मुंबई, १९९४ पृ.४१.
४) तत्रैव — पृ. ४४—४५.
५) तत्रैव — पृ. १०६.
६) डॉ. प्रकाश कुंभार — दलित साहित्य : काही विचार आणि दिशा, कैलास पब्लिकेशन्स, औरंगाबाद, २००२, पृ.९५.
७) अण्णाभाऊ साठे — आबी (प्रस्तावना), भगवानदास हिरजी प्रकाशन, मुंबई, १९७९.



Scanned by CamScanner